# 'स्व'रहित 'स्व'

- सद्गुरु श्री रमाकांत महाराज

# 'स्व'रहित 'स्व'

## - सद्गुरु श्री रमाकांत महाराज

मूळ इंग्रजी ग्रंथ "SELFLESS SELF" च्या संकलक व प्रकाशक - श्रीमती ॲन शॉ

मराठी अनुवाद - श्रीमती अन्विता सावंत

प्रकाशन तिथी - शालिवाहन शके १९४३,
आषाढ शु. १५
"गुरुपोर्णिमा "
दि. २३ जुलै २०२१

मुद्रक व प्रकाशक - श्री निसर्गदत्त अध्यात्म केंद्र,
रमाकांत आश्रम, बीड

प्रकाशन स्थळ - श्री निसर्गदत्त भक्ती ज्ञान केंद्र, रणजिताश्रम,
नाशिक

देणगी मूल्य : ₹ ५०/-

॥ हरि ॐ ॥

# प्रस्तावना

आजि सोनियाचा दिनु ।
वर्षे अमृताचा घनु ॥

श्री सद्‌गुरु रमाकांत महाराज हे श्री सद्‌गुरु निसर्गदत्तमहाराजांचे परम शिष्योत्तम. 2 ऑक्टोबर 1962 या शुभ दिनीं श्री रमाकांत महाराजांना गुरूमंत्राची दिक्षा मिळाली. महाराज एकवीस वर्षांचे होते तेंव्हा.

सद्‌गुरु वचनावरील श्रद्धा दृढ झाली. निश्चयात्मक वृतीने अध्यात्मिक साधना सुरू झाली. चिकाटीने आणि आत्मनिश्चयाने. परमार्थ, शिक्षण, नोकरी आणि प्रपंच एका समांतर रेषेत सुरू होते. खरं म्हणजे तारेवरची कसरतच सुरू होती ती. यथावकाश चाळीस वर्षांची प्रदीर्घ कठोर अध्यात्मिक साधना फळाला आली. श्री रमाकांत महाराजांना सिद्धावस्था प्राप्त झाली. त्याच दरम्यान श्री सद्‌गुरु रणजित महाराज श्री सद्‌गुरु चरणीं लीन झाले होते. अंतरंगीं स्वतःला कोणत्याही प्रकारच्या उपाधीची वा गुरुपदाची अभिलाषा नसतांना देखील केवळ नाशिकच्या प्रेमळ भक्तांच्या आग्रहाखातर श्री रमाकांत महाराजांनी श्री सद्‌गुरुपद ग्रहण केलं आणि सन 2002 पासून देशी-विदेशी प्रज्ञावंत जिज्ञासूंना नाममंत्राची दिक्षा देत स्वरूप ज्ञान प्रबोधनाच्या महान पवित्र कार्याला आरंभ केला.

नित्यनेमें सद्‌गुरु प्रतिमा पूजन, सांप्रदायिक चारही भजनं सुरू झाली. गुरु-शिष्यांमध्ये आत्मज्ञान चर्चासत्र रंगू लागली. अंतिम सत्य कुठे लपून बसलंय याचा ठावठिकाणा प्रज्ञावंत जिज्ञासू साधक, श्री सद्‌गुरु मुखारविंदामधून श्रवण करूं लागले. नाशिकच्या जगताप मळ्यात सद्‌गुरु प्रेमभक्तिचा मळा फुलला. त्या सद्‌गुरु प्रेमभक्ति कुसुमांचा परिमळ आसमंतात भरून तो थेट सातासमुद्रापार पाश्चिमात्य देशात दरवळला. परिणाम स्वरूप पाश्चिमात्य प्रज्ञावंत जिज्ञासूंचा पायरव श्री रणजिताश्रमात अखंडपणे सुरू झाला.

श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांच्या मुखारविंदामधून पाझरलेल्या अमृतधारा म्हणजे 'SELFLESS SELF'. त्या अमृतधारांना मातृभाषेत शब्दरूप देऊन त्यांचा भावानुवाद सर्व सद्‌गुरु भक्तांना, प्रज्ञावंत जिज्ञासू नवागतांना उपलब्ध व्हावा अशी प्रबळ इच्छा श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांच्या मनीं होती. परंतु तसा योग काही जुळून आला नाही. आदरणीय सौ. अन्विताताई हे सर्व जाणून होत्या आणि योग्य संधी उपलब्ध होताच श्री महाराजांची इच्छा सत्यात उतरविण्यासाठी कटिबद्ध झाल्या, ही एक आनंदाची आणि गौरवास्पद घटना आहे.

SELFLESS SELF भाग तिसरा SELF REALISATION, (Chapter 157 - 177) चा मराठी भावानुवाद त्यांनी केला. खरं म्हणजे ते एक श्रद्धायुक्त भाव-भावनांचं मुक्त प्रकटीकरण आहे. अत्युत्कृष्ट अलौकिक आविष्कार आहे तो. अशा या प्रशंसनीय उपक्रमाचं गुणगान करताना वरील शब्दांची उंची देखील थीटी पडावी असाच तो आहे.

स्वरहित 'स्व' या नावाने तो भावानुवाद गुरूपोर्णिमेचं औचित्य साधून या पुस्तक रूपात प्रकाशीत करण्याचा आनंद सोहळा आज साजरा होतोय. आपण सर्वजण त्याचे साक्षीदार आहोत. बहु भाग्याने अशा आनंद सोहळ्याचं साक्षित्व करण्याचा सुयोग प्राप्त होत असतो. भक्तवत्सल भगवंताचे, त्या श्री सद्‌गुरु माऊलीचे आभार प्रकट करताना योगीराज ज्ञानेश्वर माऊलींचे शब्द मुखीं येतात.....

आजि सोनियाचा दिनु ।
वर्षे अमृताचा घनु ॥

स्वरहित 'स्व' च्या रूपात श्री सद्‌गुरु रमाकांत महाराज आपणा प्रत्येकाला सबाह्यभ्यंतरी व्यापून राहिलेले आहेत. स्वरहित 'स्व' पुस्तक प्रकाशनापूर्वीची संहिता आदरणीय गुरुभगिनी सौ. अन्विताताईंनी मला पाठविली आणि प्रेमळ सूचना देत म्हणाल्या, "वेळ मिळाल्यास आपण वाचून माझे जेष्ठ गुरुबंधु या नात्याने आपला अभिप्राय दिला तर मला आनंद होईल. "अर्थात हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. त्यांचा अधिकार, खरोखरच महान आहे. साक्षीभावाने वाचन करताना माझ्या मनीं उत्स्फूर्तपणे स्फुरलेल्या मनोभावना व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे.

श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांच्या मुखारविंदामधून पाझरलेल्या अमृतधारा म्हणजे SELF- LESS SELF. त्यांना मातृभाषेत शब्दरूप देणं म्हणजे वास्तविक अर्थाने शिवधनुष्य पेलण्यासारखं कठिण काम आहे. ज्याच्या जवळ अदम्य सामर्थ्य सामावलय असंच अलौकिक मान्यवर व्यक्तिमत्व एवढं मोठं साहस करूं धजेल आणि ते अदम्य सामर्थ्य आदरणीय गुरुभगिनी सौ. अन्विताताईंच्या ठाई वसलेलं आहे याची साक्ष प्रस्तुतचा हा भावानुवाद स्वयें देतोय. त्यांच्या मनाची ऋजुता, प्रसन्नता, सुगम अनुवाद, लिखाणातला सुटसुटीतपणा खरोखरच कौतुकास्पद आहे.

अध्यात्म हा विषय सामान्यतः क्लिष्ट, समजायला गूढ, अगम्य, अनाकलनीय असा सर्व साधारण समज जनसामान्यांच्या मनात खोलवर रुजलेला आहे. या गैरसमजांचं समुळ निर्मुलन करण्याचं महत्वपूर्ण कार्य प्रस्तुतचा हा भावानुवाद करणारा आहे एवढा तो भावस्पर्शी आहे हे निश्चितच.

ओघवत्या वैभवसंपन्न प्रासादिक भाषाशैलीतला हा भावानुवाद वाचताना असं कुठेही आढळत नाही की हा इंग्रजी भाषेमधल्या संतसाहित्याचा, अध्यात्मिक ग्रंथाचा मातृभाषेत केलेला अनुवाद आहे. अशाप्रकारचा अनुवाद करणारा अनुवादक सुद्धा त्या क्षेत्रातील तेवढाच वाक्बगार, मुरब्बी असावा लागतो.

SELFLESS SELF वाचताना गुरु-शिष्यांचा संवाद चालू आहे असं जे चित्र अंतःचक्षूंसमोर उभं राहतं अगदी त्याच प्रमाणे प्रस्तुतचा भावानुवाद वाचताना साक्षात तोच अनुभव येतो. यावरून एक गोष्ट अगदी स्फटिकवत सुस्पष्ट होते ती म्हणजे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांवर सौ. अन्विताताईंनी प्रस्थापित केलेलं त्यांचं प्रभुत्व. परिणाम स्वरूप लिखाणात कुठेही क्लिष्टता जाणवत नाही. निर्झराचं निर्मळ पाणी जसं खळखळ असा कर्णमधुर नाद करीत अखंडपणे वहात असतं अगदी तसंच हे लिखाण एका लयबद्ध लयीत पुढे पुढे आणि पुढे सरकत असतं. लिखाणाला त्याची स्वतःची खोली आहे.

श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांनी जो स्वरूप-ज्ञानबोध त्यांच्या निकटवर्तीयांना, समीप बसलेल्या प्रज्ञावंत जिज्ञासूंना प्रेमाने दिलाय, तोच संदेश या भावानुवादामधून मूर्तीमंत प्रतिबिंबित होताना आढळतो.

स्वरहित 'स्व' पुस्तक आज प्रकाशित झालंय. अनेकांच्या हातीं ते विसावणार आहे. जी मंडळी या विषयाशी परिचित आहेत त्यांचा आनंद द्विगुणीत होईलच. त्यांची साधना अधिक सखोल बनेल. ज्या नवागत प्रज्ञावंत जिज्ञासू सज्जनांच्या हातीं जेव्हां हा ग्रंथ विसावेल आणि ते वाचतील तेव्हा त्यांच्या मनात अध्यात्म ज्ञानाविषयी कुतूहल निर्माण होईल. ते जाणून घेण्याची उत्कट इच्छा निर्माण होईल. त्यांना योग्यवेळी मार्गदर्शक भेटतील. अंतरीं ज्ञानदीप प्रज्ज्वलीत होईल. परमार्थ साधनापथावरचा त्यांचा प्रवास सुरू होईल. एवढं प्रचंड सामर्थ्य श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांच्या मुखारविंदामधून पाझरलेल्या या अमृतधारांमध्ये सामावलेलं आहे.

स्वरहित 'स्व' पुस्तकात श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांच्या बावीस निरूपणांचा सामावेश आहे. पानोपानीं ज्ञानामृताचे तुषार वैविध्यपूर्ण कलात्मकतेने विखुरलेले आहेत, त्यामधले काही नमुनेदार तुषार पाहुया.

'तुम्ही देह नसून चैतन्य स्वरूप आहात.' तुमच्या सदगुरुवर तुमचा ठाम विश्वास हवा. गुरुवचनावर नितांत श्रद्धा हवी. वास्तविक तुम्ही स्वतःच तुमचे गुरु आहात. एकदा का त्या अंतिम सत्याविषयी तुमची पूर्णतया खात्री पटली की सातत्याने त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

'तुमच्या'शिवाय तुमची असलेली ओळख हेच अंतिम सत्य आहे. हे ज्ञानामृत आहे !

Embrace Your Reality याचं मराठीत केलेलं नामाभिधान चैतन्याला मिठी मारा ! (साधा न् सोपा अर्थ ) BE WITH YOU

मृत्यूचा क्षण हा तुमच्यासाठी दयनीय असता कामा नये. उलट त्या क्षणाची तुम्ही उत्कटतेने प्रतिक्षा करायला हवी. आनंदाने त्याचं स्वागत करायला हवे. अंतिम क्षण सुखावह करा. तुमच्यातील स्वरहित 'स्व' चे अस्तित्व हेच अंतिम सत्य आहे आणि ते निर्विकारपणे तसेच राहील.

**स्वरहित 'स्व' च्या संगतीत रहा.** जेव्हां तुम्ही गुरुंना नमस्कार करता तेव्हा तो स्वरहित 'स्व' ला असतो. यासाठी तुम्ही स्वतःलाच नमस्कार करा. तुमच्यातील आत्मचैतन्याशी जवळीक करा. सतत त्याच्या संगतीत रहा. मी तुमच्या अंतर्गुरुला जागृत करत असतो त्याला बोलतं करत असतो. तुमच्या अंतर्गुरुशी संवाद साधा.

**तुमची कहाणी, सर्वात महान गोष्ट'** तुमची हकीकत तुमच्या समोर मांडली. तुम्हाला ऐकवली. त्या कहाणीचे केंद्रस्थान तुम्ही आहात. कारण सर्व काही तुमच्यातच आहे. तुमच्याशिवाय कशाला अस्तित्व नाही. तेव्हा शांत रहा. त्या अभूतपूर्व शांतीचा, अलौकिक स्तब्धतेचा उपभोग घ्या. इथून निघताना मन, बुद्धी, अहंकार सर्व इथेच ठेवून जा. आत्मानंदात मग्न रहा, शांत रहा, आनंदी रहा. माझ्या श्री सद्‌गुरु निसर्गदत्तमहाराजांनी अध्यात्मज्ञानाचं सार त्यांच्या एका वचनात सांगितले आहे. ते सतत लक्षात ठेवा.
**"तुझ्या आत्मज्ञाना वेगळा अन्य देव, ईश्वर, ब्रह्म, आत्मा, परमात्मा, गुरु कोणी नाही."**

स्वरहित 'स्व' च्या वाचकांच्या, प्रज्ञावंत जिज्ञासू अभ्यासकांच्या हे स्पष्टपणे लक्षात येईल की श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांनी त्यांच्या प्रत्येक आत्मज्ञान चर्चासत्रातून, निरूपणातून अंतिम सत्याचा तसंच "सद्‌गुरुसखा विसरू नका" या बोधवचनाचा उद्‌घोष किती उत्कटतेने केलाय तो. या पुस्तकाचं श्रद्धायुक्त वाचन निखळ-निर्भेळ आनंद-समाधान प्रदातं आहे.

सद्‌गुरु वचनावर दृढ विश्वास ठेवून श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांनी स्वतःला सिद्ध केलं आणि श्री सद्‌गुरुपद भुषविलं. अमरत्वाचं अमृत आकंठ प्राशन केलं. मर्त्यामधील अमर्त्य बनले. सद्‌गुरु प्रेमभक्तिचा महान आदर्श उभा केला.

स्वरहित 'स्व'म्हणजे त्यांच्या मुखारविंदामधून पाझरलेल्या अमृतधाराच. श्रीमहाराजांची प्रबुद्ध बोधवाणी ! सध्याचं मानवी जीवन अतिशय गुंतागुंतीचं, स्पर्धेचं, अस्थिरतेचं, गतीशील आहे. प्रत्येकजण शाश्वत सुखाचा शोध घेत घेत अंतिम सत्य कुठे लपलंय याचा वेध घेतोय. कस्तुरीमृगा सारखा वनीं-उपवनीं, राऊळीं-मंदिरीं चहुकडे अखंडपणे भटकतोय. पूरी दमछाक झालीय त्याची. अशांसाठी श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांची ही प्रबुद्ध बोधवाणी अंतिम सत्य प्राप्तीचा सुलभ, सुखद सोपान ठरेल आणि स्वरहित 'स्व' च्या अमृतधारा साधकांना सांताकडून अनंताकडे घेऊन जातील.

श्री सद्‌गुरु रमाकांत महाराजांच्या विमल-मंगल पवित्र-पावन चरणी सखोल कृतज्ञतेच्या भावनेने सदैव नतमस्तक मी.

**शांतिदास**
B/26,संतमुक्ता
पेरुबाग,आरे रोड
गोरेगाव पुर्व,
मुंबई-400065
9969004204
bbsawant1944@gmail.com

॥ जय श्री सद्‌गुरु प्रणाम ॥

# मनोगत

## जय श्री निसर्गदत्त

परमार्थातील अज्ञेय विचारांचे महान उद्गाते, I Am That या आधुनिक उपनिषदाचे ज्ञानदाते आणि देशोदेशींच्या अध्यात्मप्रेमींचे श्रध्दास्थान, माझे परमपूज्य सद्गुरु श्री निसर्गदत्त महाराज यांचे परमशिष्य सद्गुरु श्री रमाकांत महाराज यांचा SELFLESS SELF हा ग्रंथ 2015 साली लंडन येथे प्रसिध्द झाला. महाराजांच्या शिष्या श्रीमती ॲन शॉ यांनी या ग्रंथातील प्रश्नोत्तरांचे संकलन केले आहे. या ग्रंथाचे प्रकाशन करुन त्यांनी ग्रंथरुपाने ज्ञानाचा एक अमोल ठेवा साधकांना उपलब्ध करुन दिला. यासाठी त्यांनी अतिशय परिश्रम घेतले.

SELFLESS SELF हा ग्रंथ विदेशात अतिशय लोकप्रिय झाला. निगर्सदत्त महाराजांच्या अध्यात्मिक ज्ञानाचा वारसा पुढे चालवणारा ग्रंथ म्हणुन अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, अधिकारी व्यक्तींनी या ग्रंथाचा गौरव केला. अनेक भाषांमध्ये त्याची भाषांतरे झाली. त्यामुळे महाराजांना त्याचे मराठीत भाषांतर व्हावे असे वाटत होते. महाराजांनी महासमाधि घेण्यापुर्वीच या कार्याला सुरुवात केली होती. परंतु ते पुर्णत्वाला गेले नाही.

हा ग्रंथ इंग्रजी भाषेत 500 पानांचा असुन त्यात तीन भाग आहेत. त्यातील तिसऱ्या भागात 22 चर्चासत्रे असुन तो सर्वात लहान भाग आहे. महाराजांच्या प्रथम पुण्यतिथीच्या दिवशी त्यांना आदरांजली म्हणुन हा भाग अनुवादीत करुन प्रकाशित करावा असा मानस होता. परंतु कारणपरत्वे ते राहुन गेले. महाराजांच्या बीड येथील शिष्यांनी गुरुपोर्णिमेच्या सुवर्ण मुहूर्तावर हे अपुर्ण काम पुर्णत्वाला नेण्याचा संकल्प केला आणि तो पुर्णत्वाला नेला. त्यासाठी त्यांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे. शेवटी ही सद्गुरुकृपेची फलश्रुती आहे.

प्रस्तावनेत ग्रंथाविषयी अतिशय सुंदर विवेचन केले आहे. त्यामुळे त्याविषयी जास्त काही लिहित नाही. इथे श्रोता आणि वक्ता या भुमिकेतुन चैतन्याशी चैतन्याचा घडलेला हा संवाद आहे. कधी तिथे श्रोत्याचा भाबडा भाव आणि मातेने त्याला वात्सल्याने भरवलेला घास आहे, तर कधी बौद्धीक पातळीवरचे चिकित्सक प्रश्न आणि त्याला महाराजांनी दिलेली बौध्दीक सीमा पार ओलांडणारी सहजस्फुर्त सडेतोड उत्तरे. परमपूज्य श्री निसर्गदत्त महाराज यांचे अगदी निकटचे शिष्य आदरणीय श्री शांतीबाबाजी यांची अजोड सद्गुरु निष्ठा, अध्यात्मिक व्यासंग, श्री रमाकांत महाराजांविषयीचा आदरभाव आणि त्यांच्यावरचे निर्व्याज प्रेम सर्वच आदर्शवत आहे. त्यांची अतिशय भावगर्भ प्रस्तावना या ग्रंथास लाभली याचा मला विशेष आनंद आहे.

शेवटी वाचकांना एक नम्र विनंती, एखाद्या अध्यात्मिक ग्रंथाचा अंशरुपाने का होईना, अनुवादीत करण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. चुका असतीलच, त्यासाठी क्षमस्व! आपल्याला शक्य झाल्यास जर निदर्शनास आणुन दिल्या तर ते खरोखरच स्तुत्य होईल.

राजाधिराज सद्गुरुनाथ श्री निसर्गदत्त महाराज की जय।
राजाधिराज सद्गुरुनाथ श्री रमाकांत महाराज की जय।

- **सौ. अन्विता रमाकांत सावंत**

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | तुम्ही देह नसून चैतन्य स्वरुप आहात | ८ |
| २ | संथपणे, शांतपणे चिरंतनाकडे वाटचाल | ११ |
| ३ | मी पणाचे ग्रहण सुटले पाहीजे | १३ |
| ४ | चैतन्याला मिठी मारा | १६ |
| ५ | विवेकाने विचारांची चाळणी करा | २० |
| ६ | तुमची ओळख ही विश्वाची ओळख आहे | २४ |
| ७ | देहबंधनातुन मुक्त झाल्याचा आनंद | २६ |
| ८ | अनोळख्याची ओळख | २८ |
| ९ | अंतिम क्षण सुखावह करा | २९ |
| १० | अलौकिक आनंद | ३५ |
| ११ | स्वरुपज्ञान हे शब्दांच्या पलीकडे आहे | ३८ |
| १२ | स्वरहित 'स्व' च्या संगतीत रहा | ४१ |
| १३ | आत्मज्ञानी व्हा | ४४ |
| १४ | अंतिम सत्याच्या ठिकाणी विचार नाहीत | ४६ |
| १५ | गुरुकिल्ली मिळाली आहे त्याचा आनंद घ्या | ४९ |
| १६ | चैतन्याच्या सानिध्यात रहा | ५१ |
| १७ | तुमचा आनंद तोच माझा आनंद | ५३ |
| १८ | आत्यंतिक तळमळ | ५५ |
| १९ | मला काहीच माहित नाही | ५६ |
| २० | समाधानाची आगळी प्रभा | ५९ |
| २१ | मनाचा लय | ६२ |
| २२ | तुमची कहाणी, सर्वात महान गोष्ट | ६४ |

## १. तुम्ही देह नसून चैतन्य स्वरुप आहात

**प्रश्नकर्ता**: आम्हाला आमची खरी ओळख कशी होईल ?

**महाराज**: इथे सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या सद्‌गुरुंवर तुमचा ठाम विश्वास हवा, अत्यंत दृढ विश्वास. गुरुवचनावर नितांत श्रध्दा हवी. वास्तविक तुम्ही स्वत:च तुमचे गुरु आहात ! मनाची एकाग्रता आणि बळकट श्रध्दा तुम्हांला निश्चितपणे अंतिम सत्यापर्यंत घेऊन जाईल. गुरुवचनावर ठाम विश्वास ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे, ऐकलेले ज्ञान तुमच्यामध्ये मुरण्यासाठी हा एकमेव मार्ग आहे. बऱ्याच वेळा मी पहातो लोक गुरु बदलतात, आज हा गुरु, उद्या तो गुरु असं होता कामा नये.

सर्वांत श्रेष्ठ गुरु कोणता जो तुम्हांला तुमच्या अंतर्यामी असलेल्या देवाची ओळख करुन देतो तो. ही एकच गोष्ट इतर सर्व गुरुंपेक्षा त्याचे वेगळेपण सिध्द करते.

एकदा का त्या अंतिम सत्याविषयी तुमची पूर्णत: खात्री पटली की सातत्याने त्याचा पाठपुरावा केला पाहिजे परंतु असं होत नाही ! इथे बसल्यावर तुम्ही सर्व काही ठीक आहे म्हणता परंतु एकदा का इथून बाहेर पडलात की काही ना काही प्रलोभने शिरकाव करण्यासाठी उभी असतात आणि तुम्ही त्यांना बळी पडता. आपल्या मनाला आपणच शिस्त लावणे आवश्यक आहे. मनाने अतिशय खंबीर रहा, सतर्क रहा. आत्मज्ञान ठसण्यासाठी, ते मुरण्यासाठी अढळ निश्चय पाहिजे, धैर्य पाहिजे, डळमळीतपणा कामाचा नाही.

अध्यात्मज्ञानाचा हा वृक्ष वाढण्यासाठी बराच काळ जावा लागतो. परंतु तोडला जाण्यासाठी काही क्षणांचा अवधी पुरेसा असतो.

**प्रश्नकर्ता:** महाराज, आपल्या म्हणण्याचा आशय असा आहे का की, अध्यात्माच्या या अंतिम टप्प्याच्या अवस्थेमध्ये, तुमच्याकडे सातत्य पाहिजे, सावधानता पाहिजे. तुमच्या मनाला तुम्ही शिस्त लावली पाहिजे, तुमचा विश्वास डळमळीत करतील किंवा श्रध्देला बाधक ठरतील अशा गोष्टींपासून किंवा अशा लोकांच्या संगती पासून दूर रहायला हवे.

**महाराज**: हे ज्ञान अलौकिक आहे, ते पचनी पडून तुमच्यामध्ये मुरले पाहिजे. अंतिम सत्त्याचे बिजारोपण तुमच्यामध्ये झालेले आहे. आता उत्तम खतपाणी घालून त्याला वाढवणे, त्याची काळजी घेणे तुमच्या हातात आहे. तुम्ही एखादे रोप लावले की त्याला खतपाण्याची आवश्यकता असते. इथे अध्यात्मामध्ये त्यासाठी ध्यान आणि भक्तीची आवश्यकता आहे.

मी तुम्हांला ज्ञानामृताचे रोप दिलेले आहे. त्याची नीट काळजी घ्या. त्याला व्यवस्थित खतपाणी मिळाले नाही तर ते मरुन जाईल.

तेंव्हा नीट काळजी घ्या, योग्य रितीने जोपासना केलीत तर तो ज्ञानवृक्ष फळांनी लगडून जाईल. जर भरपूर काळजी घेतली तर तुम्हांला उत्तम फळे मिळतील. ध्यान आणि भजन यात सातत्य पाहिजे. भजनाच्या माध्यमातून त्या स्पंदनांमधुन तुम्हांला एक प्रकारची ऊर्जा मिळते. त्यामुळे त्यातून त्या "अनोळख्याची" ओळख होते. आतापर्यंत तुम्हांला अज्ञात असलेले, तुमच्यात उपजत असलेले ते चैतन्य आविष्कृत होते, उघड होते. भजनातील भाव, भजनाचे सूर तुम्हांला त्या चैतन्याजवळ नेतात. थोडक्यात ती अनोळख्याची ओळख आहे. ही तुमची स्वत:ची खरी ओळख आहे, हे सत्य तुम्हांला उघड होते.

आता तुम्हांला वास्तव काय आहे याची खात्री झाली, त्यामुळे बाह्य जगातील घडामोडींकडे तुम्ही तटस्थपणे, अलिप्तपणे पाहणार, यापुढे तुम्ही देहबुध्दीचा वापर कराल परंतु तुम्हांला सत्य काय हे समजलेले आहे आणि ते तुम्ही नि:शंकपणे स्विकारलेले आहे. तुमचा पाया आता मजबूत झाला आहे. देहबुध्दीवर आधारलेल्या चंचल, अस्थिर, मायिक कल्पना जाऊन आता तुम्ही ओळखलेले अंतिम सत्य हेच तुमचे अधिष्ठान झाले आहे.

तुम्ही जे दृष्य पहाता ते तुमच्यातील अदृष्य, अनामिक दृष्टयाला घडलेले दर्शन आहे, हा अदृष्य द्रष्टा स्वयंभू आहे. कठीण शब्दांचा वापर करावा लागतो. कारण ह्या शब्दांनीच त्या अंतिम सत्याचे, जे शब्दातीत आहे, त्याचे वर्णन करणे शक्य होते.

**प्रश्नकर्ता:** खरे आहे महाराज, हे जे शब्द तुम्ही नेहमी वापरता 'स्वयंभू', 'अदृष्य', 'अनामिक' आणि 'सर्वव्यापी' ते शब्द खरोखरच त्या अदृष्य अनामिक चैतन्याचा वेध घेतात, ते उघड करुन दाखवतात, मला तर ते खूपच उपयुक्त वाटतात. मनाला त्याचे सहजपणे आकलन होत नाही, परंतु मनाला नि:शस्त्र करतात. आवडत्या कल्पनांच्या आणि विचारांच्या मागे धावणाऱ्या मनाला ते निश्चितच आवर घालतात.

**महाराज:** अंतिम सत्याचे दर्शन झाल्यावर आपोआप सर्व कल्पनांचा निरास होतो. इथे येण्यापूर्वी तुम्ही मायेने ग्रासलेले होता. स्वत:ला एक व्यक्ती म्हणून ओळखत होता. अनेक भ्रामक समस्या तुम्हांला भेडसावत होत्या. आता सगळे चित्र बदललेले आहे. तेंव्हा स्वस्थ व्हा, शांत व्हा, निरतिशय शांततेने रहा. तुमचा प्रवास आता संपला आहे. यापेक्षा आणखी काही वेगळ्या ज्ञानाची आता तुम्हांला गरज नाही. तुमचे अस्तित्व, तुमचा आहेपणा, हेच आत्मज्ञानाचे मूर्त रुप आहे.

तुम्ही स्वत: ज्ञानस्वरुप आहात. तुम्हीच तुमचे गुरु आहात. वास्तव काय आहे हे तुम्ही आता जाणता. तुम्हांला आता कळले आहे की तुम्हीच ते अंतिम सत्य आहात. निसर्गदत्त महाराजांना एकदा एका शिष्याने विचारले की, महाराज मी दररोज तोच सूर्य, तीच माणसे, तेच जग पहातो. महाराज म्हणाले रोज तू आधी स्वत:ला पहातोस नंतर जग पहातो. तुमची खरी ओळख तुम्हांला पटली आहे.

आता तुम्ही एक व्यक्ती म्हणून स्वत:ची ओळख विसरुन गेला आहात, तेंव्हा एक पाहणारा, एक जाणणारा ही ओळखही संपुष्टात आली. आता त्या ओळखीचे कार्य संपले. दैनंदिन व्यवहाराकरीता त्या सर्व गोष्टी उपयोगी होत्या. अंतिम सत्य काय ते एकदा कळले म्हणजे सर्वकल्पनांचा निरास होतो. कळतेपणापूर्वी, आहेपणापूर्वी तुम्ही कसे होता आणि हा कळतेपणा, आहेपणा संपल्यानंतर तुम्ही कसे असणार याचे आकलन या अध्यात्मज्ञानामुळे होते. तुमची अनामिक ओळख अध्यात्मज्ञानामुळे ओळखीत आली. या ज्ञानाच्या योगाने तुमच्या मनातील सर्व भ्रामक कल्पना, निरर्थक विचारांचे काहुर, मृत्युचे भय या सगळ्यांचा शेवट झाला.

तुम्ही देह नसून चैतन्य स्वरुप आहात, हा निश्चय दृढ झाला, याचाच अर्थ तुमची वाटचाल प्रगतीपथावर आहे.

आता या ज्ञानाची सुध्दा आवश्यकता नाही. त्याच्याशी तुमचे देणे घेणे उरले नाही. त्या अंतिम सत्याप्रत तुम्हांला नेण्यापुरताच त्या ज्ञानाचा उपयोग होता. आता तो उपयोगही संपला.

**प्रश्नकर्ता:** अंतिम सत्य एकदा समजले की त्यानंतरही सतर्कतेची आवश्यकता आहे का?

**महाराज:** तुमची आत्मस्थिती एकदा निश्चयाची झाली, ते ज्ञान तुमच्यामध्ये मुरले की त्याची आवश्यकता नाही. बिलकुल नाही. सतर्क कोण राहणार? सावधानता कोण ठेवणार? सतर्कता कोणाची? अजूनही तुम्ही जर स्वत:ला देहरुपानेच ओळखत असाल, स्वत:ला देहरुपानेच मानत असाल, तर मग या सगळ्यांची गरज आहे, तुमच्या सावधानतेची, तुमच्या सतर्कतेची किंबहुना सतर्कता, सावधानता या सर्व शब्दांचे काही कामच उरले नाही आता. तुमचे विचार आता निर्विचार झाले. आता विचारांना थारा नाही. कारण विचार करणाराच उरला नाही. आता त्याचा असणेपणा हा निराकार आहे, अदृष्य आहे, अनामिक आहे. या अनामिक, अदृष्य ओळखीलाच तुम्ही गुरु, ईश्वर, ब्रम्ह हे नाव देता, केवळ समजण्यासाठी, केवळ ओळखीसाठी. अतिशय दुर्मिळ असे हे ज्ञान आहे. पुस्तकी ज्ञान नाही. हे निखळ ज्ञान आहे. स्वयंभू ज्ञान आहे.

## २. संथपणे, शांतपणे चिरंतनाकडे वाटचाल

**प्रश्नकर्ता:** महाराज आपण म्हणता की तुमच्या मध्ये महान शक्ती आहे, परंतु तुम्हांला त्याची जाणीव नाही. पण ही जाणीव सुध्दा देहाला अनुसरुनच आहे ना?

**महाराज:** जाणीव उत्स्फूर्त आहे. तुम्ही त्या जाणीवेने जेंव्हा विचार करता तेंव्हा तिला गुणामध्ये आणता आणि गुणामध्ये आणता म्हणून ती तुम्हांला देहाला अनुलक्षून आहे असे वाटते. अंतीम सत्य हे स्वयंस्फूर्त आहे. विचार हे नेहमी देहबुध्दीला धरुन असतात. मी एक अध्यात्मिक विचारसरणीची स्त्री आहे असे तुम्ही म्हणता, परंतु आहेपणाच्या आधी तुम्हांला तुम्ही कोण म्हणून ओळखत होता? आणि यथावकाश हे शरीर पडले म्हणजे, मग तुमची ओळख काय असणार? तुमचे उत्तर असेल "माहीत नाही!"

म्हणून शांत रहा, हे ज्ञान मुरण्यासाठी, अंगीभूत होण्यासाठी वेळ जावा लागतो. ध्यानधारणेमुळे तुमची अध्यात्मिक बैठक पक्की होते तेंव्हा दृढ निश्चयाने ध्यान करणे आवश्यक आहे. त्यासाठी धीर धरणे आवश्यक आहे.

एक कथा आहे. काही शिष्य आपल्या गुरुंकडे गेले आणि म्हणाले की, आम्ही एवढे आपल्या कडून ऐकले पण आम्हाला अजून काही ज्ञान झाले नाही. असं का? त्यांच्या गुरुंनी त्यांना सांगितले, "बाजुला जो बगीचा आहे, तिथे एक कालवा खोदा, मग सर्व फुलझाडांना पाणी मिळेल उंचावरुन कालवा खोदला परंतु पाणी काही झाडापर्यंत पोहोचेना. इतरजण उतावळेपणाने पाणी सोडणे बंद करुन तेथुन ते निघुन गेले. एक शिष्य मात्र चिकाटीने पाणी सोडतच राहीला. मग कालव्यामध्ये पाणी मुरत गेले आणि शेवटी प्रवाह सुरु झाला. फुलझाडांना पाणी मिळाले.

इथे काय सांगायचं आहे की, ज्ञान अंगीभूत होऊन मुरले गेले पाहिजे त्यासाठी थोडा कालावधी पाहिजे. ध्यानामध्ये सातत्य पाहिजे, एकदा का ते ज्ञान वाढू लागले, मग तुम्हांला ध्यानाची गरज नाही. सर्व काही उत्स्फूर्तपणे होत जाईल. ज्ञान प्रवाहित होईल कारण ते तुमच्यामध्ये मुरले जाणार, प्रवाहातील पाणी हळुहळु जसे जमिनीमध्ये मुरणार तद्वत हे ज्ञान अत्यंत संथपणे, शांतपणे तुमच्यामध्ये मुरत जाणार.

लोक म्हणतात आम्ही तीस-तीस वर्ष अभ्यास करीत आहोत, काहीच कसे होत नाही? परंतु यासाठी तुमचा अभ्यास शास्त्रशुध्द पाहिजे, काही जण बर्फावर उभे राहतात, अनेक प्रकारे तासन्-तास

शरीराला पिडा करुन घेतात, अनेक प्रकार आहेत. हे ज्ञान नव्हे त्या ज्ञानाचा उद्‌भव तुमच्यामध्ये सहजपणे होणार आहे. तुमच्यातच आहे ते, तेंव्हा धीर धरा उतावीळ होऊ नका.

**प्रश्नकर्ता:** एकदा का ते ज्ञान पाण्याप्रमाणे मुरले की ते उत्स्फूर्तपणे उफाळून कारंज्याप्रमाणे वर येईल.

**महाराज:** तुमची खात्री पटण्यासाठी अनेक प्रकारे मी समजून सांगतो भ्रामक कल्पना, शंकाकुशंका यांचा तुमच्यावर आघात होऊ नये हा त्या मागचा उद्देश आहे. स्वत:ला उगीचच कमी लेखू नका. सद्‌गुरु सांगतात ते शक्य आहे का? त्या प्रमाणे सर्व घडेल का माझ्या बाबतीत ? अशा शंका घेऊ नका, धैर्याने वागा. सदगुरु तुम्हांला धैर्य देतात, शक्ती देतात ज्या योगे तुम्ही कोणत्याही संकटाशी सामना कराल. अगदी वाईट कल्पनांनी, विचारांनी तुमच्यावर आघात केले तरी तुम्ही सावध रहाल, तुमचा समतोल ढळणार नाही.

तेंव्हा निश्चित रहा, सद्‌गुरू म्हणतात एखादी गोष्ट होणार तर ती होणारच, अशा निश्चयाने रहा. सद्‌गुरु तुम्हांला जी शिकवण देतात, वेळोवेळी ज्या सूचना देतात त्यांना चिकटून रहा. कोणाच्या काना-मनाला लागू नका.

निसर्गदत्त महाराज म्हणत असत, "माझा सद्‌गुरु महान आहे". हे स्वरुप ज्ञान झाल्याचे लक्षण आहे. अनेक परीक्षांमधून तुम्हांला जावे लागेल, अनेक आव्हाने तुमच्यासमोर उभी असतील, प्रलोभने समोर येतील, मोहाचे क्षण येतील परंतु स्वत:वर आणि आपल्या सद्‌गुरुंवर ज्याचा पूर्ण विश्वास आहे तो कोणत्याही परिस्थितीत डगमगणार नाही, कशाचाही त्याच्यावर परिणाम होणार नाही. काही वेळा नकारात्मक विचारांनी नैराश्य येते. विचार येतात, ते येणारच अशावेळी सावध रहा, मनाची पूर्ण तयारी करा आणि त्यांच्याकडे जास्त लक्ष देऊ नका. "सत्य" काय हे तुम्हांला दाखवून दिले आहे. अंतिम सत्य! जिथे शंका, वाद, वैचारिक गोंधळ कशालाही थारा नाही.

**प्रश्नकर्ता:** 'अंतिम सत्य', 'निखळसत्य !' खरोखर महाराज मी आता निश्चितच धीट झालो आहे. काही चिंता नाहीत. एका भजनात जसे म्हटले आहे, "देव माझ्यातच आहे." त्याच निश्चयाने राहण्याचा प्रयत्न करेन.

## ३. मी पणाचे ग्रहण सुटले पाहीजे

**महाराज:** तुमच्यातील स्वरहित 'स्व' ची तुम्हांला ओळख झाली त्याच्या विषयी पुष्कळ ज्ञान झालेले आहे. आता इथे सातत्य ठेवून काळजी घेणे जरुर आहे. तुमचे 'स्वरुप' तुमच्या देहरुपाने झाकले गेले आहे. त्यामुळे तुम्ही देहबुध्दीतुन बाहेर पडू शकत नाही. इथे तुम्हांला वास्तवाचे भान ठेवायला हवे. तुमच्या देहावरील प्रेमाचा आणि आसक्तीचा निरास झाला पाहिजे.

आता देहकुळीच्या ओळखीने न रहाता स्व-स्वरुपाच्या आठवणीने रहा, स्वरुपाच्या सहवासात रहा.

**प्रश्नकर्ता:** दिर्घकाळ या आठवणीने वागणे अशक्य वाटते.

**महाराज:** आतापर्यंतची तुमची सर्व कमाई, देहबुध्दीतून जे काही संग्रहीत केले ते सर्व विसरुन ध्यान करणाऱ्याचे ध्यान करा. स्वरहित 'स्व' ला मिठी मारायची असेल तर स्वत:ला पूर्णपणे झोकून द्या. ऐहिक गोष्टींची आसक्ती पूर्णत: नाहिशी झाल्याशिवाय त्या अंतिम सत्याची ओळख होणे शक्य नाही.या आसक्तीचा जिथे शेवट होईल तिथे तुम्हांला तुमचे दर्शन होईल.

तुमच्या देहाचा वापर तुमची खरी ओळख करुन घेण्यासाठी करा. अंतिम सत्याकडे जाण्यासाठी तुमचे शरीर हेच एकमेव साधन आहे. तुम्ही स्वत:च ते अंतिम सत्य आहात. तुम्हांला अज्ञात असलेले तुमचे अस्तित्व सर्वव्यापी आहे, निराकार आहे. तुमचे प्रेम आकारावर आहे. त्यामुळे त्या निराकाराची ओळख होत नाही. गाढ श्रध्दा आणि धैर्य पाहिजे. वरवरचा परमार्थ काही उपयोगाचा नाही. निसर्गदत्त महाराज म्हणत असत, होम्याचे (संशयाचे) ज्ञान काही कामाचे नाही, प्रत्यय पाहिजे, प्रचिती पाहिजे.

बाह्य जग हे तुझ्या अस्तित्वाचे दर्शन आहे. तुझी हजेरी नसेल तर मग जग कुठे आहे? तेंव्हा सर्वांगे पूर्णत: स्वत:लाच शरणांगत व्हा. अहंकार हा अध्यात्मिक प्रगतीमध्ये सर्वात मोठा अडथळा आहे.

सर्व ज्ञान तुम्हांला झालेले आहे, परंतु सुक्ष्मातील सूक्ष्म अहंकार हे सर्व बिघडवू शकतो. तेंव्हा अतिशय सावधतेने रहा.

येणे जाणे या शरीराला आहे, तुम्हांला नाही. शरीर वार्धक्याकडे झुकले की थोडी घबराट होते. अशक्तपणामुळे बऱ्याच समस्या उद्‌भवतात. परंतु तुमच्या भक्तीने, त्या भक्तीच्या शक्तीने तुम्ही या संकटाशी सामना करु शकता. अडचणींवर मात करु शकता, बाहय जगातील घडामोडीकडे तुमचे जास्त लक्ष असते. त्यामुळे तुमच्या मूळ स्वरुपाकडे, त्या चैतन्याकडे, तुमचे दुर्लक्ष होते. असं करु नका. सतत त्या चैतन्याचे चिंतन करा.

हा राजमार्ग आहे. इथे अनेक वाटा नाहीत. ह्या सर्व वाटा जिथे संपतात तिथे तुझी हजेरी आहे. तुझी हजेरी हा तुझा अंतिम मुक्काम आहे. तुमचा विश्वास स्वरुपावर असू दे, ऐहिकावर नको !

**प्रश्नकर्ता:** आपण सर्व गोष्टींचा उहापोह केलेला आहे महाराज, आता सर्व माझ्यावर अवलंबून आहे.

**महाराज:** सर्वकाही तुमच्यासमोर मांडून उघड केले आहे. तुम्ही त्याचा पूर्णपणे स्विकार केला पाहिजे. जे काही सांगितले ते आत्मसात करा त्याचे सतत स्मरण करा.

सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे 'मी कोणीतरी आहे' हे जे ग्रहण तुम्हांला लागले आहे ते सुटले पाहिजे. मी कोणीतरी आहे हा जो तुमचा भ्रम आहे त्याचा पूर्णपणे निरास झाला पाहिजे. सर्व काही सोपे आणि स्पष्ट आहे. तुमचे शरीर ही तुमची खरी ओळख नाही, कधी नव्हती आणि पुढेही नसणार. तुमच्या मनात कोणते विचार येतात याकडे तुम्ही लक्ष दिले पाहिजे. तुमच्या स्वत:च्याच विचारांना तुम्ही बळी पडणार नाही याची दक्षता घ्या. एखादा क्षुल्लक डास जसा तुमच्या पूर्ण शरीरात एखाद्या रोगाचा प्रादुर्भाव करु शकतो तसा एखादा विचार तुमचे सर्व अध्यात्मिक जीवन बिघडवू शकतो. म्हणून सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही तुमच्या स्वरुपाशी एकनिष्ठ रहा.

तुमच्या देहावर तुमची जी आसक्ती आहे त्या आसक्तीचे विसर्जन करुन स्वत:ला समर्पित करा. तुम्ही अजन्मा आहात ! तुम्हांला जन्म नाही, मरण नाही. प्राप्त केलेल्या ज्ञानाचा व्यवहारात निर्भिडपणे उपयोग करा. तत्वज्ञान तुमच्यात मुरले पाहिजे मग त्याचा उपभोग घ्या.

इथे शब्दांचा कीस काढत बसायचे नाही. त्याने केवळ गोंधळून जायला होते. जगात पुष्कळ साधु, संत, गुरु आहेत त्यांची तुलना करणे, देवदेवतांविषयी चर्चा करणे यातून काही निष्पन्न होणार नाही. सद्‌गुरु तुम्हांला तुमची हकिकत सांगतात, श्रवणकर्त्याची हकिकत सांगतात.

ह्या देव-देवतांना कोणी जन्माला घातले ? ही देव-दैवते जर तुम्हांला तुमच्यापेक्षा मोठी वाटत असतील तर मग याचाच अर्थ तुम्ही स्वत:हून स्वत:ला पुन्हा अज्ञानाच्या गर्तेत लोटून देत आहात ! तुम्हांला अनेकदा मी सांगत आलो आहे की, जगात तुमच्यापेक्षा मोठे कोणी नाही. कोणतीही गोष्ट तुमच्यापेक्षा मौल्यवान नाही! अध्यात्माच्या प्रांतातली तुमची बाल्यावस्था आता संपली आहे. अजूनही जर तुम्ही कोणाकोणाची तुलना करीत बसलात, शाब्दिक ज्ञानात अडकून बसलात तर ते आंधळेपणाने पुस्तकी ज्ञानाच्या समुद्रात पोहण्यासारखे आहे. पुस्तकातील हकिकत ही जर वाचणाऱ्याची हकिकत असेल तर ती त्या पुस्तकाची शेवटची आवृत्ती ! तुम्ही तुमची स्वत:ची, तुमच्या पुस्तकाची शेवटची

आवृत्ती व्हा ! शेवटची ओळख ! अंतिम ओळख !! अंतिम सत्य !! जिथे सर्व काही विराम पावते तिथे तुमची वस्ती आहे. हाच ह्या सर्व ज्ञानाचा सारांश आहे, मतितार्थ आहे.

तुमच्याशिवाय तुमची असलेली ओळख हेच अंतिम सत्य आहे. हे ज्ञानामृत आहे ! किती दिवस तुम्ही पुस्तकी ज्ञानात अडकणार आहात? वाचणाऱ्याची हकिकत वाचा. त्या वाचणाऱ्याची ओळख करुन घ्या. वास्तवात अंतिम सत्य हे सहज, सरळ आहे. पण देहबुध्दीने त्यात शिरकाव केला आणि सर्व बिघडून गेले, सर्व गुंता झाला. संत-महात्मे, सद्गुरु जेंव्हा कथा किर्तनाद्वारे तुमचे वास्तव तुमच्यापुढे उभे करतात तेंव्हा, तुम्ही ती तुमची हकिकत म्हणून ऐकली पाहिजे. ते जे काही सांगतात त्याचा मतितार्थ समजून घेतला पाहिजे. फक्त ऐकण्यासाठी म्हणून ऐकायचे नाही. हा करमणुकीचा कार्यक्रम नाही !

**प्रश्नकर्ता:** आपल्याला असं म्हणायचं आहे का, की ह्या करमणुकीसाठी सांगितलेल्या गोष्टी नाहीत?

**महाराज:** सद्गुरु तुम्हांला सांगतात की 'तू ब्रम्ह आहेस' आणि हे ऐकून सुध्दा तुम्ही पुन्हा मागे नदीच्या काठावर जाऊन बसता ! प्रत्येक वेळी तुमचा अहंकार डोकावतो. ज्यावेळी तुम्ही ज्ञानाचे विश्लेषण करत बसता त्यावेळी ह्या गोष्टींचे विश्लेषण कोण करतो तिकडे लक्ष द्या. इथे बुध्दीचे काम नाही. हे ज्ञान निखळ ज्ञान आहे, वास्तवता आहे तुमची, तुमची खरी ओळख, अंतिम सत्य ! तुम्हांला तुमच्या आहेपणाची जाणीव होण्यापूर्वी अध्यात्म, तत्वज्ञान काही माहित होते का? तर काही नाही.

तेंव्हा आता या समजुतींच्या वर्तुळातून बाहेर पडा. तुम्ही स्वत: ज्ञानस्वरुप आहात. असं असून तुम्ही पुन्हा पुन्हा देहबुध्दीवर का येता? विचार हे जंतूंसारखे आहेत. स्वरुपाच्या सहजतेमध्ये, निखळपणा मध्ये ते 'व्हायरस' सारखे काम करतात आणि सगळं बिघडवून टाकतात. पुन्हा सर्व सुरळीत होण्यासाठी पुष्कळ प्रयत्न करावे लागतात. सिध्दरामेश्वर महाराज एकदा म्हणाले होते, अध्यात्मज्ञान म्हणजे लहान मुलांची खेळणी नाहीत !

तुमच्याकडे अध्यात्मिक परिपक्वता असेल तरच तुम्ही त्या अंतिम सत्याची अनुभूती घेऊ शकता. त्या अंतिम सत्याला ओळखू शकता. यासाठी थोडा कालावधी लागेल. तुम्हांला प्रतीक्षा करावी लागेल. मनाला कथा श्रवण करायला खूप आवडतात. आपल्याला कशाची आवड पाहिजे? कथा ऐकाव्यात, नाही असे नाही परंतु त्यातील घटनांपासून आपण बोध घ्यायला हवा. केवळ मनोरंजन म्हणून ऐकू नका, शेवटी तुमची आवडनिवड ही तुमच्या मनाचा मापदंड आहे.

## ४. चैतन्याला मिठी मारा

**प्रश्नकर्ता:** महाराज, आपण म्हणता की बाह्य जग विसरा आणि तुमच्या शिवाय तुमचे जे अस्तित्व आहे त्याचा विचार करा.

**महाराज:** सुरुवातीला तुमच्यावर देहबुध्दीचा आणि मायेचा प्रभाव होता. परंतु आता तुमच्यातील विवेक जागा झाला आहे. तुमच्यामध्ये मानसिक स्थैर्य आले आहे. सत्य काय ते तुम्हांला कळले आहे. तरी सुध्दा आजुबाजुचे वातावरण, परिस्थिती यांचा परिणाम तुमच्यावर होऊन थोडा संभ्रम निर्माण होतो. म्हणून सतत तुमच्यातील चैतन्याच्या संपर्कात रहा. नियमित व्यायामाने तुम्ही तुमचे शरीर जसे सुदृढ ठेवू शकता त्याप्रमाणे तुमच्या अध्यात्मिक सुदृढतेसाठी नियमित ध्यान आणि भजन यांची आवश्यकता आहे.

चैतन्य निखळ आणि शुध्द ठेवण्यासाठी अत्यंत सावध राहिले पाहिजे. बऱ्या वाईट घटना घडत असतात परंतु त्याकडे सहजतेने, निर्विकल्पपणे पहा. रणजित महाराज नेहमी म्हणायचे, कोणत्या गोष्टींचा टच घ्यायचा आणि कुठल्या गोष्टींचा टच घ्यायचा नाही हे तुमच्यावर अवलंबून आहे.

मी नेहमी सांगतो की, भरलेले जेवणाचे ताट समोर आले आहे. त्यातले काय खायचे आणि काय नाही हे तुम्ही ठरवायचे. तुमच्या पथ्याला बाधक ठरेल असे तुम्ही काही घेत नाही, तसे इथे अध्यात्मिक पथ्य सांभाळायचे. आपल्या स्वरुपस्थितीला बाधक ठरतील अशा गोष्टींपासून दूर रहायचे.

चैतन्य हा विचार नाही. तुमच्यातील सत्य आहे, ते अंतीम सत्य! आणि हे तुमच्या अंतर्मनात कोरले गेले पाहिजे. निरनिराळ्या रुपामध्ये तुमच्या मार्गामध्ये माया अडथळे आणेल. माया नेहमी फिल्डींग लावून तयार असते. तिच्यापासून सावध रहा, सतर्क रहा. तुमचे अध्यात्मज्ञान आणि तुमची अध्यात्मिक ओळख सुरक्षित ठेवा.

जितक्या सहजतेने तुम्ही मी पुरुष आहे, हे स्विकारलेले आहे, तितक्याच ठामपणे "मी शुध्द चैतन्य स्वरुप आहे " हे ठसले पाहिजे.

शब्दांचे अर्थ लावत बसू नका. तुम्हांला शिखर गाठायचं आहे आणि हे शिखर गाठतांना तुम्हांला कोणी विचलित करीत असेल, माझ्याबरोबर ये म्हणत असेल तरी तुमची एकाग्रता ढळू देऊ नका, पाय घसरुन खाली याल. बाह्य परिस्थितीत तुम्ही बदल करु शकत नाही, काही गोष्टी टाळता येण्यासारख्या नसतात. परंतु आतून शक्तिशाली रहा. अशा वेळी तुमच्या ज्ञानाचा उपयोग करा.

लोक काही वेळा आपल्या कौटुंबिक जीवनाचा अध्यात्मिक जीवनाशी संबंध लावतात, ते विसरतात की कौटुंबिक जीवन हे मायिक आहे. देहबुध्दीशी निगडीत आहे. कृष्णाला पाच बायका होत्या

म्हणे. पण तुम्हांला त्याच्याशी काय देणे घेणे? लोकांना गुरुंच्या वैयक्तिक गोष्टींमध्ये, त्यांच्या कौटुंबिक जीवनात फार रस असतो.

सद्‌गुरु सांगतात तसे वागा, ते काय करतात तसे वागू नका ! उथळ विचारांना थारा देऊ नका, समाजात रहा, परंतु निरर्थक विचारांचा स्विकार करु नका.

देहबुध्दीतून बाहेर पडून चैतन्याला मिठी मारण्याची संधी आहे ही ! आता जर तुम्ही तुमच्यातील त्या चैतन्याला, त्या अंतिम सत्याला कवटाळले नाहीत तर पुन्हा एका नव्या स्वप्नाला सामोरे जाण्याची वेळ तुमच्यावर येणार ज्याला 'पुनर्जन्म' म्हटले आहे. तुमच्यावर त्या चैतन्याचा, स्वस्वरुपाचा, त्या अंतिम सत्याचा ठसा उमटवा. तुमच्या अंतर्यामी ते कोरले गेले पाहिजे.

कोणाच्या विचारांना तुम्ही बळी पडणार नाही याची दक्षता घ्या. तुमच्यामध्ये अपार सामर्थ्य आहे. परंतु तुम्हांला त्याची जाणीव नाही. तेंव्हा या सामर्थ्यानिशी त्या खोल आत्मानंदाच्या समुद्रात उडी मारुन त्यात पोहण्याचा आनंद घ्या. आत्मानंदाची अनुभूती घ्या. सगळ्यांचा केंद्रबिंदु तुम्हीच आहात.

या सगळ्यांसाठी आवश्यकता आहे ती केवळ धैर्याची. कोणाच्या दयेची अपेक्षा ठेवू नका. तुमचा स्वत:चा हात तुमच्या डोक्यावर ठेवा आणि तुम्हीच तुम्हांला आशीर्वाद द्या!

फक्त सद्‌गुरुंच्या मार्गदर्शनाखाली रहा. गुरु आणि शिष्य वेगळे नाहीत फक्त देहसंबंधाने वेगळे आहेत. अमेरिकेचे आकाश आणि जर्मनीचे आकाश वेगवेगळे आहे का ? तुमच्यामध्ये विचार करण्याची शक्ती आहे, अध्यात्मिक शक्ती आहे तिचा वापर करा. तुमच्यातील विवेकबुध्दीचा वापर करा. निसर्गदत्त महाराजांनी एकदा फार सुंदर सांगितले, "स्वत:ला कमी लेखू नका, कोणीही तुम्हांला खिशात घालेल इतके स्वस्त होऊ नका."

तुमच्या आजुबाजूला अनेक प्रकारचे लोक आहेत कोणी माळा जपत आहेत, कोणी भगवी वस्त्रे परिधान केली आहेत, गळ्यात हार घातले आहेत. हे सर्व त्या शरीराला सुशोभित करण्याचा प्रयत्न आहे, जे अशाश्वत आहे.

सुशोभित करावयाचे असेल तर त्या अंतर्गुरुला जो तुमच्या आत अदृश्यपणे बसून श्रवण करीत आहे त्याला करा. त्यासाठी तुमच्या अध्यात्मिक ज्ञानाचा आणि श्रध्देचा उपयोग करा.

हे सर्व सहज, सुलभ आहे. त्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती आणि दृढ निश्चयाची आवश्यकता आहे. 'मला माझी खरी ओळख करुन घ्यायची आहे.' हा निश्चय बाळगा.

आता ज्याअर्थी तुम्हांला अंतिम सत्य काय ते कळले आहे, त्या अर्थी दुसरीकडे कुठे जाण्याची इच्छाच तुम्हांला होता कामा नये. स्वत:ची ही नव्याने निर्माण केलेली तुमची आत्मस्थिती क्षणिक अविचाराने डळमळीत करु नका. 'आत्मस्थिती निश्चयाची तेची दशा मोक्षश्रीची.' 'मी माझे ध्येय गाठलेले आहे. आता मला कोठेही जाण्याची गरज नाही.' ही तुमची भूमिका असली पाहिजे. भरकटणाऱ्या मनाने दहा दिशांना भटकून तुम्हांला केव्हांही शांती मिळणार नाही. आतून खंबीर व्हा. देहाने तुम्ही समर्थ आहात परंतु आत्मज्ञानाने समर्थ व्हा!

त्या चैतन्याशी पूर्णत: समरस व्हा, तुमचे व्यक्तत्व हे सर्वव्यापी आहे. तेंव्हा आता जगाकडे बघण्याच्या दृष्टीकोनात बदल करा. तुम्ही त्या सर्वव्यापी चैतन्याचा एक अंश आहात. त्या चैतन्याशी तुम्ही आता एकरुप झाला आहात. स्वरहित 'स्व' या अंतिम स्थितीला तुम्ही पोहोचलात. तुम्हांला आता कळले आहे की माझे अस्तित्व आकाशासारखे आहे आणि सर्व चराचरात ते आहे. अमेरिकेचे आकाश वेगळे आणि जपानचे आकाश वेगळे असेल का ? त्यामुळे माझ्या वेगळ्या स्वतंत्र अस्तित्वाला ठाव नाही. कुठले एक आकाश चांगले आणि कुठले एक आकाश वाईट असू शकेल का ? आकाशात आपण काही वेगळेपण दाखवू शकतो का ? केंव्हाही नाही.

तुमच्या अंतर्मनात झालेला हा बदल फार महत्वाचा आहे. तुमची ग्रहणशक्ती, तसेच तुमचा दृष्टीकोन ह्यामध्ये नाट्यपूर्ण बदल झालेला आहे, अगदी उच्च पातळी गाठली आहे त्याने.

या क्षणी सुध्दा तुम्ही देहधारी आहात परंतु आता तुमचा देहाशी संबंध उरला नाही आणि हे देह अस्तित्व संपण्याची वेळ येईल तेंव्हाही नसणार. त्या अंतिम क्षणाला तुमची घबराट होणार नाही, तो क्षण सुखावह होईल. संत नामदेवांनी म्हटले आहे, 'काळ देहासी आला खावू आम्ही आनंदे नाचू गाऊ.' अंतिम सत्य ज्याला कळले आहे त्याला त्या क्षणी स्वर्ग, नरक, पुनर्जन्म या कल्पना भेडसावणार नाहीत. स्वर्ग-नरक, पुनर्जन्म या मुर्खांच्या कल्पना आहेत ! स्वर्ग-नरक कोणी पाहिला आहे का? निसर्गदत्त महाराज म्हणत असत की या जन्माचे तुम्हांला काही माहित नाही तर पुनर्जन्माच्या गोष्टी कशाला? तुझा जन्म झाला तेंव्हा तुझ्या आईच्या साडीचा रंग कोणता होता ते सांगू शकशील का? अध्यात्मामध्ये आपण आंधळेपणाने कशाचा स्विकार करु शकत नाही. विवेक पाहिजे.

ध्यान आणि भजन यांच्या योगाने तुमची स्वरुपस्थिती निश्चयाची होईल मात्र त्यामध्ये सातत्याची नितांत गरज आहे. बाह्य गोष्टींचे आघात, चुकीच्या कल्पना ह्या तुम्हांला मायेमध्ये पुन्हा ओढण्याचा प्रयत्न करतील. परंतु तुमची भूमिका ठाम असेल तर त्यात त्यांना यश येणार नाही. एकदा का तुमची

आत्मस्थिती निश्चयाची झाली की मग भौतिक किंवा मानसिक शत्रूंपासून तुम्ही सावध रहाल. त्यांना प्रवेश करु देणार नाही. भ्रामक कल्पनांचा तुमच्यात शिरकाव होणार नाही. हे सगळे व्हायरस जाण्याकरिता तुमचे ज्ञान आणि भजन हे ॲन्टीव्हायरस आहेत, ते काम करणार, तेंव्हा आता सर्वार्थाने परमार्थाला वाहुन घ्या.

## ५. विवेकाने विचारांची चाळणी करा

**महाराज:** भाऊसाहेब महाराजांनी तुम्हां-आम्हांला या मायेच्या पगड्यातून आणि मनावर आघात करणाऱ्या कल्पनांपासून सोडवण्यासाठी पध्दतशीर मार्ग शोधून काढला. मनाचा कमकुवतपणा कशात आहे आणि अडथळे आल्यास मनाची एकाग्रता कशी डळमळीत होते याचे त्यांनी निरिक्षण केले. त्यासाठी त्यांनी स्वत: अनेक वर्षे ध्यानाभ्यास करण्यात खर्च केली. आता आपण सर्वं मंत्र घेतो, ध्यान करतो, भजन करतो हे सर्व या सद्‌गुरुंमुळे आपल्यापर्यंत आले. त्यांच्या स्वानुभवामुळे ते शक्य झाले. दैनंदिन जीवनात माणसांना भेडसावणाऱ्या गोष्टी तसेच त्यांच्या मनाचा कमकुवतपणा याचा त्यांनी अभ्यास केला. स्वत: त्याचा अनुभव घेतला.

त्यांनी जे कष्ट घेतले त्याचा आज आपल्याला लाभ झाला. फार मोठे उपकार आहेत आपल्यावर त्यांचे. जेंव्हा आपल्या मनाची शांतता भंग पावते, काही अडथळे निर्माण होऊन मनाचा समतोल बिघडतो, भिती निर्माण होते, तेंव्हा ध्यान आणि भजनाचा आपल्याला अतिशय उपयोग होतो. आपल्यातील अंतिम सत्याची त्यामुळे आठवण होते. तुमच्यातील विवेक, ध्यान आणि भजन हे तुम्हांला नेहमी सतर्क राहण्यासाठी मदत करतात. माणसाला नेहमी तीन गोष्टींचे जास्त आकर्षण असते. लोकेषणा म्हणजे प्रसिध्दी, अर्थेषणा म्हणजे पैसा आणि वासना, परंतु तुमचा आनंद ह्या तिन्हीच्या पलीकडे आहे. तो निखळ आनंद आहे. उत्स्फुर्त आहे. त्या आनंदाला कुठल्याही भौतिक गोष्टींची गरज नाही. ध्यान आणि भजन यांच्या सातत्यामुळे तुम्हांला हा आनंद मिळून शांती सहज मिळेल.

अंतिम 'सत्या' चा गांभिर्याने विचार करा. तुमच्या स्वरुपस्थितीला दोलायमान होऊ देऊ नका, विवेक बुध्दीने त्या विचारांची चाळणी करा. मनात बरे वाईट विचार येतील. वाईट विचारांना तडीपार करा. पुन्हा हा जन्म नको आहे. पुनर्जन्म ही एक कल्पना आहे, जी आपल्या मनात बालपणापासून रुजवली गेली आहे. ती कल्पना काढून टाका.

तुमची सतर्कता किंचित जरी ढळली तर अहंकार आत शिरकाव करेल. सतत त्या चैतन्याच्या आठवणीत रहा. त्या ध्यासात रहा, पूर्ण एकाग्रतेने. आज नाहीतर उद्या, इच्छेने वा अनिच्छेने हा नाशिवंत देह तुम्हांला सोडावा लागणार आहे. त्यासाठी मनाची तयारी ठेवा, थोडा वेळ स्मशानात नाहीतर स्मशानाच्या बाजूला जाऊन बसा. वास्तव काय आहे त्याची जाण होऊन त्याला सामोरे जाण्यासाठी मनाची तयारी होईल. तुमच्या स्व-स्वरुपाशी अनुसंधान साधा. तुम्ही स्वत: ब्रम्ह आहात, तुम्हीच ईश्वर आहात. तुमचे अस्तित्व त्या चैतन्यावेगळे नाही. तुम्ही तुम्हांला देहरुपाने ओळखता, परंतु नाशिवंत देह हे

तुमचे खरे रुप नाही, कधी नव्हते आणि कधी नसणार ! तुमच्या शरीरात अदृश्यपणे वावरते ते चैतन्य तुमचे खरे रुप आहे. तुमच्या पुढे तुमची खरी ओळख करुन घेण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे. ती साधून घ्या. तुम्ही स्त्री नाही किंवा पुरुष नाही. तुम्ही ब्रम्ह आहात, त्या ओळखीने रहा. तुमच्या स्वरुपाला तुम्ही मिठी मारा, घट्ट मिठी मारा, मन, बुध्दी, अहंकार हे तुम्हांला त्या चैतन्याशी एकरुप होण्यातले अडथळे आहेत. अंतिम सत्य, पारमार्थिक भाषेमध्ये ज्याचा वस्तु म्हणूनही निर्देश केलेला आहे ती वस्तु, कुठे आहे? तुझ्यातच आहे. तुम्ही हे दृढ करा, हे आतमध्ये कोरले गेले पाहिजे. आता इतक्या तुमच्या अभ्यासानंतर पुढे काही शिकण्याची किंवा शिकवण्याची जरुरी नाही. शब्दांना अर्थ आपण दिले, तुमच्या 'आहेपणा' नंतर शब्दांना अस्तित्व आले. तेंव्हा आता या शाब्दिक ज्ञानाची तुम्हांला आवश्यकता नाही.

**प्रश्नकर्ता:** महाराज आपल्या संप्रदायाची शिकवण ही आपल्या परंपरा चालू ठेवण्यास उपयोगी आहे, असे आपणांस वाटत नाही का?

**महाराज:** ठीक आहे. पण तुम्हांला तुमची ओळख होण्यापूर्वी, तुमच्या 'आहे'पणाच्या आधी ही परंपरा कुठे होती? हे शरीर तुम्ही जेंव्हा धारण केले तेंव्हापासून ह्या सगळया कल्पना आल्या.

तुम्ही स्वत:चा अभ्यास करा, स्वत:चा शोध घ्या. स्वत: शोध घेऊन आत्मज्ञान मिळवा, परंपरेचे ज्ञान नको. परंपरा, उपासना, प्रारब्ध हे सगळे शब्द वापरण्याची तुम्हांला पुन्हा पुन्हा का इच्छा होते? तुमच्या विषयी तुमचे ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान हे तुम्ही स्वत:च प्राप्त करुन घ्या.

तुम्हांला जगाविषयी काही माहिती नाही. परंपरेविषयी तुम्हांला माहिती नाही. अध्यात्माविषयी काही माहिती नाही. शेवटी अध्यात्मज्ञान हे सुध्दा अज्ञानच आहे ! "कोणतेही ज्ञान नाही" हे खरे ज्ञान आहे. अध्यात्मिक शब्दांमध्ये सुध्दा गुंतुन पडू नका. शब्द म्हणजे निरनिराळया कल्पनांची, विचारांची वेष्टणे आहेत. निरनिराळया कल्पनांची ही वेष्टणे काढून टाका आणि सत्य काय ते ओळखा. कोणी कोणाचे नाही. कोण कोणाचा नवरा? कोण कोणाची बायको? शरीर आहे म्हणून ही नाती आहेत. शरीर धारण करण्यापूर्वी फक्त आकाश होते. तुमच्यातील स्वयंभू अदृश्य चैतन्य हे आकाशाच्याही आधी आहे. तेंव्हा या सर्व घटना आणि घडामोडी यांच्याशी आपला काहीही संबंध नाही. इथे काही घडले नाही, काही घडत नाही आणि काही घडणारही नाही !

तुम्ही जे काही विचार स्विकाराल त्याचा पाया तर्कशुध्द पाहिजे, तुमच्या स्वरुपावर, ज्याच्याने या जगाचा तुमच्यात उद्‌भव होतो, त्याच्यावर श्रध्दा ठेवा, हे शरीर ही तुमची ओळख नव्हे.

मृत्युचा क्षण हा तुमच्यासाठी भयावह, दयनीय असता कामा नये ! उलट त्या क्षणाची तुम्ही उत्कटतेने प्रतीक्षा करायला हवी, आनंदाने त्याचे स्वागत करायला हवे.

सत्य काय आहे हे ओळखा, तुम्ही स्वतःच ते अंतिम सत्य आहात ! ज्याला स्वरुप म्हटले आहे, चैतन्य म्हटले आहे ते तुम्ही स्वतःच आहात. तेच तुमचे अंतिम स्थानक आहे. तिथेच तुमचा भाग्योदय आहे. मध्ये दुसरी कोणती स्थानके नाहीत. इथे आश्रमात येण्यापूर्वी तुम्हांला आश्रमाचा पत्ता दिलेला होता. तसे अध्यात्मज्ञान हे सुध्दा तुम्हांला तुमच्यातच असलेल्या अंतिम सत्याला ओळखण्यासाठी दिलेला पत्ताच आहे.

दृढ विश्वास पाहिजे, इच्छाशक्ती प्रबळ पाहिजे, सर्व संतांची इच्छाशक्ती प्रबळ होती. निसर्गदत्त महाराजांसारखा सद्‌गुरुंवर दृढ विश्वास ठेवा. तसा जर विश्वास ठेवाल तर तुम्ही त्या अंतिम सत्याकडे निश्चितच पोहोचणार. चित्त विचलित होऊ देऊ नका. जर तुम्ही डळमळीतपणे वागलात तर सगळं काही मुळापासुनच उखडून जाईल.

साधु त्या अरुणाचलाला (डोंगराला) प्रदक्षिणा घालतात, चांगली गोष्ट आहे. परंतु ह्यातुन काय साधणार आहे? शरीराला का कष्ट द्यायचे? कशा करिता? ज्याचा शोध घेत आहात ते स्वरुप तुमच्यातच आहे. ग्रंथ सुध्दा हेच निर्देशीत करतात. तुमच्यातील अंतिम सत्य तुम्हांला उघड झाले आहे. आता फक्त ती आठवण पक्की करायची आहे. शरीराला कोणत्याही प्रकारचे कष्ट देण्याची गरज नाही. कोणत्याही सत्वपरीक्षा देण्याची आवश्यकता नाही.

इथे सातत्य असणे महत्वाची गोष्ट आहे. आत्मानुसंधान पाहिजे, अभ्यासात सातत्य ठेवले नाहीत तर मूळ स्वरुपापासून तुम्ही दूर जाल आणि माया पुन्हा तुमचा ताबा घेईल. पाया मजबुत करा. अधिष्ठान पक्के करा, तुमच्या अधिष्ठानात जर पूर्णत्व असेल तर त्या पूर्णाची ओळख होणार आहे. त्या स्वयंभू पूर्णत्वाचा उत्स्फूत अविष्कार ! परिपूर्ण शांती !!

देहरुपाने तुमची असलेली ओळख क्षणभंगुर आहे. एखाद्या घडयाळासारखी आत टिक्-टिक् चालू आहे. कालमापक यंत्र आहे हे ! गाढ श्रध्दा ठेवा. भौतिक जगाचा विसर झाला पाहिजे. आता सर्व काही तुमच्यावर अवलंबून आहे. एकच ध्येय ठेवा 'मला खऱ्या अर्थाने या सर्वांपासून मुक्ती पाहिजे.' तुमच्यातील त्या अदृष्य श्रवणकर्त्याला मी जागे करीत आहे. त्याच्याशी हा माझा संवाद आहे. मला त्या अंतिम सत्याची ओळख करुन घ्यायचीच आहे, अशा निश्चयाने गुरुकडे जा. तरच सद्‌गुरु ते ज्ञान तुम्हांला उघड करणार.

तुमच्यातील त्या परमतत्वाला त्या चैतन्याला सर्वांगे शरण जा. अहंकार हा परमार्थात फार घातक आहे, अहंकार पूर्णपणे विरघळला गेला पाहिजे तेंव्हाच तुम्हांला शांती मिळेल. चैतन्य एकच आहे. तेच प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. मग हेवेदावे, भांडणं कशासाठी? दुजेपणा नाहीच. मग क्रोध, मत्सर, स्पर्धा कशाला? तेंव्हा सर्व सोडा आणि त्या गाढ शांतीची अनुभूती घ्या.

अध्यात्मज्ञान तुमच्यात मुरले की नाही ह्याचे परीक्षण करण्यासाठी षडगुणांचे मापदंड आहेत. क्षमाशील वृत्ती, आत्मज्ञानासाठी तळमळ, जाणुन घेण्याची इच्छा, प्रतिक्षा, तितिक्षा आणि अंतिमतः सद्‌गुरु निष्ठा. जसे जसे तुम्ही स्वरूपाच्या सानिध्यात याल तसतसा सगळ्या जगाचा तुम्हांला विसर पडेल. डोळे उघडे ठेवा. आंधळेपणाने कशाचाही स्विकार करू नका तरच ते आत्मज्ञान प्राप्त होणार.

निसर्गदत्त महाराजांचा उपदेश लक्षात ठेवा. कोणी तुम्हांला खिशात घालेल इतके स्वस्त होऊ नका. काही गुरु म्हणे श्वासावर लक्ष केंद्रित कसे करायचे हे शिकवायला शंभर डॉलर्स फी घेतात अशा गुरुंकडे जाण्याची काही गरज नाही. कोणत्याही गोष्टींच्या किंवा कोणत्याही व्यक्तींच्या मागे आंधळेपणाने जाऊ नका. तुमच्या स्वतःशी तुम्ही प्रामाणिक राहा. तुमच्यातील चैतन्यावर श्रद्धा ठेवा. तुम्हांला तुमच्यातील अव्यक्ताची ओळख करून देणाऱ्या सद्‌गुरुवर नितांत श्रद्धा आणि विश्वास ठेवा. शोध संपवा आणि त्या शोधकावर लक्ष केंद्रीत करा. एक दिवस असा येईल की मी ज्या अवस्थेचे वर्णन करीत आहे ती अवस्था अगदी उत्स्फूर्तपणे तुम्हांला प्राप्त झालेली असेल. अगदी उत्स्फूर्तपणे हे ज्ञान तुमच्यात प्रवाहित होईल. त्या चैतन्याला आपलेसे करा, अति आदराने आणि सन्मानाने म्हणा की ते अंतिम सत्य मीच आहे !

## ६. तुमची ओळख ही विश्वाची ओळख आहे

**महाराज:** गुरु काय सांगतात हे तुम्ही ऐकले त्याच्यावर तुम्ही विचार, विवेक केलात आणि ते काय सांगतात हे तुम्हांला व्यवस्थित समजले. अगदी तळमळीच्या ध्यानाभ्यासाने तुम्हांला हे ज्ञान प्राप्त झाले. इथपर्यंतचा हा प्रवास ठीक आहे. परंतु याच्या पुढची पायरी म्हणजे हे ज्ञान तुमच्यात मुरले पाहिजे. श्रध्देने, नित्यनेमाने केलेला ध्यानाभ्यास हा आत्मज्ञान दृढ करण्याचा राजमार्ग आहे. आता तुम्हांला हकिकत काय ती कळली आहे. तरीसुद्धा कुठेतरी थोडीशी शंका असू शकते. ठीक आहे. परंतु हे ज्ञान जेंव्हा तुमच्यामध्ये ठसेल, तुमच्यामध्ये मुरेल त्यावेळी मग ज्या सहजतेने तुम्ही मी स्त्री वा पुरुष आहे हे सांगता तितक्याच सहजतेने **'मी अंतिम सत्य आहे'** असे ठासून सांगणार आणि हे दृढीकरण झाले की मग ह्या देहाशी तुमचा काही संबंध राहणार नाही. तुमच्यातील चैतन्याने हा देह धारण केला आहे.

शांती, समाधान ही अध्यात्माची अंगीभूत लक्षणं आहेत. ती देखाव्या पुरती नाहीत. ते चैतन्य तुमच्यातच आहे. परंतु त्या सुप्त शक्तीला तुम्ही ओळखले पाहिजे. त्यासाठी ध्यान करा. तुमचा शोध तुम्हीच घ्या. अंतिम सत्याच्या प्राप्तीसाठी हा शोध आहे. तरी ह्या शोधाच्या पलीकडे जाऊन शोध घेणाऱ्या त्या शोधकाचा शोध घ्यायला हवा !

**प्रश्नकर्ता:** आपल्याला काय म्हणायचे आहे हे मला समजले महाराज. परंतु त्या सगळ्यांमध्ये स्वतःला हरवून जाण्याची भीती आहे. मार्गसुद्धा अनेक आहेत त्यातून निवड करायची आहे. नुकताच मी एका गुरुकडे जाऊन आलो. त्यांनी आम्हांला काही नियम घालून दिले होते. केस कसे असावे, दाढी किती वाढवावी वगैरे गोष्टींसाठी पाच वेगवेगळे नियम होते.

**महाराज:** तुम्ही तुमचे अस्तित्व जाणण्यापूर्वी केस होते का? दाढी होती का? तुम्ही तुम्हांलाच ओळखत नव्हता. मग केसांविषयी गोष्ट कशाला? देहाला अनुसरून देह बुद्धीतून जन्माला आलेले हे नियम भौतिक जगाचे नियम आहेत. मन, बुद्धी, अहंकाराला धरून आहेत. भौतिक जगासाठी ठीक आहेत, परमार्थाकरिता त्याचा उपयोग शून्य आहे. 'मी देह आहे' ही तुमची ओळख विस्मृतीत जाईल ज्याने हा देह धारण केला आहे 'ते शुद्ध चैतन्य मी आहे', ही ओळख दृढ होईल या ओळखीने तुम्ही भौतिक जगाकडे पहाल.

तुमच्यामध्ये उपजतच असलेल्या त्या आत्मज्ञानाचा या स्वयंभू चैतन्याशी अन्योन्य संबंध आहे. तिथे देहाचा संबंध नाही. मी जे सांगतो ते तुमच्या या अनामिक ओळखीची ओळख करून देण्यासाठी शब्दांच्या आधाराने अध्यात्मज्ञानाची उकल करतो. याउलट मन, बुद्धी, अहंकारातून आलेले शब्द ज्ञान हे केवळ पदार्थ ज्ञान आहे. पण याच्या आधी हे ज्ञान कुठे होते? या देहाबरोबर हे ज्ञान आले आणि या देहाबरोबरच ते जाणार. हल्ली अध्यात्मावर खूप चर्चा चालते. ज्यावेळी तुम्ही ही चर्चा ऐकता, वेगवेगळ्या गुरूंची भाषणे ऐकता, त्यावेळी नकळतच तुमच्यातील त्या अनामिक श्रवणकर्त्याकडे तुमचे दुर्लक्ष होते. त्यामुळे तुम्ही स्वतःचे अवमूल्यन तर करताच परंतु त्या अंतिम सत्याच्या स्वयंसिद्ध ओळखीचा हा अवमान आहे. त्या ओळखीचा ध्यास घ्या आणि त्या ओळखीने रहा. परमार्थाची

खरी ओळख होऊन त्या ज्ञानसागरात स्वतःला झोकून द्याल तेंव्हा एक विलक्षण आनंदाची अनुभूती येईल. या आनंद सागरात जेंव्हा डुबाल तेंव्हा मौजच मौज ! नदीच्या काठावर बसून तुमच्या सुरक्षिततेची काळजी करत बसू नका. उडी टाकाल तर भिजणार, पण खोल पाण्यात पोहण्यात खरी मजा आहे. तो आनंद लुटायचा आहे. तुमच्यातील त्या महान शक्तीची जेंव्हा तुम्हांला जाणीव होईल तेंव्हा चराचरात तुम्हांला तुमचे अस्तित्व जाणवू लागेल. म्हणून मी नेहमी सांगत असतो, स्वतःच्या योग्यतेने रहा. दुसऱ्या कोणाच्या कृपेची, दयेची अपेक्षा करू नका. दुसऱ्या कोणाच्या मदतीची अपेक्षा ठेवू नका. त्याऐवजी तुमचाच हात आशीर्वादासाठी तुमच्या डोक्यावर ठेवा ! तुम्ही तुमच्या जीवनाचे शिल्पकार आहात याचा प्रत्यय घ्या. आमचे ज्ञान हे प्रत्ययाचे ज्ञान आहे. आमचे निरुपण हे प्रत्ययाचे निरूपण आहे.

तुमच्या गुरुंचे मार्गदर्शन आणि ध्यानधारणा यांच्यायोगे तुम्ही अध्यात्माचा अभ्यास केलात, ते ज्ञान आत्मसात केलेत. परंतु हे प्राप्त करण्यासाठी निरनिराळ्या नियमांनी शरीराला दिलेले कष्ट, भगवी वस्त्रे, गंध, माळा, टिळे यांनी शरीराची केलेली सजावट, या सर्व गोष्टींचा किती उपयोग झाला? यातून काय प्राप्त झाले? काही नाही. साजश्रृंगार करायचा तर त्या आत बसलेल्या अनामिक श्रवणकर्त्याचा करा. त्याला कशाने सजवाल? त्या आत्मचैतन्यावरचा तुमचा विश्वास आणि अढळ श्रद्धा या दोन गोष्टी त्यासाठी पुरेशा आहेत.

हे सर्व कसे प्राप्त होईल? त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती पाहिजे. मला सगळेच जाणून घ्यायचे आहे ही आत्यंतिक तळमळ पाहिजे, दृढ श्रद्धा पाहिजे. तुमच्यातील स्वयंभू आत्मचैतन्याशी तुमचा मिलाप हे तुमचे अंतिम विश्रामधाम आहे. योग्य तो पत्ता सापडला. आता शोधाचे कार्य संपले. तो पत्ता आता फाडून टाका, आता कोठे जाणे-येणे नाही. सर्वांगे त्या चैतन्याशी समरस व्हा. हे ज्ञान जेंव्हा तुमच्यामध्ये मुरेल तेंव्हा एक अलौकिक शक्ती तुम्हांला प्राप्त होईल. जगाकडे बघण्याची तुमची दृष्टी बदलेल. अनेकत्व जाऊन तुमच्यात एकत्वाची भावना येईल. सगळीकडे मीच भरुन आहे असे वाटणार. आत्मचैतन्याशी तुम्ही जास्तीत जास्त जवळीक साधाल.

तुमच्यात होणारा हा आमुलाग्र बदल म्हणजे आहेपणाच्या पलीकडे तुम्ही पोहोचल्याचे लक्षण आहे, ज्याच्यासाठी तुम्ही एवढा अट्टाहास केलात. आता हा ज्ञानाचा आरसा तुमच्यापुढे ठेवला आहे. त्याच्यात पहा आणि तुमचं तुम्हीच परीक्षण करा आणि ठरवा हे ज्ञान तुमच्यात किती मुरले आहे ते. त्या आत्मचैतन्याला कवटाळून रहा. त्याच्यापासून क्षणभरही वेगळे राहू नका.

## ७. देहबंधनातून मुक्त झाल्याचा आनंद

**प्रश्नकर्ता:** खऱ्या मी चे अस्तित्व देवाच्या ही पलीकडे आहे का?

**महाराज:** या विश्वामध्ये जी महान दैवीशक्ती आहे तिला देव हे नाव दिलेले आहे. तुमचे स्वयंभू अस्तित्व हे सगळ्याच्या आधी आहे, म्हणून त्याला काही व्याख्या नाही. आकाशाच्याही आधी तुझे अस्तित्व आहे. 'आम्ही आधीचे आधीचे देवाच्याही आधीचे | जेव्हा नव्हते आकाश पाणी तेंव्हा होतो निरंजनी ||' असे संतांनी सांगितले आहे.

**प्रश्नकर्ता:** निसर्गदत्त महाराज म्हणाले आहेत की, देवाचे अस्तित्व पूजेसाठी आहे. आज प्रथमच आपल्यामुळे मला त्याचा अर्थ समजला.

**महाराज:** काही लोक दगडाला देव म्हणून भजतात. तर काही मूर्ती पूजा करतात. त्या दगडाला किंवा त्या मूर्तीला कल्पना नसते आपण देव असल्याची ! लोक आंधळेपणाने त्या दगडाला किंवा मूर्तीला महत्व देतात. कारण त्यांनी स्वतःचे महत्त्व ओळखलेले नसते. किंबहुना ते स्वतः देव आहेत याची त्यांना कल्पनाही नसते. तुम्ही स्वतः परमात्मा, परमेश्वर आहात. ज्याची पूजा करता तो ईश्वर, परमेश्वर तुम्हीच आहात. पूजा करणारे ही तुम्हीच आणि पूजा करून घेणारेही तुम्हीच.

देहबुद्धीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. अनेक दुःखं उद्भवली. शंभर वर्षांपूर्वी याविषयी तुम्हांला काही माहीत नव्हते आणि शंभर वर्षानंतर तुम्हांला काहीही माहीत नसणार. तरी आता वर्तमानात तुम्ही अगदी अभिमानाने सांगता कि सगळं माहिती आहे! चांगली माहिती आहे. मला सांगा तुमची भूमिका ठाम करण्यासाठी तुमची खरी ओळख करून देण्यासाठी ह्या ज्ञानाचा काही उपयोग आहे का? जर ह्या सगळयांची गोळाबेरीज केली तर त्याच्या योगाने जन्ममरणाच्या खोट्या कल्पना तुमच्या मनातून जाणार आहेत का?

अध्यात्माच्या अभ्यासाने तुम्हांला कळणार आहे की हे नाशीवंत शरीर माझे नसून हे शेजाऱ्याचं मूल आहे ! आत्मज्ञानाने तुमची खरी ओळख तुम्हांला होणार. परिणामी तुम्ही तुमच्या शरीराकडे अलिप्तपणे पहाल. ध्यानामुळे तुमच्यात एक प्रकारची शक्ती निर्माण होईल. जिच्या योगाने तुमच्यात सहनशक्ती येईल, कुठल्याही संकटास सामोरे जाण्याचे धैर्य येईल. मृत्यूला सामोरे जाताना तो अंतिम क्षण आनंददायी असला पाहिजे. देहबंधनातून मुक्त झाल्याचा आनंद. अध्यात्मज्ञानाच्या योगाने तुम्हांला तो क्षण आनंददायी करता येणार. 'याचसाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा.'

म्हणून मी आग्रह धरतो की, तुमच्यातील त्या स्वयंसिद्ध चैतन्यावर लक्ष केंद्रित करा. हे ज्ञान तुम्हांला आता कळले आहे तेंव्हा आता सावधानता ठेवा आणि सातत्याने त्याचा पाठपुरावा करा. मी आणि माझे हे कुठून तरी सूक्ष्मरित्या आपल्यात शिरकाव करतात आणि त्याच्याबरोबर तक्रारी शिरतात, अपेक्षा वाढतात. माझ्या बायकोने माझ्या म्हणण्याप्रमाणे वागले पाहिजे, माझ्या नवऱ्याला चांगली नोकरी मिळाली पाहिजे वगैरे वगैरे. आता तुमची अध्यात्मज्ञानाच्या अभ्यासाने जी एक भूमिका तयार झाली आहे तिथून मागे वळून पाहू नका. लौकिक गोष्टींमध्ये

अडकू नका. या गोष्टींच्या मर्यादा तुम्हांला माहित आहेत. चॉकलेट खाल्ल्याने क्षणिक आनंद मिळतो तसाच या भौतिक सुखांपासून मिळणारा आनंद हा क्षणिक असतो. चिरस्थायी नसतो.

तुम्ही स्वतःला जेंव्हा तुमच्या खऱ्या ओळखीने ओळखाल तेंव्हा भौतिक सुखांच्या अभावी होणारे दुःख जाणवणार देखील नाही. अतिशय सोपे असे हे ज्ञान आहे. **मी कोण आहे** हा शोध घेण्यासाठी लोक लाखो रुपये खर्च करतात. त्यांना पुष्कळ गुरू भेटतात. आजकाल या ज्ञानाचा व्यापार चालला आहे. शोधकाच्या अज्ञानाचा गैरफायदा घेतला जातो. कारण त्यांना खरे ज्ञानी गुरु आणि भोंदू बाबा किंवा स्वार्थी गुरु यांच्यात फरक करता येत नाही. तुमच्यातील स्वयंसिद्ध आत्मचैतन्याची ओळख होण्याकरिता तुमच्यामध्ये अध्यात्मिक परिपक्वता आली पाहिजे. आयुष्यातील प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. स्वतःच स्वतःचा शोध घ्या. जेम्स कुठे आहे, जेम्स कुठे आहे म्हणून तुम्ही तुम्हांलाच शोधत आहात ! तुम्ही स्वतः जेम्स आहात. हे वास्तव आहे. अनेक प्रकारे मी हे वास्तव तुमच्यासमोर उभे करत आहे. आज हे ज्ञान माझ्या सद्‌गुरुंमुळे आहे. माझे गुरु फार महान आहेत. त्यांचे उपकार मानावे तेवढे कमीच आहेत. परमेश्वरापेक्षा त्यांची योग्यता महान आहे. जेंव्हा तुम्हांला असे गुरु भेटतील तेंव्हा तुमचाही अंतिम सत्याचा शोध संपलेला असेल. तुम्ही स्वतः परमेश्वर आहात. ते गुरुतत्व तुमच्यात आधीपासूनच आहे. बाह्य गुरु तुम्हांला फक्त या अंतर्गुरुची ओळख करून देतात. तेंव्हा आता तुमचा स्वतः वरचा आणि सद्‌गुरू वरचा विश्वास दृढ करा. जगाच्या पाठीवर कुठेही असा तुमच्या अंतर्यामी असलेल्या अदृश्य शक्तीशी त्या ओळखीशी घट्ट नाते ठेवा. तुमचा स्वतःचा हात तुमच्या डोक्यावर ठेवा आणि तुम्हांलाच तुम्ही आशीर्वाद द्या.

# ८. अनोळख्याची ओळख

**प्रश्नकर्ता**: स्वतःची खरी ओळख ही आपण मानत असलेल्या कोणत्याही देवाच्या पलीकडे आहे का ?

**महाराज:** नक्कीच. कारण तुम्ही स्वतःला ओळखले नाही. अनेक देव-देवता ज्यांचे तुम्ही शब्दाने वर्णन करता त्या सर्वांची ओळख मन, बुद्धी, अहंकारातून झालेली आहे, तो सर्व भ्रम आहे. तुमच्या कल्पनेचा खेळ आहे. परंतु ज्याचे तुम्ही वर्णन करू शकत नाही ते अंतिम सत्य आहे. ते चैतन्यच देवांचा देव आहे. शब्दातीत आहे. कल्पनातीत निरंजन!

त्या भिकाऱ्याच्या मुलासारखी तुमची अवस्था होती. त्याला आधी आपण खूप मोठ्या इस्टेटीचे वारस आहोत याची कल्पना नव्हती. जेंव्हा त्याला कोणीतरी याची जाणीव करून दिली तेंव्हा तो त्याच्या संपत्तीच्या ऐश्वर्याने राहू लागला. त्याच्याप्रमाणे तुम्हांलाही तुमच्या ऐश्वर्यसंपन्नतेची कल्पना नव्हती. परंतु आता तुमच्यातील त्या आत्मचैतन्याच्या ओळखीमुळे ती आली तेंव्हा आता त्या योग्यतेने रहा. गुरु म्हणजे साडेतीन हाताचा देह नव्हे. वक्ता आणि श्रोता ही भूमिका आहे. इथे एक दुसऱ्याला आपल्या सारखे करतो. जो वक्ता आपले प्रतिबिंब त्या श्रोत्यांमध्ये पाहत असतो, तो वक्ता महान आहे, वंदनीय आहे, पूजनीय आहे. परंतु आहे कसा? निराकार आहे. हाडामासाचा पुतळा नव्हे. भावातीत आहे, गुणातीत आहे. '**भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि**'

जिथे मन नाही, जिथे अहंकार नाही तिथे तुझी वस्ती आहे, तिथे अलौकिक आनंद आहे. तिथे अभूतपूर्व शांती आहे. त्या शांतीची अनुभूती कशी असेल तिथे शब्द निशब्द होतात. 'शब्दची लागेना कल्पना कल्पु शकेना | कल्पनातीत निरंजना विवेके ओळखावे ||' त्या अनोळख्याची ओळख झाली आणि शेवटी त्या अनोळखी ओळखीमध्ये ओळखीचा लय झाला. शरीर हे माध्यम आहे ही ओळख करून घेण्यासाठीच. कारण देह धारण करण्यापूर्वी ही ओळख अस्तित्वात नव्हती आणि देह विसर्जनानंतर ह्या ओळखीचा लय होणार. जसे जसे तुम्ही खोलवर जाल तशी मौजच मौज आहे. म्हणून त्या आत्मचैतन्याच्या अगदी जवळ जाण्याचा प्रयत्न करा. त्याच्या सानिध्यात रहा. ध्यानधारणेमुळे आतापर्यंत तुम्हांला अज्ञात असलेली तुमची ओळख प्रकट होणार. कल्पना करू शकणार नाही अशी ज्ञानाची गुहा उघडली जाणार. गुरुकृपेने ही आत्मज्ञानाची गुरूकिल्ली तुमच्या हातात आली आहे. किल्ली लावा आणि दार उघडा ! आणि तो क्षण येईल... ज्ञानाच्या त्या लखलखीत प्रकाशात तुम्हांला तुमच्या आत्मस्वरूपाचे दर्शन होईल !

## ९. अंतिम क्षण सुखावह करा

**महाराज:** आपण सर्वजण ध्यानाभ्यास करतो, अध्यात्मावरची पुस्तके वाचतो, विचार करतो, चिंतन, मनन करतो. त्या सगळ्यांचा उद्देश काय? आपण स्वतःचाच शोध घेत आहोत, कशासाठी? या सगळ्यांचा उद्देश एवढाच आहे की देह सोडतेवेळी तो अंतिम क्षण सुखावह व्हावा. 'याचसाठी केला होता अट्टाहास शेवटचा दिस गोड व्हावा.' चैतन्य उद्या या देहापासून वेगळे होईल, तेंव्हा 'मी आता मरणार' ही भावना असता कामा नये. त्या अंतिम क्षणाला तुमची ठाम भूमिका हवी की मी अजन्मा आहे. मला जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. अशी जर तुमची भूमिका असेल तर निश्चितच त्या क्षणाला आनंदाच्या उर्मी येतील आणि शेवट गोड होईल.

सरळ, सोपे असे हे सोलीव ज्ञान आहे. तिथे तर्कवितर्कांना जागा नाही. वादविवादाला जागा नाही. खऱ्या-खोट्याची पडताळणी नाही. कारण इथे काही खरे नाही आणि खोटेही नाही. अंतिम सत्य हे सत्यासत्यतेच्या पलीकडे आहे. अंतिम सत्य !

गेले कित्येक दिवस आपण चर्चा करीत आहोत ती अशा एका मुलाची ज्याचा जन्म झालेला नाही ! आपण सगळी चर्चा; अध्यात्माविषयी असो किंवा तत्त्वज्ञानाविषयी असो; ती त्या न जन्मलेल्या मुलाची कहाणी आहे. कारण इथे काही घडलेच नाही. "अगा जे झालेची नाही त्याची वार्ता पुससि काई." काही घडलेच नाही त्याची आपण चर्चा करतो. इथे तुम्ही सत्याच्या शोधात आहात म्हणून तुम्हांला तुमच्या मुळाशी जाऊन शोध घेतला पाहिजे. तिथे तुम्हांला काय सापडेल? तुमच्या स्वरहित 'स्व' चे अस्तित्व. तुमच्यातच अकळपणे असलेले तुमचे आत्मस्वरुप. नि:शब्दपणे, ऐहीकाचे भान विसरून त्या नीरव शांततेची अनुभूती घ्या.

आपण अगदी तासन्तास, वर्षानुवर्षे जरी या सगळ्यांचा उहापोह केला तरी तुमच्यातील स्वरहित 'स्व'चे अस्तित्व हेच अंतिम सत्य आहे आणि ते निर्विकारपणे तसेच राहील.

**प्रश्नकर्ता:** श्रद्धेविषयी काय सांगाल महाराज? एकदा का तुमचा विश्वास पक्का झाला की सत्य काय ते समजेल मग पुढे काय?

**महाराज:** जरी तुम्हांला अंतिम सत्य काय आहे हे समजले, तुमची श्रद्धा दृढ झाली तरी ध्यान, भक्ती आणि श्रद्धा यात सातत्य राहिले पाहिजे. या तीनही गोष्टींचे सातत्य ही नितांत गरज आहे. कारण भौतिक जगातील कुठल्या आकर्षणाचा तुमच्यावर काही परिणाम होता कामा नये. इथे माझ्याकडे एक सद्भक्त येत असत, अतिशय व्यासंगी होते. अध्यात्मावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अतिशय नम्र आणि प्रामाणिक गृहस्थ ते.

अचानकपणे एकदा ते आपल्या मार्गावर विचलित झाले, राजकारणाकडे वळले. त्यात इतके गुंतले गेले की त्यांना निवडणूक लढवावी असेही वाटले आणि त्यांच्या या गाफिलपणामुळे एक दिवस ते अध्यात्मापासून दूर

फेकले गेले. राजकारणाच्या घाईगर्दीत मग भक्ती, श्रद्धा कशालाच थारा नाही. त्यांच्या आयुष्यात जे काही मिळवायचे होते त्यापासून ते दूर फेकले गेले.

ज्ञानोत्तर भक्ती आणि श्रद्धा यांची नितांत गरज आहे. तुमची नम्रतेची भूमिकासुद्धा त्यायोगे अविचल राहते.

**प्रश्नकर्ता:** महाराज मी आता खूप आनंदात आहे. जवळपास चाळीस वर्षांच्या भटकंतीनंतर मी आता मुक्कामाच्या जवळ आलो आहे, असं वाटतं. काल तर मला मी विदेही अवस्थेत गेल्यासारखे वाटत होते.

**महाराज:** कुठली अवस्था? इथे अवस्था वगैरे काही नाही. तीस वर्ष, चाळीस वर्ष, कोणी गणना केली? देहाचे देहबुद्धीचे विसर्जन करायचे आहे मग विदेही अवस्था कोणाला आली ? तुमची खरी ओळख अनुभवातीत आहे. मग हा अनुभव घेणारा कोण ? कोणाला अनुभव आला ?

अशा प्रकारचे अनुभव येणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु हे अंतिम सत्य नव्हे. तुमच्या प्रगतीमधील हे टप्पे आहेत. जे तुमच्या अध्यात्मिक वाटचालीतील लँडमार्क आहेत. आज तुम्हांला **मी ब्रह्म आहे** असा अनुभव येईल. उद्या सर्वशक्तिमान ईश्वर मी स्वतःच आहे असाही अनुभव येईल. चांगले अनुभव आहेत, परंतु शेवटी ते अनुभव आहेत आणि तुम्ही ते अनुभव घेत आहात याचा अर्थ अजूनही तुमच्या मनातून भ्रमाचे निर्मूलन पूर्णत: झालेले नाही, तुम्ही अजूनही त्यात गुंतून जाऊ शकता. तेंव्हा मी ब्रह्म आहे, ईश्वर आहे अशा प्रकारच्या कोणत्याही अनुभवांना डोक्यात थारा देऊ नका. अशा प्रकारच्या सत्वगुणात्मक अनुभवांचा आपण जेंव्हा स्विकार करतो तेंव्हा नकळत आपल्यामध्ये अहंकाराचा प्रवेश होतो, ज्याला आपण दूर ठेवले पाहिजे. मी ब्रह्म आहे, आत्मा, ईश्वर, परमेश्वर आहे असे अद्‌भुत अनुभव म्हणजे नकळत आपली अहंकाराकडे वाटचाल.

तुमचा स्वयंभू आहेपणा हा निर्गुण निराकार आहे. तिथे अनुभवही नाही आणि अनुभविताही नाही. अशा तऱ्हेच्या अनुभवांनी त्या विमळाला कुठेतरी मलिनता स्पर्श करू पाहते.

म्हणून सतर्क राहणे आवश्यक आहे. स्वतःला अशा अनुभवांपासून दूर ठेवा आणि सतत तुमच्या स्वयंभू अस्तित्वाच्या संगात राहा, त्याच्याशी असंग करु नका !

**प्रश्नकर्ता:** महाराज हे सर्व माझ्या नकळत घडले गेले आणि त्या आनंदाच्या उर्मीत त्या एवढ्या मोठ्या अध्यात्मिक अनुभवात मी वाहून गेलो.

**महाराज:** जेंव्हा तुम्हांला अनुभव येतो, तेंव्हा ते अंतिम सत्य नसते. अंतिम सत्य हे त्याच्यापासून पुष्कळ दूर आहे. जिथे सर्व अस्तित्व, अनुभवांचा शेवट होतो तिथे तुझे असणे आहे. मला ज्ञान झाले आहे, मला साक्षात्कार झाला आहे असे ज्या वेळी लोकांना वाटते तेंव्हा ते निश्चितच अज्ञानाचे लक्षण आहे ! एक तर तो पुस्तकी ज्ञानाचा परिणाम असतो किंवा गुरूंकडून ऐकलेल्या ज्ञानाची पोपटपंची असते. तुम्हांला आईन्स्टाईनच्या शोफर ची गोष्ट माहित असेल. आईन्स्टाईनच्या सहवासात अनेक वर्ष राहिल्यामुळे शोफर सगळ्या प्रश्नांची धडाधड उत्तरं देत होता परंतु काही झाले तरी तो आईन्स्टाईन होऊ शकत नाही. ज्याची त्याला पदवी इतरा न साजे...!

तद्वत न्याये तुम्ही तत्त्वज्ञानाविषयी, अध्यात्माविषयी पुष्कळ पुस्तके वाचाल, अनेक गुरूंकडून ऐकाल आणि पुष्कळ ज्ञान प्राप्त कराल. ह्या सगळ्यांच्या जोरावर तुम्ही ज्ञानावर चर्चा करू शकाल परंतु जेंव्हा तुमच्यावर प्रश्नांची सरबत्ती होईल, तेंव्हा तुम्ही त्यांना उत्तरे देऊ शकणार नाही.

तर हे सर्व परोक्ष ज्ञान आहे. वाचलेले, ऐकलेले. इथे तुम्ही स्वतःचा शोध घेतलेला नाही. आत्मज्ञानच तिथे वगळले गेले आहे. पुष्कळ ज्ञान तुम्ही गोळा केले परंतु हे पदार्थज्ञान आहे, अंतिम सत्य नव्हे.

**प्रश्नकर्ता:** साधनेचा काळ वर्षांमध्ये मोजणे निरर्थक आहे. परंतु साधकांची अध्यात्मिक ज्ञानाची जिज्ञासा, ज्ञानप्राप्तीची तळमळ वाढत्या वयाबरोबर वाढत जाते. माझ्यासारखे अनेक असतील जे सत्याचा शोध मनबुद्धीच्या माध्यमातून प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

**महाराज:** इथे वयोमर्यादा विसरून जायची. तुमच्या अस्तित्वाला काळाचे माप नाही. त्याला तारुण्य नाही की वार्धक्य नाही. इथे आता तुम्हांला गरज आहे ती आतापर्यंत जे जे काही ज्ञान तुम्ही वाचनाने किंवा श्रवणाने प्राप्त केले त्याचे विसर्जन करण्याची ! परंतु लोकांची यासाठी तयारी नसते. मुळात लोकांना देहबुद्धीच सोडायची नसते. मी आत्मज्ञानासाठी तीस वर्षे घालवली, चाळीस वर्षे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला यातच त्यांना धन्यता वाटते ! अंतिम सत्य काय आहे हे त्यांच्याकडून सहजपणे स्विकारले जात नाही. परंतु त्याच्या प्राप्तीसाठीच ही सर्व धडपड चालू असते. किंबहुना आतापर्यंतची त्यांच्या दृष्टीने बुद्धीवर आधारित ज्ञानाची कमाई ही ते सत्य जाणून घेण्यासाठी केलेली अध्यात्मिक गुंतवणूक असते. थोडक्यात काय एकीकडे तुम्हांला या मायिक जगाचे आकर्षण सुटत नाही आणि दुसरीकडे तुम्हांला सत्य काय आहे हे सुद्धा जाणून घेण्याची इच्छा आहे !

**प्रश्नकर्ता:** महाराज गेली वीस वर्ष मी निसर्गदत्त महाराजांच्या शिकवणीचा अभ्यास करीत आहे. कधी कधी मी त्याच्यात गोल गोल फिरतो आहे असं वाटतं. खरोखर त्यांची शिकवण अतिशय प्रभावी आहे. परंतु मला योग्य दिशा सापडत नाही आणि त्यामुळे माझी अगदी थोडीशी प्रगती झाली. झाली नाही म्हटली तरी चालेल आणि मला कदाचित नव्याने माझी अध्यात्मिक ओळख म्हणून नव्या ओळखीची साठवण मी निर्माण केलेली असेल. मला आता हे कळत आहे, गुरु कोणीतरी वेगळे आहेत आणि मी त्यांचा अनुयायी म्हणून वेगळा आहे हा द्वैत भाव अजून गेला नाही.

**महाराज**: तुम्ही निसर्गदत्त महाराजांची पुस्तके वाचलीत. परंतु तुमच्या अंतर्गुरुकडे दुर्लक्ष करत आहात. थोडे अंतर्मुख होऊन विवेक करा की आतापर्यंत जे अध्यात्मज्ञान तुम्ही मिळवले ते तुमच्या शेवटच्या क्षणी मृत्युसमयी काही कामाला येईल का? अशा तऱ्हेने वरवरच्या अभ्यासाने गोळा केलेले ज्ञान हा भ्रमाचा भोपळा आहे. इथे बुद्धीचे काम नाही. गुरूच्या शिकवणीने शाब्दिक कसरतीने नकळत सुक्ष्म अभिमान तुमच्यात शिरकाव करतो. जेंव्हा तुम्ही अमुक एका गुरुचे अनुयायी म्हणवून घेता तेंव्हा तेही नकळत ह्या अहंभावाला पोषक ठरते. वास्तविक गुरु आणि शिष्य वेगळे नाहीत गुरुतत्व एकच आहे. निसर्गदत्त महाराजांमध्ये जे गुरुतत्व आहे तेच तुमच्यामध्येही आहे. तुम्ही गुरुतत्व जाणत नाही. गुरूंचे नाव, त्यांचे रूप याकडे लक्ष देता परंतु गुरु म्हणजे कोणते एक नाव नव्हे कि रूप नव्हे. तिथे व्यक्तिभाव नाही. मग ते निसर्गदत्त महाराज असोत, रणजित महाराज असोत की सिद्धरामेश्वर

महाराज असोत, रमण महर्षी, स्वामी विवेकानंद, शंकराचार्य कोणीही असू देत. आहेपणाच्या आधी ह्या सर्व गुरूंना व्यक्तिगत ओळख होती का? आहेपणाच्या आधी हे सर्व कुठे होते? गुरु जे काही सांगतात त्याचा तुम्ही श्रद्धेने, विश्वासाने स्विकार करत नाही. तुमची बुद्धी तिथे चालवता. त्यांनी हे का सांगितले असेल? त्यांच्या म्हणण्याचा नेमका अर्थ काय असेल? शब्द हे केवळ निर्देशक आहेत त्याचा मतितार्थ काय असेल ते बघा. गुरूंना जे काही सांगायचे आहे, जो संदेश त्यांना द्यायचा आहे त्याच्यावर विश्वास ठेवा, श्रद्धा ठेवा. शब्दांचा कीस काढू नका, काही वर्णन करू नका. मन-बुद्धी-अहंकार बाजूला ठेवा. तुमचे वास्तव ते तुमच्या पुढे ठेवत आहेत. तुमची हकिकत सांगत आहेत. त्याचा स्विकार करा. ही तुमची हकिकत आहे, तुमची खरी ओळख ते करून देत आहेत. अंतिम सत्याची ओळख ही तुमच्या या आध्यात्मिक ज्ञानापेक्षा, या ऐहीक जगात तुम्ही कोणाचे शिष्य आहात यापेक्षा फार फार मौल्यवान गोष्ट आहे, मोजमाप होऊ शकत नाही तिचे. आतापर्यंत तुम्ही पुष्कळ वाचन केलेत, सतत ग्रंथ वाचत आहात परंतु त्या वाचणाऱ्याची हकिकत वाचलीत का? ग्रंथांच्या वाचनामुळेच तुम्ही या ठिकाणी येऊ शकलात. परंतु केवळ हे वाचन, हा अभ्यास पुरेसा नाही. या अभ्यासाच्या मागे तुमची खरी तळमळ कशासाठी आहे याचा शोध घ्या. तुम्हांला निर्भयता, समाधान, सुख का लाभत नाही? मृत्यूची टांगती तलवार सतत तुम्हांला त्रास देत आहे. विवेकाने या सगळ्याच्या मुळाशी जाऊन शोध घ्या. केवळ ह्या गुरुंनी काय सांगितले त्या गुरूंनी काय सांगितले याचा अभ्यास करता करता खरा विद्यार्थी दुर्लक्षितच राहिला ! त्याच्याकडे दुर्लक्ष करू नका. बाहेर सगळ्या गोष्टींचा शोध घेण्यापेक्षा तुमच्या अंतर्यामी जो अनामिक शोधक अदृश्यपणे वास्तव्य करून आहे त्याचा शोध घ्या. त्याच्याशी संग करा. सद्गुरुंनी जे काही सांगितले ते तुम्ही ऐकले आहे. त्यांच्या मुखातून अध्यात्मिक ज्ञान तुम्ही श्रवण केलेत. आता गरज आहे ती त्या अनोळखयाची ओळख करून घेण्याची. माझे सद्गुरू एकदा म्हणाले की, एकदा का त्याची ओळख तुम्हांला झाली की तुम्ही नि:संदेह होणार. तेंव्हा त्या स्वरहित 'स्व' चा शोध घ्या. त्यासाठी ध्यानाची गरज आहे. जो मंत्र तुम्हाला दिला आहे त्याचे निदिध्यासन, भजन या सगळ्यांची आवश्यकता आहे. तुमच्या अंतर्गुरुकडे लक्ष द्या. हे सगळं अगदी तळमळीने आणि श्रद्धेने केलेत तर तुमचा अंतर्गुरु तुमच्यावर प्रसन्न होईल. तुम्ही स्वतःच तुमचे गुरु आहात !

**प्रश्नकर्ता:** मला वाटतं महाराज आम्ही यासाठी खूप कमी पडतो किंबहुना एवढी मोठी झेप घेऊन त्या स्थितीला पोहचण्याची आमची तयारीच नाही आणि आतापर्यंत जे काही मिळवले आहे ते सोडण्याचीही आमची तयारी नाही. अधिक ज्ञान मिळवत राहून आम्ही आमचा अहंकारच वाढवतो. आमचा अहंकार सुखावतो. कदाचित सखोलपणे विवरण करून अभ्यास करण्याची वृत्ती आमच्यात नाही.

**महाराज:** हेच मी सांगत आहे. त्यात कठीण काही नाही. एकदा का तुम्हांला सत्य काय आहे ते कळले की मग त्या दोरी आणि सापाच्या गोष्टीसारखे होणार. जोपर्यंत दोरीच्या ठिकाणी सापाचा भास होता तोपर्यंत भीती होती आणि ती दोरी आहे हे ज्या क्षणाला समजले त्या क्षणी म्हणाल, "अरे मी उगाच घाबरलो, अंधारात मला कळले नाही, साप नाही ही दोरी आहे." एका क्षणात तुम्ही निर्भय झालात. भ्रमाचा निरास झाला. जसा तो भिकारी मुलगा भिक मागत फिरत होता पण जेंव्हा त्याला समजले की तो लक्षाधीश आहे तेंव्हा त्याने भिक मागणे बंद केले !

**प्रश्नकर्ता:** परंतु महाराज आम्ही भिक मागत राहणार, थांबणार नाही. कारण आमचे तीस चाळीस वर्षाचे प्रयत्न निष्फळ ठरतील असे आम्हाला वाटते, कदाचित आतापर्यंतचा शोध फुकट जाईल असे वाटते.

**महाराज:** पुन्हा तुम्ही वर्षामध्ये मोजमाप करत आहात. मोजमाप करणाऱ्या शोधकाला तुम्ही विसरत आहात. मोजमाप करणारा कोण आहे त्याचा शोध घ्या.

**प्रश्नकर्ता:** हा सर्व भ्रम आहे हे मला कळते परंतु ह्या देहाला कालमर्यादा आहेत. कुठल्याही क्षणी फ्युज उडून जाईल याची भीती वाटते आहे. म्हणून हे मोजमाप केले जात आहे.

**महाराज:** तुमचा अंतर्गुरुच परमेश्वर आहे हे सत्य जाणून घ्या. तुम्ही तुमच्या शोधाची वर्षे मोजत आहात. ह्या तुमच्या अध्यात्मिक वाटचालीचा काल, त्यातील सर्व घटना, जिथे जिथे गेलात त्या ठिकाणच्या आठवणी हे सर्व तुम्ही आवडीने आठवता. ह्या सगळ्या आठवणी देहाशी संबंधित आहेत. परंतु ह्यात बसलेला तो परमात्मा, परमेश्वर तुमचा अंतर्गुरु, त्याचा मात्र तुम्हांला किती सहजपणे विसर पडला आहे. मी अमुक करतो तमुक करतो हा अहंकार आहे. सुक्ष्मातिसूक्ष्म अहंकाराचे पूर्णतः निर्मूलन झाले पाहिजे. बऱ्याच वेळा मी हेच सांगतो की कर्तेपणाचा अभिमान घेऊ नका. तुम्ही काही करत नाही आणि काही करू शकणार नाही. इथे कर्ता कोणीच नाही.

**प्रश्नकर्ता:** मला वाटतं आपल्याला गुरु म्हणून किंवा एक शिक्षक म्हणून माझ्यासारख्यांच्या अध्यात्मिक प्रवासाच्या गोष्टींमध्ये काही स्वारस्य नाही.

**महाराज**: इथे जेंव्हा लोक येतात तेंव्हा ते अज्ञानाचा मार्ग सोडून देतात. त्यांच्यातील देहबुद्धी गेली, सत्य काय ते समजले की त्यांना कळतं की गुरु आणि शिष्य तुमच्यातच आहेत. त्या सिंहाप्रमाणे तुम्हांला तुमची खरी ओळख पटली आहे. दिर्घकाळ या देहाच्या संगतीत राहिल्याने सत्याचा स्विकार तुमच्याकडून सहजपणे होत नाही.

**प्रश्नकर्ता:** चोविस तास सतत त्याच ध्यासात राहणं, खरच खूप आश्चर्य वाटतं. कल्पनाच करू शकत नाही.

**महाराज:** तुम्ही चोवीस तास सतत विचार करता आणि तुम्हांला ते मात्र सोपं वाटतं. (हशा)

**प्रश्नकर्ता:** ओके. सतत प्रॅक्टिस करत राहायची. लोक इथं जेंव्हा येतात तेंव्हा प्रथम त्यांना नवल वाटतं. अशा गोष्टींचे आकलन होणं खरच कठीण आहे. ती काही थोड्या वेळापुरती गंमत किंवा खेळ नाही. ध्यानाभ्यास म्हणजे त्यांच्या नेहमीच्या जीवनशैली पेक्षा फार वेगळी गोष्ट आहे. माझ्यासारखा कोणी पाच-दहा मिनिटे फार तर एक दोन तास ध्यान करेल मग बाकी सर्व वेळ हा वेगळ्याच प्रकारे खर्च केला जाणार.

**महाराज:** हे ज्ञान फार सोपं आहे. अतिशय सोपं आहे परंतु मार्गदर्शन करण्यासाठी आत्मज्ञानी गुरुची आवश्यकता आहे. जो तुम्हांला योग्य दिशेने मार्गदर्शन करेल. प्रसंगी अगदी कठोरपणे तुमच्यावर ठसवेल, तुमच्यातल्या त्या अदृश्य अनामिक श्रोत्यास जागृत करेल की तूच ईश्वर, परमेश्वर आहेस अंतिम सत्य आहेस. सतत प्रहार, सतत प्रहार! छिन्नीने घाव घालत घालत शेवटी त्या दगडातून ते शिल्प साकारते, केवलं ज्ञानमूर्ती !

**प्रश्नकर्ता:** प्रहार आणि प्रहार ! सतत मारा चालू राहिला पाहिजे, मला तर याची खरोखरच गरज आहे.

**महाराज:** समोर बसलेल्या ह्या मोठ्या दगडांत देव दडलेला आहे. सद्‌गुरूंचं काम आहे की, नको असलेला भाग काढून टाकायचा. तुम्हांला हे कदाचित आवडणार नाही परंतु थोडे घाव सोसायलाच पाहिजेत. टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडालाही देवपण येणार नाही. गुरु जेंव्हा शाब्दिक छिन्नीने नको असलेला भाग काढून टाकतात, तुमच्यातील अज्ञान काढून टाकतात तेंव्हा तुम्ही धैर्याने ते सोसले पाहिजे. अध्यात्म तुमच्या जीवनाला आकार देणार आहे. तेंव्हा ज्या काही अडचणी येतील, अडथळे येतील त्याला धैर्याने तोंड दिले पाहिजे. छोट्या-मोठ्या अडचणींचा बाऊ करण्यात काही अर्थ नाही.

**प्रश्नकर्ता:** महाराज आपले ज्ञान हे अतिशय प्रभावी आणि परिवर्तनशील आहे. अतिशय सोलीव ज्ञान आहे. सगळ्या भ्रामक कल्पनांना छेद देणारे आणि तरीसुद्धा वास्तवाचे भान ठेवणारे. काही अवडंबर नाही सरळ शुद्ध ज्ञान. यापूर्वी कधी असे ज्ञान ऐकले नाही ! सगळ्या जुनाट कल्पना, दांभिकपणा सगळ्यांना भेदून टाकणारे आहे.

**महाराज:** ही सर्व माझ्या सद्‌गुरूंची, निसर्गदत्त महाराजांची कृपा !

## १०. अलौकिक आनंद

**प्रश्नकर्ता:** महाराज आम्हांला अंतिम सत्याविषयी स्वरहित 'स्व' विषयी अधिक जाणून घ्यायचे आहे. इथे आपण म्हणालात की त्यामध्ये खूप मौज आहे.

**महाराज:** प्रत्येकाला यामध्ये एक वेगळा आनंद मिळतो. प्रत्येकाची पार्श्वभूमी वेगळी असते. त्यामुळे तुम्ही हे अंतिम सत्य जाणून घेताना ते प्रत्येकाला एका वेगव्याच पद्धतीने उघडले जाईल. उदाहरणार्थ तुम्हांला एखाद्या ठिकाणी जायचे असेल आणि जर तुमच्याकडे पत्ता असेल तर तुम्ही मुक्कामाला पोहोचू शकता. एकदा का तुम्ही त्या ठिकाणी मुक्कामी पोचलात तर तुम्हांला खूप आनंद होतो. तुम्हांला जेंव्हा तुमच्या मुक्कामाचे स्थान माहित असते आणि तिथे तुम्ही पोहोचता तेंव्हा तिथे आनंदच आनंद असतो. अवर्णनीय आनंद. तुम्ही तो व्यक्त करू शकत नाही. सातत्याने केलेले प्रयत्न, श्रद्धा, शोध घेण्यासाठी निदिध्यास, ज्ञानार्जनाची तळमळ या सगळ्यांचा परिपाक होऊन अंतिम सत्य तुम्हांला ज्ञात होते तेंव्हा तुम्हांला अत्यानंद होतो. अरे ज्याच्या शोधात होतो ते सत्य मला सापडले. मी स्वतःच ते आहे. ते स्वयंभू चैतन्य मीच आहे ! तुमच्या देहबुद्धीचा तुम्हांला त्या क्षणी विसर पडतो. तुम्ही देहरूपानेच असता, परंतु ज्याच्यासाठी तुम्ही अट्टाहास केला, अथक परिश्रम केलेत त्या तुमच्या ध्येयप्राप्तीचा आनंद तुम्हाला होतो. ज्याचा मी शोध घेत होतो ते स्वयंसिद्ध अनामिक चैतन्य माझ्यातच अदृश्यपणे आहे हे सुद्धा तुम्हांला कळेल. शोधकाचा शोध झाला. अशा वेळी झालेला तो आनंद अवर्णनीय, शब्दातीत असेल. "तेथे शब्दची लागेना."

रामदास स्वामी एके ठिकाणी म्हणतात, "मुक्याने गुळ खादला गोडी न ये सांगायला !" तुम्हांला अंतिम सत्याची ओळख झाल्यानंतर तुमची स्थितीही अशीच असणार. आनंदच आनंद. त्याचे वर्णन तुम्ही करू शकणार नाहीत. त्या आनंदात तुम्हांला जे अतीव समाधान, शांती मिळेल. ते सर्व शब्दातीत असेल, तुमची वाणी कुंठीत होईल. हेच ते विश्रांती स्थान. जिथे शब्द पोहोचू शकत नाहीत. यतो वाचा निवर्तन्ते अप्राप्यमनसा सह !

तुम्हांला समजावून सांगण्यासाठी शब्दांचा वापर करावा लागतो. पण शब्दशः अर्थ घेऊ नका. तिथे स्थळ नाही, काळ नाही. तिथे साक्षित्व नाही, साक्षित्व करणारा नाही, अनुभव नाही, अनुभविता नाही. तुमच्या देहाशी तुम्हांला अलिप्तता जाणवेल. देहाशी संबंधित कोणत्या गोष्टींमध्ये तुम्हांला रस वाटणार नाही. केवळ, अलौकिक, अवर्णनीय अशी शांती तुम्हांला अंतर्यामी जाणवेल.

देह आहे म्हणून तुमचा जगाशी संबंध आहे. देह आहे म्हणून ज्ञानाची गरज आहे. ज्ञान आणि भारवाही शब्द हे तुम्हांला फक्त सत्याचा शोध घेण्यासाठी मदत करतात. परंतु ते अंतिम सत्य नव्हे. शब्दज्ञान वगैरे सर्व देह असेपर्यंत. एकदा का देहाचे विसर्जन झाले की त्याबरोबर सर्वकाही विसर्जित होते. तुमच्या सर्व शंका ह्या देहबुद्धीशी निगडीत आहेत. शरीर धारण केले म्हणून मन, बुद्धी, अहंकार सर्व आले. व्यक्त जोपर्यंत अव्यक्त होते तोपर्यंत त्या स्वयंस्फूर्त चैतन्याला व्यक्तिव नव्हते. मी तू पणा हा काही नव्हता. मी पण आल्यावर मग मी ब्रह्म आहे, मी आत्मा आहे, सर्वकाही आले परंतु ब्रम्ह, आत्मा यांचा मात्र कोणाला ठाव माहित नाही ! अंतिम सत्य स्वरहित

'स्व' तुमच्यात अदृश्यपणे वस्ती करणाऱ्या त्या अनामिक स्वयंभू चैतन्याचे निर्देशक आहेत. मात्र एकदा का ती अनोळखी ओळख ओळखीत आली की मग त्या पलीकडे काही नाही, त्या व्यतिरिक्त काहीच नाही.

तेंव्हा निश्चय पक्का करा, निर्धार करा. आता पुन्हा आणखी ज्ञान गोळा करणे सोडून द्या. हा सर्व खटाटोप कशासाठी? कोणासाठी? संपत्ती समाधान कोणाला पाहिजे?

त्या अदृश्याला, अव्यक्ताला कशाचीच गरज नाही. अजन्मा आहेस तू. तुला जन्मच नाही ! मग हे सर्व न जन्मलेल्या मुलांसाठी गोळा करण्यासारखे आहे. परंतु हे कळण्यासाठी तुमची भूमिका ठाम झाली पाहिजे. सिद्धरामेश्वर महाराज म्हणत असत 'ठी' बसली पाहिजे. मगच तुमचे भौतिक जगाचे आकर्षण कमी होईल. तुम्हांला केवळ आणि केवळ त्या निखळ अभूतपूर्व शांतीची ओढ लागेल. अशी शांती जिचे तुम्ही शब्दात वर्णन करू शकणार नाही. जसे त्या मुक्याने गुळ खाल्ला परंतु त्याला गोडी सांगता येईना. मुक्याची गोष्ट सोडलीत, तरी एखाद्याने सांगितलं गुळ गोड लागला तरी गोड म्हणजे काय हे कसे समजणार? तुम्हांला स्वतःलाच खाऊन पाहावा लागेल. दुसऱ्याने केलेल्या वर्णनावरून तुम्ही विसंबून चालत नाही. तुम्ही स्वतः पडताळणी करून तुमची खात्री पटवून घेणे हे महत्त्वाचे. दुसऱ्याच्या सांगण्यावर विसंबून राहू नका. सर्व आध्यात्मिक ग्रंथ आणि त्यातील ज्ञान हे देहाशी संबंधित आहे. ब्रह्म, आत्मा, परमात्मा,देव,ईश्वर,जन्ममृत्यू, पुनर्जन्म, प्रारब्ध असे पुष्कळ शब्द आहेत. परंतु ते सर्व देहाशी संबंधित आहेत. परंतु तुमचे अस्तित्व त्या सगळ्यांच्या पलिकडे आहे.

तुमच्या चैतन्याच्या सभोवार हे शब्द पसरलेले आहेत. त्या संपूर्ण जगाचा, या संपूर्ण विश्वाचा केंद्रबिंदू तुझे 'स्व'पण आहे. तुझ्या जागेत हे जग सामावलेले आहे ! तुझी हजेरी नाही तर जग नाही. बाहेर जे जे दृष्य दिसते ते तुझ्या आहेपणाचा अविष्कार आहे. तेंव्हा सर्व नित्याचे व्यवहार करा तुमची कर्तव्ये पार पाडा, फक्त ते कर्तेपणा न घेता करा. मी करतो हा अभिमान घेऊ नका. हे ज्ञान तुम्ही दुसऱ्यांना, ज्यांना गरज आहे त्यांना देऊ शकता परंतु अभिमान धरू नका. अध्यात्मज्ञानाला मर्यादा आहे. त्या मर्यादित वर्तुळाचा भेद करून तुम्हांला बाहेर पडायचे आहे. त्यासाठी तुमचा आत्मविश्वास दृढतर पाहिजे. तुम्ही तुमचा स्वतःचा शोध घेत आहात. यासाठी धैर्य पाहिजे, निर्भयता पाहिजे.

आतापर्यंत तुम्ही तुम्हांला देह रूपाने ओळखत होता. आता तुम्हांला तुमच्या खऱ्या ओळखीची खूण पटली. तेंव्हा आता चर्चा वाद-विवाद यामध्ये अडकू नका. मला वाईट वाटतं लोक एवढ्या लांबून कष्टाने इथे येतात, सर्व ऐकतात आणि इथून गेल्यानंतर पुन्हा त्या चक्रात अडकतात. पुन्हा इथे जा, तिथे जा सुरू होतं !

दुसऱ्या गुरुकडे जा, दुसऱ्या धार्मिक स्थळांना भेटी द्या हरकत नाही, परंतु या सर्वातून तुम्हांला काय प्राप्त होणार? कुठेही जा, कोणताही धार्मिक विधी करा, परंतु त्यातून तुम्हांला कोणती अपेक्षा असता कामा नये.

हल्लीच एक गृहस्थ माझ्याकडे तिरुवन्नमलईहुन आले होते. त्यांनी अरुणाचलला (डोंगराला) पुष्कळ प्रदक्षिणा घातल्या, मध्ये कुठे न थांबता. बराच काळ गुहेत राहुन घालवला. शरीराला पुष्कळ कष्ट दिले. तुम्ही तुमच्या ओळखीत येण्याआधी कुठल्या गुहेत राहिला होता का? अरुणाचलला फेऱ्या मारणे, गुहेत राहणे हे सर्व कल्पनेचे खेळ आहेत. कोणाच्या तरी डोक्यात कल्पना आली आणि मग बाकीच्यांनी ती स्विकारली आणि मग

प्रथा सुरू झाली. आंधळेपणाने सगळं स्विकारलं, काहीही विवेक न करता. अध्यात्माची आवड निर्माण होणं मुळात दुर्मिळ गोष्ट आहे. लाखातून कोणा एकाला अशी बुद्धी होते. फार दुर्मिळ गोष्ट आहे ही आणि असे असूनही जो कोणी तीस-तीस, चाळीस-चाळीस वर्ष हा अभ्यास करतात त्यांनी काय साधले? इतकी वर्षे खर्च करून अजून त्यांच्यात निर्भयता आली नाही. मृत्यूचे भय त्यांच्यातून गेले नाही.

**प्रश्नकर्ता:** त्यांना त्यांच्या अध्यात्मज्ञानाचा उपयोग का झाला नाही?

**महाराज:** कारण त्यांच्या ज्ञानाचा पाया देह आधारित आहे. देह बुद्धीमुळे त्या अध्यात्मज्ञानाबरोबर सूक्ष्म अहंकार पोसला गेला. मी धार्मिक कर्मकांड केली, मी जपतप केले इत्यादी. शिवाय तिथे शब्दज्ञानात अडकतात, चर्चा वाद-विवाद सगळे शाब्दिक खेळ आहेत.

**प्रश्नकर्ता:** केसाचा गुंता सोडवण्यासारखे!

## ११. स्वरूपज्ञान हे शब्दांच्या पलीकडे आहे

**महाराज:** बुद्धीचा कस लावून शब्दांचा कीस काढायचा, बौद्धिक निकष लावून अध्यात्मावर, स्वरूपज्ञानावर चर्चा करायच्या, वाद-विवाद करायचे, ह्या सगळ्यांचा स्वरूपज्ञानाशी काहीही संबंध नाही. मन-बुद्धीच्या पलीकडे आहे ते. तिथे बुद्धीचे काम नाही. तुमच्या आहेपणाच्या आधी तुम्ही कसे होता? याचे तुम्ही वर्णन करू शकता का? तिथे शब्द नव्हते, कशाचे ज्ञान नव्हते. काहीच नव्हते, म्हणजेच 'काही नाही' तिथे शब्द काय वर्णन करणार? शरीर आहे तोपर्यंत या सगळ्यांची गरज आहे. परंतु हे दृश्य एकदा अदृश्य झाले मग त्या नंतर पुढे काय? एकदा ते चैतन्य ह्या देहातून निघून गेले मग त्या शरीराला कशाची गरज आहे?

जेंव्हा तुमची तुमच्यामधील त्या अनामिक चैतन्याशी मिठी पडेल त्या वेळी तुम्हांला त्या सगळ्यांचा फोलपणा कळून येईल. अंतिम सत्य जाणलेत, तुमची बैठक पक्की झाली की मग तुम्हांला कशाचीच गरज भासणार नाही. ना शांतीची, ना कुठल्या सुखाची. सुख-शांती ह्यांची गरज या देहाला आहे. कळतेपणापूर्वी त्या चैतन्याला कशाची गरज नव्हती. पण देहाच्या ओळखीने जो कळतेपणा आला तो सहन होण्यासाठी सगळ्या गरजा निर्माण झाल्या. गरजा गर्जू लागल्या ! परंतु ज्या क्षणाला तुम्हांला तुमची खरी ओळख होईल तेंव्हा हे शरीर शेजारच्या मुलासारखे वाटू लागेल. शेजारच्या मुलाला काही झाले तरी तुम्ही ज्या अलिप्ततेने पहाता तीच अलिप्तता या शरीराच्या सुखदुःखा विषयी असेल. हे शरीर माझे आहे पण हे शरीर म्हणजे मी नव्हे याची खात्री होईल. हे जे वैराग्य आहे ते आत्मज्ञानाचे लक्षण आहे.

**प्रश्नकर्ता:** असे वैराग्य येण्यापूर्वी हे शरीर म्हणजे आपली हक्काची मालमत्ता आहे अशीच भावना असणार.

**महाराज:** नक्कीच. परंतु इथे मालकी हक्क तुमचा नाही. ही पंचभुताची गाठोडी आहे. तुम्ही भाड्याच्या घरात राहत आहात ! शरीराचे पोषण होण्यासाठी अन्न, पाणी, हवा ह्या सर्वांचा पुरवठा हया पंचभुतांपासून होतो, तो पुरवठा करण्याचे माध्यम तुम्ही आहात. एक ना एक दिवस हया पुरवठ्याची मुदत संपली मग काय?

**प्रश्नकर्ता:** ह्या घरातून तुम्ही बाहेर काढले जाणार.

**महाराज:** हे घर नाही आहे, हा पिंजरा आहे. त्यात बसून तुम्ही गाजर खात आहात. मग तो पिंजरा सोन्याचा असेल, चांदीचा असेल, नाहीतर पितळेचा असेल. ज्याच्या वाट्याला जसा येईल तसा, श्रीमंतांचा सोन्याचा असेल, गरीबाचा लोखंडाचा असेल.

**प्रश्नकर्ता:** पण शेवटी तो पिंजराच.

**महाराज:** आणि त्या पिंजऱ्याच्या आत जो पक्षी आहे, ते तुमचे अनामिक, अदृश्य, स्वयंस्फूर्त स्व-स्वरूप ! आत्मचैतन्य ! त्या चैतन्याची ओळख झाली की तुम्ही स्वतःच त्या पिंजऱ्याचे दार उघडून बाहेर पडणार आहात. वास्तविक तुम्ही मुक्तच आहात. तुमच्या पंखांना बळ द्यायचं काम माझं आहे. पिंजऱ्यातून बाहेर पडून स्वैरपणे भरारी घ्या त्या चिदाकाशात !

वेगवेगळ्या कथा सांगून, अनेक उदाहरणे देऊन शब्दांचा वापर करून तुमचा आत्मविश्वास जागृत करावा लागतो. परंतु शेवटी हे सर्व अध्यात्मज्ञान, सर्व शास्त्रे म्हणजे त्या मुलाविषयी चर्चा आहेत त्याचा जन्मच झालेला नाही !

सुरुवातीला लोक ऐकतात, सुरुवातीला उत्साह असतो, जाणून घेण्याची इच्छा असते, परंतु पुढे मग त्या अंतिम सत्याचा शोध घेण्याची तळमळ, खोलवर जाऊन विवेक करणे त्यामध्ये फारच थोड्यांना रस असतो. बरेच जण शाब्दिक ज्ञानामध्ये अडकतात.

सर्वसाधारणपणे अंतर्मुख होऊन आत्मशांतीची, आत्मज्ञानाची प्राप्ती करून घेण्याकडे लोकांचा कल नसतो. या उलट पूर्वापार देहबुध्दीला धरून चाललेले मार्गच त्यांना जास्त जवळचे वाटतात. अंतिम सत्याचा शोध घेण्याऐवजी ते अंतिम सत्या विषयी चर्चा करण्यात, वादविवाद करण्यात धन्यता मानतात. हे सर्व व्यर्थ आहे. 'अंतिम सत्य' हा चर्चेचा, वादविवादाचा विषय नव्हे. यासाठी सर्वांना माझा एकच प्रश्न असतो, आतापर्यंत जे काही तुम्ही वाचलेत त्यातून काय निष्कर्ष काढले? इतक्या सर्व वाचनाने तुमच्यात निर्भयता आली का? आणि आलीच असेल तर मृत्यूच्या वेळी घबराट होता कामा नये. अजूनही तुमच्यावर भीतीचे सावट असेल तर आतापर्यंत केलेली पुस्तकीज्ञानाची कमाई फुकट गेली. भीतीने गर्भगळीत होणे हे ज्ञान्याचे लक्षण नव्हे ! मृत्यूच्या क्षणी तुमच्या ज्ञानाचा तुम्हांला उपयोग झाला पाहिजे. संतांना मृत्यूचे भय नाही. म्हणून संत नामदेव म्हणतात, "काळ देहासी आला खावू आम्ही आनंदे नाचू गाऊ." अशी निर्भयता पाहिजे. अध्यात्मिक ज्ञानाने निर्भयता येते आणि अंतिमतः अलौकिक अभूतपूर्व शांती आणि समाधान लाभते. जेंव्हा तुमच्या खिशात काही पैसे नसतात तेंव्हा तुम्हांला चोरांची भीती नसते. ये बाबा, खुशाल! माझा खिसा रिकामा आहे. ही परिस्थिती शेवटच्या क्षणाला असली पाहिजे. एकदा का तुमची आत्मज्ञानाची बैठक पक्की झाली की मृत्यूच्या क्षणी तुमची हीच स्थिती असेल. नाशिवंत शरीर आहे, आज ना उद्या ते सोडावेच लागणार, या गोष्टीचे तुम्हांला सतत भान ठेवले पाहिजे.

स्व-स्वरूपाचा शोध घेण्यासाठी या देहाचा उपयोग तुम्ही करून घ्या. यासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. अन्यथा पुन्हा एकदा हे स्वप्न पडेल. पुन्हा स्वप्न... पुन्हा स्वप्न...त्या जन्ममृत्युच्या दुष्टचक्रात तुम्ही सापडणार. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम्.' तुम्हांला तुमच्या आत्मनिश्चयाच्या बळावर या दुष्टचक्राचा भेद करायचा आहे, कारण ज्याचा शोध तुम्ही घेत आहात ते अंतिम सत्य तुम्ही स्वतःच आहात ! जन्म-मृत्यू, पाप-पुण्य अशा कुठल्याही कल्पनांना बळी पडू नका. आंधळेपणाने कशावरही सही करू नका ! भौतिक जगातील शक्तींचे आघात, अध्यात्मिक शास्त्रांचे निकष, मन-बुद्धी-अहंकार या योगाने तुम्ही निर्माण केलेल्या कल्पना यापैकी कोणत्याही गोष्टींचा अंतिम सत्याच्या प्राप्तीमध्ये अडथळा येऊ देऊ नका. स्वरुप प्राप्तीच्या ध्येयापासून तसूभरही ढळू नका. जगात अनेक गुरू आहेत. अध्यात्माच्या त्यांच्या कल्पना तुम्ही आंधळेपणाने स्विकाराव्यात असे त्यांना अपेक्षित असते. परंतु तुमची अध्यात्माची बैठक आता पक्की झालेली आहे. तेंव्हा तुम्ही आंधळेपणाने कशाचाही स्विकार करणार नाही. कधीही हे शक्य नाही, केवळ अशक्य ! ज्ञानाचा आरसा आता तुमच्या हातात दिलेला आहे त्यामुळे योग्य काय, अयोग्य काय, ग्राह्य काय आणि त्याज्य काय हे

तुम्ही ठरवू शकणार. ज्ञान आणि विवेक यांच्या योगाने तुम्ही तुमचा आत्मस्थितीचा निश्चय दृढतर करायचा आहे. एकदा आत्मस्थिती निश्चयाची झाली की शब्दांचा डोलारा म्हणजे अंतिम सत्य नव्हे ही तुमची भूमिका स्वच्छ आणि स्पष्ट असेल. शब्दांच्या सापळ्यात अडकू नका. पुन्हा पुन्हा का सांगतो कारण अनेक जणांना असे अडकलेले मी पाहिले आहे.

**प्रश्नकर्ता:** महाराज मी खात्रीपूर्वक आपल्याला सांगतो की, मी स्वतः पुस्तकी ज्ञानात किंवा दुसऱ्या कोणा गुरुकडे जाण्यात कधीच अडकणार नाही. आपण माझ्याविषयी निश्चिंत राहा. देहाच्या संकल्पनेने संग्रहित केलेल्या ह्या ज्ञानाला मर्यादा आहेत. आपल्याकडे आल्यानंतर यापूर्वी कधीही झाले नाही एवढे आत्मज्ञान उघड झाले असताना पुस्तकी ज्ञानाची गरज भासणार नाही.

**महाराजः** उत्तम ! शब्दांची निर्मिती आपण केली. शब्दांना अर्थ आपण दिले. आता बघा, देवाला देव हा शब्द आपण दिला. गाढवाला गाढव शब्द आपणच दिला. हे जर आपण उलट केले असते तर देवाला गाढव शब्द दिला असता आणि गाढवाला देव म्हटलं असतं तर ! तेंव्हा शब्द महत्वाचे नाहीत. त्यांचा अर्थ, त्यांच्या मागचा आशय महत्वाचा. तेंव्हा शब्द विसरा आणि शब्दातीत असलेल्या तुमच्या आत्मचैतन्याशी मैत्री करा. सतत त्याच्या संगतीत रहा. आणि आत्मज्ञानाचा, अध्यात्मज्ञानाचा अभूतपूर्व आनंद भोगा. शांत व्हा. सुखी व्हा.

## १२. स्वरहित 'स्व' च्या संगतीत रहा

**महाराज:** अजूनही तुमच्या मनावर अनेक कल्पनांचा पगडा आहे. अनेक मायिक विचारांना कुठेतरी थारा आहे. त्या सगळ्यांचे विसर्जन झाले पाहिजे. मन आहे तिथे विचार येणारच. परंतु विवेकाने त्यांचे निर्मूलन करायला हवे. या सर्व बाह्य आवरणाचा संग न धरता त्या नि:संगाशी संग करा. त्या आत्मचैतन्याशी एकरुप व्हा. त्याला सर्वांगे शरण जा. नेहमीच मी सांगत असतो, देह आधारित ज्ञानाचे विसर्जन झाल्याशिवाय अंतिम सत्य आविष्कृत होणार नाही. त्यासाठी आपणच आपल्याला शिस्त लावली पाहिजे. ध्यानधारणा, मंत्राचा जप, जप म्हणजे त्या मंत्राचा निदिध्यास, भजन या सगळ्या गोष्टींचे पालन केले पाहिजे. भजनाने ते आत्मचैतन्य संतुष्ट होते. देहबुद्धीचा विसर पडतो. आता तुम्ही अशा स्थितीला पोहोचला आहात की तुमच्या अंतर्यामी तो अग्नि धगधगत आहे. आत्यंतिक तळमळ जाणवत आहे. पूर्वी कधीही नाही इतकी प्रचंड ओढ तुम्हांला अंतिम सत्याप्रत जाण्यासाठी लागली आहे. उगमाकडे जाण्यासाठी आत्यंतिक तळमळ लागली आहे. शंकासूर मेला आणि तुम्ही स्वतःला समर्पित केले आहे. आता तुम्हांला या पासून कोणी परावृत्त करू शकत नाही. फक्त दोन गोष्टींची आवश्यकता आहे. एक तुमची गुरु श्रद्धा आणि दुसरा तुमचा आत्मविश्वास.

**प्रश्नकर्ता:** आपण म्हणता ते खरंच आहे. मला अंतिम सत्य जाणून घेण्याची खूप तळमळ लागली आहे. मला यासाठी आणखी खोलवर जाऊन शोध घ्यायचा आहे. मला आता पुष्कळ गोष्टी उघड होत आहेत.

**महाराज:** प्रथमतः तुमची भूमिका एका शोधकाची होती, अंतिम सत्याचा शोध. मग त्याचा ध्यास तुम्हांला लागला. अत्यंत श्रध्देने तुम्ही त्या ध्येयामागे लागलात आणि शेवटी तुम्हांला सुगावा लागला की ज्याचा शोध तुम्ही घेत आहात ते अंतिम सत्य, ते शुद्ध चैतन्य तुमच्यातच आहे. परंतु आता तुम्ही त्याच्यावर जी कल्पनेची आवरणं आहेत ती दूर करुन ते जास्तीत जास्त उघड करायचे आहे. हे कधी होणार? जेंव्हा ते ज्ञान तुमच्यामध्ये मुरेल. थोडा वेळ लागेल परंतु तुमची भूमिका स्पष्ट, ठाम आणि निश्चित होईल. हळू हळू तुमच्यातील देहबुद्धीच्या खुणा संपूर्णतः नाहीशा होतील. स्वपणा गेल्यावर त्या शुद्ध चैतन्याचे स्वरहित 'स्व' चे दर्शन होईल. तुमच्या शिवाय तुम्ही ! नेहमी सतर्क रहा, सावध रहा, त्या मायेमध्ये पुन्हा गुंतू नका. एखाद्या गिर्यारोहकासारखी तुमची भूमिका आहे, शिखराच्या टोकाजवळ आलेले आहात. तेंव्हा मागे बघणे नाही. थोडे जरी इकडे तिकडे पाहिलेत तरी एकाग्रता ढळेल तेंव्हा सावध रहा. आजूबाजूला घटना घडतील घडू द्या तुम्ही विचलित होऊ नका, बुद्धीला ताण देऊ नका. आपसया सर्व होणार आहे. विश्वास ठेवा. श्रध्दा बाळगा ती अमृतवेल हळु हळु वाढत आहे. आतापर्यंत जे काही माझ्याकडून ऐकलेत ते तुमच्यामध्ये मुरले आहे आणि तुमच्या विश्वासाने तुमची भूमिका निश्चित झाली आहे. त्यामुळे त्या अंतिम सत्याचा स्वयंस्फूर्त आविष्कार, आत्मज्ञानाचा उद्भव त्याला कोणतेही नाव द्या, नावाला महत्त्व नाही, तुमच्यामध्ये सत्याचा उद्भव होईलच आणि तुमची खात्री होईल की तुमचे अंतिम सत्य तुम्ही स्वतःच आहात 'मी' तेच आहे "
I Am That !"

**प्रश्नकर्ता:** महाराज पूर्वी आपल्यापासून वेगळे असल्याची भावना होती. पण आता ती गेली आहे. आपण नेहमी सांगता की तुमच्यातील अदृश्य वक्ता आणि माझ्यातील अदृश्य श्रोता दोन्ही एकच आहेत. आता मला ते खरोखरच पटले आहे. दोघांचे विलीनीकरण झाले आहे. आपल्यात मी आहे आणि माझ्यामध्ये आपण आहात !

**महाराज:** चांगलं आहे. चांगलं चिन्ह आहे. विलीनीकरण एकत्वाचे द्योतक आहे. एकत्व आधीपासूनच आहे. परंतु मायिक कल्पनांनी झाकले गेले होते एवढेच!

**प्रश्नकर्ता:** महाराज एक दिवस ध्यानधारणेच्या वेळी मला आपले दर्शन झाले. त्यावेळी आपले अध्यात्मिक तेज प्रखरतेने जाणवले.

**महाराज:** ते तेज आणि शक्ती तुमची स्वतःची होती ! तुमच्यातूनच त्यांचा उद्भव झाला. गुरु आणि शिष्य यांच्यामध्ये जेंव्हा एकत्व येते तेंव्हा अशी अध्यात्मिक शक्ती, तेज यांची अनुभूती येते. मार्गदर्शनामुळे तुम्ही तुमच्या अंतर्गुरुच्या जवळ जवळ येत असता आणि जवळीक निर्माण झाल्यावर तुम्हांला कळते की आपला अंतर्गुरु हा आपला सर्वात जवळचा मित्र आहे. मित्र आहे कायम विश्वासाईता असलेला.

**प्रश्नकर्ता:** महाराज आपण गुरु म्हणजे शिल्पकार असे म्हणता. घाव घालून, घालून नको असलेला भाग काढून टाकणारा, माझ्याबाबतीत खरोखरच त्याचा प्रत्यय मला येत आहे. माझ्यातील सर्व नको असलेल्या कल्पना आपल्या ज्ञानामुळे नाहीशा झाल्या. माझ्यातील स्वरूपावर आलेली मायेची सर्व आवरणं जाऊन आता ते चैतन्य उघड होत आहे. अगदी पूर्णतः नाही तरी बऱ्याच प्रमाणात ! आपण कधी घणाघाती घाव घालून तर कधी खोलवर छिन्नीने कोरुन कोरुन नको असलेल्या सर्व गोष्टींचे निरसन केले. आश्चर्यकारक आहे. केवळ अद्भुत ! आनंदाच्या उर्मी येत आहेत. मला अगदी एकशे एक टक्के खात्री आहे की तो क्षण जवळच आहे. जेंव्हा माझ्यातील अनामिक अदृश्य चैतन्य स्वयंप्रकाशाने उत्स्फूर्तपणे प्रकट होईल.

**महाराज:** तुमची उत्कट भक्ती आणि श्रद्धा पाहून मला फार आनंद वाटला. अध्यात्मामध्ये इतकी उत्कट भक्ती दुर्मिळ आहे. याचे सर्व श्रेय माझ्या सदगुरुंना निसर्गदत्त महाराजांना आहे. मी काही करत नाही. कर्ते करविते माझे सदगुरू आहेत. इथे तुम्हांला मी काही नविन सांगत नाही. तुमच्यामध्ये सुप्तावस्थेत असलेल्या चैतन्याला जागृत करतो. ह्या ज्ञानाचे, अंतिम सत्याचे मालक तुम्हीच आहात. मी फक्त बाह्य गुरुचे काम करतो.

**प्रश्नकर्ता:** महाराज आपण जेंव्हा सांगत होता की तुमच्या आत तो अग्नी धगधगत आहे. फक्त तो झाकला गेला आहे. कल्पनांची राख गोळा झालेली आहे ते खरंच होतं महाराज. सतत विचारांचे काहूर असायचे. बिलकुल उसंत नसायची, काही ना काही आठवणी डोकावत असायच्या. आता सर्व बदलत आहे. फार कमी विचार येतात. थोडक्यात सांगायचे तर एक प्रकारचा रितेपणा आलेला आहे. पण त्याचबरोबर अपार शांती आणि समाधान याची अनुभूती येत आहे. अग्नीवरची राख उडून गेली आहे आणि त्या राखेऐवजी अवर्णनीय आनंद पसरून राहिला आहे. महाराज जी काही अनुभूती येत आहे तिचा आनंद हा शब्दाने वर्णनच होऊ शकणार नाही. आनंदाच्या पलीकडे आहे ते, सर्व शब्दाने वर्णन होऊच शकत नाही. खूप कृतज्ञ आहे महाराज मी आपला आणि जेंव्हा जेंव्हा मी या

भावनेने आपल्या चरणाशी नतमस्तक होतो तेंव्हा तेंव्हा आपल्या विषयी माझ्या मनात अपार आदर आणि कृतज्ञता असते.

**महाराजः** जेंव्हा तुम्ही गुरूंना नमस्कार करता तेंव्हा तो नमस्कार स्वरहित 'स्व' ला असतो. यासाठी तुम्ही स्वतःलाच नमस्कार करा. तुमच्यातील आत्मचैतन्याशी जवळीक करा. सतत त्याच्या संगतीत राहा. मी तुमच्या अंतर्गुरुला जागृत करत असतो. त्याला बोलतं करतो. तुमच्या अंतर्गुरुशी संवाद साधा. त्याला तुमच्या शंका विचारा. तुमच्या शंकांचे निरसन होईल. तुमचा अंतर्गुरु तुम्हांला प्रतिसाद देईल आणि सुचना देईल. तो तुम्हांला सतत मार्गदर्शन करेल. त्याला घट्ट मिठी मारा. त्याच्याशी अतूट मैत्री करा. तुम्ही स्वतःच ते अंतिम सत्य आहात याची तुम्हांला खात्री झाली. आता शब्दांचा खटाटोप संपला. ज्ञानाचा उपयोगही संपला. जसे अज्ञान भ्रम आहे तसे ज्ञानही भ्रमच आहे ! एका काट्याने दुसरा काटा आपण काढत असतो. काटा निघाला की दोन्ही काटे फेकून देतो. ज्ञानाने अज्ञानाचे निरसन झाले, आता दोन्ही विसर्जन करायचे ! मायेपासून अंतिम सत्यापर्यंतचा प्रवास आता संपलेला आहे. सुरुवात, शेवट, सुरुवातीपासून शेवटपर्यंत केलेला प्रवास यापैकी कशालाच आता थारा नाही. निःशब्दाच्या इथे शब्दांचेही काम नाही. त्यामुळे सगळे शब्द सुद्धा बाजूला ठेवा आणि केवळ त्या निःसंगाचा संग धरा. शांत रहा, आनंदी रहा आणि त्या अभूतपूर्व शांतीची अनुभूती घ्या. अमृतानुभव आहे तो. या अमृतप्राशनाने नशा चढली पाहिजे. त्या नशेत, त्या ऐश्वर्यात रहा!

**प्रश्नकर्ताः** महाराज आपण मला नमस्काराविषयी आधी जे सांगितले, ते मी ऐकले परंतु आपल्या विषयीची कृतज्ञता माझ्यात खोलवर रुजली आहे. ती इतकी उचंबळून येते की मला नमस्कार करण्यापासून, मी मला थांबवू शकत नाही.

**महाराजः** ठीक आहे. अशीच श्रद्धा ठेवा. भक्ती आणि श्रद्धा एकमेकांना पूरक आहेत. श्रद्धेमुळे अंगी नम्रता बाणते. भक्तीशिवाय ज्ञान कोरडे आहे, व्यर्थ आहे. याशिवाय भक्तीमध्ये एक आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या सद्गुरूंनी आपल्याला अंतिम सत्य दाखवून दिले आहे त्यांच्याविषयी अशी उत्स्फूर्त कृतज्ञता वाटणे साहजिकच आहे. सद्गुरु निसर्गदत्त महाराज अध्यात्माचे सार एकाच वाक्यात सांगत असत, "तुझ्या आत्मज्ञाना वेगळा अन्य देव, ईश्वर, परमेश्वर दुसरा कोणी नाही." तेंव्हा ईश्वर, परमेश्वर तुम्हीच आहात. ब्रम्ह, आत्मा, परमात्मा, ईश्वर, परमेश्वर यापैकी काहीही म्हणा ते तुम्हीच आहात. म्हणण्याची आवश्यकता नाही, तेंव्हा त्याच्या संगतीत रहा.

# १३. आत्मज्ञानी व्हा

**महाराज:** तत्त्वज्ञान किंवा अध्यात्मज्ञान यांच्यावर प्रभूत्व मिळवण्यापेक्षा आत्मज्ञानी व्हा ! आम्ही सांगतो हे ज्ञान पुस्तकी ज्ञान नाही. ज्याची त्याने अनुभूती घ्यायची आहे. त्यामुळे तुम्ही स्वतःच स्वतःचे गुरु व्हा ! प्रश्नकर्ते तुम्हीच आहात आणि प्रश्नांचे उत्तर देणारेही तुम्हीच आहात. इथे एकत्व आहे, दुजेपणा नाही, गुरुही नाही, शिष्यही नाही, श्रोताही नाही आणि वक्ताही नाही. वेगवेगळी घरे आहेत. परंतु वर आकाश एकच आहे. तशी वेगवेगळी शरीरे आहेत परंतु ते चैतन्य एकच आहे. अंतिम सत्यापर्यंत पोहोचेपर्यंत काही अडथळे येतील त्यासाठी तुम्हांला कठोरपणे त्या अडथळयांबरोबर सामना करावा लागेल. तुम्ही तुमच्या भूमिकेवर अढळ राहिल्यानंतर तुम्हांला ते कठीण जाणार नाही. छोटी मोठी वादळं येणार, त्यांना तुम्ही सामोरे जालच. कधी भूकंप होईल पण त्यासाठी ही तुमची तयारी असेल कारण तुम्हांला शिकवणच अशी मिळाली आहे की तुम्ही कुठल्याही संकटावर मात करू शकाल. तुम्ही धीरोदात्तपणे म्हणू शकाल, येऊ द्या संकटे मी घाबरत नाही. ध्यानाभ्यास आणि भक्ती व भजन यांचा हा परिणाम आहे. भक्ती मध्ये शक्ती असते तुम्ही शक्तिमान आहात. सर्वशक्तिमान परमेश्वर तुम्हीच आहात !

**प्रश्नकर्ता:** हो महाराज, मला स्वतःलाच मी अविनाशी आहे याची जाणीव होते. अंतर्गत ज्या काही गोष्टी चालत असतात त्या खरोखरच आश्चर्यकारक आहेत. असं वाटतं की आपण तारांगणात आहोत. आता कोणाच्याही सहवासाची गरज नाही.

**महाराज:** ही सर्व प्रगतीची लक्षणे आहेत. तुम्हांला ध्यानधारणेच्या वेळी कधी ताऱ्यांचे दर्शन होतील, कधी देवदेवतांची दर्शनं होतील, काही आश्चर्यकारक चमत्कारांचे अनुभवही येथील. प्रगतीचे टप्पे आहेत हे. अंतिम सत्याकडे तुमची वाटचाल यशस्वीरित्या योग्य दिशेने चालली आहे. अशा वेळी तुम्हांला अंतर्यामी एका वेगळ्याच आनंदाची अनुभूती येते. त्यामुळे तुम्हांला दुसऱ्या कोणाचा सहवास नकोसा वाटतो.

तेंव्हा आता तुम्ही तुमच्या सहवासात रहा. 'Be With You.' आत्मचैतन्याशी मैत्री करा. त्याच्याशी जवळीक करा. संवाद साधा. बोलू लागेल ते तुमच्याशी ! इतकी गाढ श्रद्धा ठेवा की हृदयाला जाऊन भिडेल. तुमच्याच अंतर्यामी असलेले सत्य उघड होईपर्यंत तुम्हांला हे सर्व करणे आवश्यक आहे. त्यायोगे तुम्हांला ते परिपूर्ण समाधान आणि अलौकिक शांती प्राप्त होईल.

थोडक्यात तुम्हीच ते अंतिम सत्य आहात. स्वरहित 'स्व' हीच तुमची ओळख आहे. यासाठी विचारांना, कल्पनांना थारा न देता विवेक केला पाहिजे. रामदास स्वामींनी दासबोधामध्ये भक्ती, ज्ञान, वैराग्य सगळं काही सांगून स्वरूपज्ञानापर्यंत पोहोचण्याचा मार्ग दाखवला आणि शेवटी सांगितले 'ऐसी ही विवेकाची कामे उगाची भ्रमो नये भ्रमे' आत्मज्ञान हे विवेकाचा परिपाक आहे.

**प्रश्नकर्ता:** महाराज जेंव्हा मी दासबोध वाचनाच्या वेळी ध्यानाला बसतो तेंव्हा मन भावुक होते. वास्तविक भाषा मराठी असते. अर्थ काही समजत नाही. तरी कधी कधी डोळ्यात अश्रू येतात.

**महाराज:** तुम्हांला ती भाषा समजत नाही परंतु तुमच्या आतील चैतन्याला ती समजते. तुमच्या अंतर्मनाला तुमच्या हृदयाला ती स्पर्श करते.

**प्रश्नकर्ता:** मी ते ऐकत असतांना त्याच्या बरोबर वाहत जातो. ते ऐकताना एक प्रकारची कंपनं जाणवतात, प्रेरणा मिळते.

**महाराज:** माझ्या सद्‌गुरूंनी मला वाचन कसे करायचे हे शिकविले. त्यांचे म्हणणे असे की वाचताना प्रत्येक शब्दाचा उच्चार स्पष्ट पाहिजे, शिवाय वाचनात त्याचा अर्थ प्रतिबिंबित झाला पाहिजे. जवळजवळ पाच वर्षे रोज सकाळी मी दासबोध वाचन केले आहे. मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो की मला माझ्या सद्‌गुरुंच्या सहवासात राहता आले.

**प्रश्नकर्ता:** आणि आता आम्ही भाग्यवान समजतो आम्हाला महाराज ! भजनाविषयी आपण थोडे स्पष्टीकरण कराल का?

**महाराज:** आपल्या दैनंदिन प्रार्थना, भजनं, भक्तिपर गीते हे सर्व केंव्हाही चांगलेच. त्याने तुमचा भाव उद्दीपीत होतो. त्या चैतन्याला त्याची आवड आहे, कारण अशा श्रवणाने त्याला आनंद मिळतो. शांती लाभते. भजनात रंगल्यानंतर बाह्य जगाचा विसर पडतो आणि तुम्ही त्या चैतन्याशी एकरूप होता. तिथे ना अनुभव ना अनुभविता, ना साक्षी ना साक्षित्व केवळ एकत्व ! श्रीकृष्ण भगवान म्हणतात की, 'नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये न च | मद्‌भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामी नारद ||'

जसे जसे तुम्ही भक्तीमध्ये मुरत जाल तसा तसा तुम्हांला अलौकीक आनंद प्राप्त होईल. त्याचे वर्णन करता येणार नाही. कोणते ग्रंथ वाचून त्याची प्राप्ती होणार नाही. कारण या आनंदाचे स्त्रोत तुम्ही स्वत: च आहात. ते अंतिम सत्य तुम्हीच आहात.

**प्रश्नकर्ता:** आपली शिकवण अत्यंत दुर्मिळ अशी आहे महाराज.

**महाराज**: ही सर्व माझ्या सद्‌गुरूंची कृपा आहे. त्यांच्याकडून मला जे ज्ञान मिळाले तेच तुमच्यापर्यंत पोहोचवत आहे. ज्ञानाची ही गुहा तुमच्यासाठी उघडली आहे. आता हा खजिना लुटणे तुमच्यावर अवलंबून आहे. जास्तीत जास्त, जेवढे घेता येईल तेवढे घ्या.

**प्रश्नकर्ता:** मी खूप प्रतीक्षा केली आहे महाराज. तेंव्हा त्या पेटाऱ्यासहित सर्व रत्नांची लूट करणार.

**महाराज:** तुम्ही चांगल्या प्रकारे पोहायला शिकला आहात. आता सूर मारून खोलवर, आणखी आणखी खोलवर जा आणि त्या ज्ञानसागरात मनसोक्त विहार करा !

# १४. अंतिम सत्याच्या ठिकाणी विचार नाहीत

**महाराज:** तुमच्या प्रश्नांची उत्तरे देताना मी विचार करत नाही. प्रश्नांची उत्तरे सहजरित्या आतून येतात. तुमच्यात सुद्धा तीच शक्ती आहे. अंतिम सत्य एकदा समजले, तुमची भूमिका ठाम झाली की तुमच्यातील चैतन्य बोलू लागेल. सगळे संत रमण महर्षि, सिद्धरामेश्वर महाराज, निसर्गदत्त महाराज स्वरूप ज्ञानाच्या स्थिर बैठकी वरून बोलले, त्यांनी जे आत्मज्ञान सांगितले ते स्वतः भोगून सांगितले. त्यामुळे त्यांना काही विचार करावा लागला नाही. ते ज्ञान त्यांच्या वाणीतून उत्स्फूर्तपणे वाहत होते. स्वरूपज्ञान झाल्यानंतर मग तिथे कल्पना, विचार, तर्कवितर्क काही सुद्धा राहत नाही फक्त विचाररहित अंतिम सत्य.

**प्रश्नकर्ता:** काही युक्तिवाद नाही.

**महाराज:** काहीच नाही. कोणतेही माध्यम नाही. साधे सरळ सोपे आहे. आपण भ्रमाच्या दुनियेत वावरत आहोत. सगळ्या गोष्टींचा दबाव आहे आपल्यावर. मन, बुद्धी, अहंकार, ग्रंथाचे वाचन यातून काढलेले अर्थ, चुकीचे तर्कवितर्क, शंका-कुशंका या सगळ्यांच्या प्रभावामुळे आपण दबून गेलो आहोत. त्या चैतन्यावर हे सर्व ढग गोळा झाले आहेत. आपणच आपल्याला या जाळ्यामध्ये अडकवून घेतले आहे. त्यातून आपल्याला बाहेर पडायचे आहे. आता या निर्वाणीच्या वेळी तुम्हांला या सगळ्या गोष्टींपासून दूर राहायला हवे, त्यांचा काहीही टच न घेता. येथे ज्ञान नाही आणि कोणी ज्ञानी नाही, अनुभव नाही आणि अनुभविता ही नाही. आहेपणाच्या आधी आणि आहेपणाच्यानंतर हे शब्दप्रयोगही नाहीत. कारण आहेपणाच्या आधीही काही नाही आणि आहेपणाच्या नंतरही काही नाही. तेंव्हा आता सर्व शब्द विसरून जा. त्यांचं काहीच काम नाही.

**प्रश्नकर्ता:** याच्यात स्वरहित 'स्व' चा सुद्धा समावेश आहे का?

**महाराज:** नक्कीच. हे सर्व शब्द आहेत. अंतिम सत्याचे निर्देशक आहेत. अंतिम सत्य नव्हे ! ते आता तुम्हांला निर्विवादपणे समजले आहे.

**प्रश्नकर्ता:** सरळ सहज असूनही स्वरूप ज्ञान ही किती दुर्मिळ गोष्ट आहे.

**महाराज:** म्हणूनच म्हटले आहे की "लाख मे एक कोटी मे देख." लाखात एखाद्याला आत्मज्ञानाविषयी जाणून घ्यावेसे वाटते आणि कोटी मधून एखादा श्रद्धावान असा निघतो की तो त्याच्या प्राप्तीसाठी स्वतःला सर्वस्वी वाहून घेतो.

**प्रश्नकर्ता:** महाराज ही जागृती येण्यामध्ये या भौतिक जगात हजारो अडथळे येत असतील नाही का?

**महाराज:** हजारो अडथळे नाहीत. फक्त एक आणि एकच अडथळा आहे तो म्हणजे "तुम्ही आहात" हा तुमचा भ्रम ! तुम्ही तुम्हांला एक व्यक्ती म्हणून ओळखता याशिवाय काहीच अडचण नाही आणि या वेगळा दुसरा काही भ्रमही नाही. पुन्हा एकदा नीट ऐकून ठेवा व्यक्ती म्हणून तुमची तुम्ही स्वतः करून घेतलेली ओळख हा एकमेव अडथळा आहे. तुम्ही स्वतः निर्माण केलेला अडथळा !

**प्रश्नकर्ता:** आम्ही स्वतः त्याला बळी पडलो आहोत. आपण एकदा म्हणालात की, त्या चैतन्याची शांती तुम्हीच बिघडवता. खरच महाराज माझ्या अशांतीला कारण मी म्हणजेच माझे विचार आहेत.

**महाराज:** बरोबर आहे. आपण स्वतः जाळे निर्माण करतो आणि त्यात स्वतःला अडकवून घेतो. जन्माला येण्यापूर्वी ह्या काही अडचणी होत्या का? नाही. समजा तुम्हांला कधी आलीच एखादी अडचण तर तुम्ही सावध रहा, सतर्क रहा. त्या घटनेचं साक्षित्व करा आणि एक अनुभव म्हणून विसरून जा. नंतर तुमची पक्की खात्री होईल की या सर्व घटनांपासून तुम्ही तुमच्या खऱ्या ओळखीमुळे अलिप्त आहात.

**प्रश्नकर्ता:** याचा अर्थ आम्हाला आपल्याकडून जे कमांडो ट्रेनिंग मिळाले आहे त्यामुळे आम्ही कमालीचे सतर्क असणार. आम्हाला कधीच असुरक्षित वाटणार नाही.

**महाराज:** आकाशात कधी ढग येणार. कधी आकाश निरभ्र असणार. निरभ्र असेल तेंव्हा सगळीकडे स्वच्छ सूर्यप्रकाश दिसेल आणि ढग असतील तेंव्हा प्रकाश नसेल. परंतु या सर्व गोष्टी कायमस्वरूपी नसतात. तद्वत न्याये हे सुख-दुःख, शांती-अशांती, उदासीनता ह्या क्षणिक गोष्टी आहेत. चैतन्यावर आलेले ढग आहेत हे. त्यामुळे तुमच्यावर त्याचा काही परिणाम होणार नाही. तुम्ही तटस्थपणे ती स्विकारणार. ज्यावेळी तुम्ही गाडीत बसता तेंव्हा गाडी चालू असते, गाडी धावत असते आणि झाडे पळत आहेत असे वाटते. परंतु तुम्ही जागेवर शांत बसलेले असता. वाटेत काही चांगली दृश्य दिसतात, काही वाईट दृश्ये दिसतात परंतु तुम्ही ती संथपणे पाहता. गोंधळून जाऊ नका. फार सरळ सोपे ज्ञान आहे हे. तुमच्या रोजच्या व्यवहारात हे जर उपयोगात आणले तर तुम्ही उत्तम रितीने तुमची कर्तव्ये पार पाडाल. विचार सारखे वाहत असतात कधी ते चांगले असतील, कधी वाईट असतील. प्रसंग कधी सुखाचे असतील, कधी दुःखाचे असतील. परंतु तुम्ही हे सर्व साक्षीभावाने पहाल. कारण तुम्हांला माहित आहे की हा सर्व मायेचा खेळ आहे. कोणत्याही क्षणी तुम्ही सावध असाल, तुम्हांला त्याच्याशी काहीही देणे-घेणे नसेल.

तुम्ही त्या मायेचे बंदे नाहीत. तुम्ही मालक आहात. तुम्ही ठरवणार कोणत्या गोष्टींना किती महत्त्व द्यायचे ते. नको असलेल्या गोष्टींकडे नेहमी दुर्लक्ष करायचे. नाही तर त्या दुःखाला कारणीभूत होतात. एखादे लहान मूल बघा, पडलं तर आपोआप उठून चालायला लागतं. पण जर आपण त्याच्याकडे लक्ष दिले तर ते रडायला लागतं, नाटक सुरू होतं ! मानसिकता आहे तशी आणि ती खरी आहे. तेंव्हा लक्षात ठेवा जर घडणाऱ्या घटनांकडे दुर्लक्ष कराल तर काही त्रास होणार नाही. परंतु लक्ष द्याल तर त्या त्रासदायक होतील.

ज्या क्षणाला देहबुद्धीचे विसर्जन होईल तो क्षण हा आनंदाचा आणि परम शांतीचा असेल. निसर्गदत्त महाराज एकदा म्हणाले, 'माझ्यावर खूप संकटे आली परंतु मी कोणाकडून कसलीही अपेक्षा ठेवली नाही. कारण मी त्या घटनांकडे एक स्वप्न म्हणून पाहिले आणि जेंव्हा जाग आली तेंव्हा ते अंतिम सत्य कळले.' जोपर्यंत तुमच्यावरचा मायेचा, मन, बुद्धी, अहंकार याचा प्रभाव जात नाही तोपर्यंत समस्या उद्भवणारच. वास्तवात मन नाही, बुद्धी नाही, अहंकार नाही, काहीच नाही. नाहीपणातून त्या सगळ्यांचा उदधव झाला आहे आणि नाहीपणातच सगळ्यांचा लय होणार आहे.

ज्याला अंतिम सत्य काय हे कळले आहे, स्वरूपज्ञान झाले आहे त्याने देहबुद्धीचे विसर्जन केले आहे. त्यामुळे देहाशी संबंधित कोणत्याही विचारांचा, विकारांचा काही परिणाम त्याच्यावर होणार नाही. तो तटस्थपणे त्यांच्याकडे पाहणार.

अशा रीतीने रोजच्या रोज जीवनात तुम्ही या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. ज्ञानाचा दिवा तुमच्या हातात दिला आहे. त्याच्या प्रकाशात मार्गक्रमण करा.

## १५. गुरुकिल्ली मिळाली आहे त्याचा आनंद घ्या

**महाराज:** इथे जे ज्ञान ज्ञान दिलं जातं त्याला व्यक्तित्वाचे वलय नाही. त्याला व्यक्तत्वाचे अधिष्ठान आहे. सांप्रदायातील परम दयाळु सद्गुरुंनी ते ज्ञान अतिशय उदारतेने त्याच बरोबर नम्रतेने आणि निरपेक्षतेने दुसऱ्यांना दिले. स्वतःला जरासुध्दा मोठेपणा घेतला नाही. हे चित्र तुम्हांला इतरत्र कुठेही दिसणार नाही.

म्हणून मी सुद्धा मला कोणी मोठा गुरू आहे असं समजत नाही. मी एकच करतो माझ्या सद्गुरूंनी मला जे ज्ञान दिले ते तुमच्या पर्यंत पोहोचवण्याचे काम करतो. त्या ज्ञानाची गुरुकिल्ली तुम्हांला मिळाली आहे. तिचा उपयोग करा, आणि तो आनंद भोगा. याव्यतिरिक्त आणखी काय पाहिजे? तेंव्हा भौतिक जगाच्या भ्रमातून स्वतःची सुटका करून घ्या आणि त्या आत्मचैतन्याला, स्वस्वरूपाला चिकटून राहा. ज्या अंतिम सत्याच्या शोधासाठी एवढा अट्टाहास केलात ते अंतिम सत्य तुम्ही स्वतःच आहात !

तुमचे विचार, तुमच्या भावना हे सर्व देहाला अनुलक्षून आहेत. समुद्रावर लाटा येतात आणि जातात परंतु समुद्र अचल आहे, अढळ आहे. तद्वत न्याये कितीही विचार आले-गेले तरी तुमचे अस्तित्व अचल आणि अढळ आहे. सिनेमा चालू असताना पडद्यावर अनेक दृश्यं येतात आणि जातात परंतु पडदा स्थिर असतो. त्या सिनेमा सारखा सर्व जगाचा व्यवहार चालू आहे. तो तुमच्या चैतन्याचा आविष्कार आहे. या जादूनगरीचा जादूगार तूच आहेस हां !

आता ज्ञान झाल्यानंतर ज्ञानोत्तर भक्तीचे महत्त्वही समजून घ्या. आमच्या सांप्रदायातील सर्व सद्गुरु भाऊसाहेब महाराज, सिद्धरामेश्वर महाराज, निसर्गदत्त महाराज या सर्वांची सद्गुरुंवर अपार श्रद्धा होती. अशा श्रद्धेने आणि आत्यंतिक जिव्हाळ्याने जेंव्हा तुम्ही सद्गुरूंशी एकरुप होता, तेंव्हा तुमच्यातील अंतर्गुरु जागृत होतो, प्रसन्न होतो. तुमच्यातील आत्मज्ञान नदीच्या प्रवाहाप्रमाणे उत्स्फूर्तपणे वाहू लागते. काही सायास न करता. तिथे मग तर्कवितर्कांचे मोठमोठ्या शब्दांचे, दाखल्यांचे काही काम नाही.

लोकं तुमच्या पायावर डोकं ठेवतात, नतमस्तक होतात. 'देव माणूस आहे हा' म्हणतात. मी जे काही सांगतो ह्या कल्पित कथा नाहीत, वास्तव आहे. सर्व महान सद्गुरूंच्या बाबतीत हेच घडलेले आहे.

सद्गुरु भक्तीमध्ये झोकून दिले पाहिजे, स्वतःला सर्वांगे शरण गेले पाहिजे. कुठलीही तडजोड नाही तिथं. मी आणि माझा सद्गुरु बस्स ! असे जेंव्हा घडेल तेंव्हा त्या सद्गुरुंची महानता तुम्हांला प्राप्त होईल. निसर्गदत्त महाराज म्हणत मी तुम्हांला शिष्य बनवत नाही, तर गुरुच बनवतो !

**प्रश्नकर्ता:** एक प्रकारे हा शक्तिपात म्हणता येईल का?

**महाराज:** गुरु शिष्यांमध्ये असे एकत्व जेंव्हा येईल, तेंव्हा मग तुम्हांला जी अनुभूती येईल ती अद्‌भुत असेल. अभूतपूर्व शांती आणि समाधान मिळेल. बाह्य गोष्टींचे आकर्षण, अडथळे, भीती सगळ्यांपासून तुम्ही फार फार अलिप्त असाल. आपल्यामध्ये आपण मुरल्यानंतर एक प्रकारच्या निजानंदाच्या नशेत तुम्ही असता. त्या सुखाला, त्या आनंदाला बाह्य साधनांची गरज नाही. आपल्या अंतर्यामातून निर्माण झालेला तो आनंदसागर, स्व-निर्मित

अपार, अभूतपूर्व शांती ! तिथे कुठलाही दुजेपणा नसतो. तुमचा स्वतःचा लय तुमच्यातच झालेला असतो. 'ते सुख काय सांगू वाचे बोलता न ये'.

## १६. चैतन्याच्या सानिध्यात राहा

**महाराज**: ज्ञान एकदा तुमच्यामध्ये मुरले की तुमचा आत्मविश्वास आपसया दृढ होतो. तरी सुध्दा अंतिम सत्य काय आहे हे जरी कळाले, तरी देहबुध्दी पूर्णत: गेली नाही तर त्या अंतिम सत्यापासून तुम्ही वेगळे आहात असेच वाटणार, हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. देहबुध्दीचे संपूर्णत: विसर्जन झाले पाहिजे, नाही तर ती सूक्ष्मपणे अडथळा बनुन उभी राहते.

**प्रश्नकर्ता**: होय महाराज, मला खरोखरच परवा ध्यानामध्ये अगदी हीच जाणीव झाली. मला असं वाटलं की आपली देहबुध्दी सुटली की नाही, काही गोष्टी राहिल्या का आणि मग मला कुठेतरी जाणवले की देहबुध्दीच्या पुसटश्या काही खुणा जरी राहिल्या तरी, त्या अंतीम सत्याकडे जाण्यासाठी आपण म्हटल्याप्रमाणे अडथळा निर्माण करु शकतात.

**महाराज**: तुमच्यातील त्या स्वयंस्फूर्त चैतन्याशी तुम्ही सर्वांगे सम‍र्पित व्हायला पाहिजे. त्याच्याशी एकरुप व्हायला पाहिजे. असे झाले की तुमच्यामध्ये द्वैतभाव काही राहणार नाही. गुरु तुम्हीच असणार आणि शिष्यही तुम्हीच असणार. देवही तुम्ही आणि भक्तही तुम्ही. सर्व काही तुमच्यातच आहे. कारण यापूर्वी जसे तुम्हांला सांगितले की तुमच्यामध्ये असलेल्या स्वयंस्फूर्त अनामिक, अदृष्य चैतन्याशिवाय तुम्ही जग पाहूच शकत नाही. हे सर्व जग तुमच्यातील चैतन्याचा आविष्कार आहे. जगाचा जनक तू आहेस, जगन्नाथ आहेस तू ! देहधारण केल्यापासून कितीतरी कल्पनांनी तुमच्यात शिरकाव केलेला आहे आणि त्या त्रासदायकच ठरतात. अंतीम सत्य समजल्यानंतर त्यांचा प्रभाव हळुहळु कमी होतो. त्यांचे निर्मुलन होण्यासाठी सद्‌गुरुंचे मार्गदर्शन पाहिजे. मी जे काही सांगतो ते आचरणात आणा. जुन्या सगळ्या बऱ्या वाईट आठवणी पुसून जाण्यासाठी ध्यान हे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हांला जो मंत्र दिला आहे, त्याचा अर्थ आहे, 'मी ब्रम्ह आहे.' याचा सतत मारा त्या चैतन्यावर झाला की ते चैतन्य तद्रुप, तदाकार होते.

**प्रश्नकर्ता**: मी कुठेतरी असं वाचलं की संताच्या संगतीत राहणे फायदेशीर ठरते.

**महाराज**: संतसंग धरा म्हणजे संत संगतीत रहा. संत-संगती म्हणजे संतलोकांची संगत नव्हे तर तुमच्यातील त्या स्वयंभू चैतन्याच्या, स्वरहित 'स्व'च्या, जे सतत तुमच्यामध्ये आहे, ज्याच्या शिवाय तुम्हांला अस्तित्वच नाही त्याच्या संगतीत रहा ! केवळ स्पष्टीकरण करण्यासाठी ही चर्चा आहे. परंतु आत्मज्ञान सांगोवांगीची गोष्ट नाही. ज्ञानाचा सर्वांगे स्विकार करुन ते मुरले पाहिजे. यासाठीच आम्ही वेगवेगळया दृष्टिकोनातून, निरनिराळी उदाहरणे देऊन, प्रसंगी कथा सांगून ते ठसवण्याचा प्रयत्न करतो. कितीही सांगितले, कोणत्याही प्रकारे सांगितले तरी सत्य एकच आहे. स्वरहित 'स्व' हेच अंतिम सत्य आहे. हे सत्य तुमचे सत्य आहे. ऐकणाऱ्याची हकिकत आहे ही. तेंव्हा हे

बिंबवून घेण्यासाठी, ठसण्यासाठी सतर्क रहा, सजग रहा, ध्यास लागला पाहिजे त्याचा. असे करता करता ते अंतिम सत्य तुमच्या नकळत कधी उघडे होईल ते तुम्हांला समजणार नाही. लोक निरनिराळ्या पवित्र नद्यांमध्ये जाऊन स्नान करतात, तीर्थक्षेत्रांना जातात, धार्मिक विधी करतात, व्रत-वैकल्ये करतात. परंतु अशा प्रकारे देहाला कष्ट देऊन, यातना देऊन काहीही प्राप्त होत नाही. कारण हे सर्व मार्ग देहबुध्दीला अनुलक्षून आहेत. ते अंतिम सत्याकडे जाणारे नाहीत. लोक त्या सगळ्या गोष्टी इतक्या विश्वासाने स्विकारतात हे खरोखरच आश्चर्यजनक आहे. त्यांना कळत नाही की त्या बाह्य उपचारांचा काही उपयोग होणार नाही, सर्व काही तुमच्यातच आहे. तुमच्यातूनच सर्व उद्भवले आहे. तुमची भुमिका आता निश्चित झाली आहे त्यामुळे तुम्ही अशा प्रकारच्या कोणत्याही गोष्टींना बळी पडणार नाही. याचा अर्थ असा नाही की तुम्ही कुठे जाणार नाही. जाल, परंतु तिथे जाऊन मला काही प्राप्त होईल, आत्मज्ञान होईल अशी तुमची अपेक्षा असणार नाही.

**प्रश्नकर्ता**: ऋषिकेश?

**महाराज**: ओऽऽ ऋषिकेश. भारतात उत्तरे पासून दक्षिणेच्या टोकापर्यंत अनेक पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत. यावर्षी आमच्या नाशिकमध्ये सुध्दा कुंभमेळा आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक पवित्र स्नानासाठी गर्दी करणार, लोक तीर्थयात्रा करतात, परंतु त्या तीर्थयात्रा करणाऱ्याकडे पहात नाहीत, तो दुर्लक्षितच राहतो ! कारण काय त्यांना ती दृष्टीच नाही. तुमच्या भाग्याने तुम्हांला गुरुंकडून ही ज्ञानदृष्टी मिळालेली आहे. सदगुरुंनी तुम्हांला ज्ञानाचा चष्मा दिला आहे. ज्यायोगे तुम्ही स्व-स्वरुपाला पाहू शकता. सर्व जग हे तुझ्यातील अदृष्य अनामिक स्वयंभू चैतन्याचा आविष्कार आहे हे एकदा समजल्यानंतर इकडे तिकडे भटकंती कशासाठी? यासाठी मी नेहमी सांगतो की ज्ञान कळणे सोपे आहे. पण स्विकारणे, अंगी बाणणे कठीण आहे. कारण तुम्ही भ्रमाच्या दुनियेतच वावरत असता, तेंव्हा सावध रहा, मायेच्या सापळ्यात स्वतःला अडकवून घेऊ नका. लक्षात ठेवा की, ह्या मायाजाळाचे निर्माते सुध्दा तुम्हीच आहात. या मायारुपी बाळाला तुम्हीच जन्माला घातले, 'ब्रम्हा, विष्णू, महेश' माझ्या पोटीचे बाळ म्हटले आहे ! तेंव्हा सर्व सोडून तुमच्या स्वरहित 'स्व'च्या संगतीत रहा.

## १७. तुमचा आनंद तोच माझा आनंद

**प्रश्नकर्ता**: मला आता कळले आहे की माझ्यातील स्वयंस्फूर्त आत्मचैतन्याशिवाय मी काहीच करु शकत नाही. मला जे ज्ञान प्राप्त झाले असे वाटत आहे त्याच्यात मी खोलवर जाण्याचा प्रयत्न करीत आहे. स्वयंभू आत्मचैतन्याइतकी महत्त्वाची गोष्ट दुसरी कोणतीच असू शकत नाही. जागेपणी आणि स्वप्नामध्ये मनाचे व्यापार चालूच असतात. खूप सखोलतेने मी या सर्वांचे साक्षीत्व करीत असतो. जे काही ज्ञान मला मिळाले, जी काही जाण आली ती अंतर्यामी खोल वर रुजत आहे परंतू असे काही क्षण येतात, की मी देहबुध्दीवर येतो. देहबुध्दी पूर्णत: जाऊन, आत्मज्ञान अंगीभूत होऊन ठसण्यासाठी आशिर्वाद, कृपा यांची आवश्यकता आहे का?

**महाराज**: काही गरज नाही, तुम्ही स्त्री किंवा पुरुष आहात हे जसे तुम्हांला समजले, तसेच ते उत्स्फूर्तपणे तुम्हांला कळणार आहे.

**प्रश्नकर्ता**: महाराज आपण जसे जसे सर्व घडणार असे सांगितले तसेच सर्व आता घडते आहे.

**महाराज**: काही घडत नाही आणि काही घडणारही नाही !

**प्रश्नकर्ता**: मला माझी भुमिका आता निश्चित झाल्यासारखी वाटत आहे. परंतु ती कायम तशीच राहील की नाही, याची खात्री मला कशी होणार?

**महाराज**: त्यासाठी ध्यानधारणा, सद्‌गुरुंनी दिलेला मंत्र, भक्तीपर भजने या सर्व गोष्टींची गरज आहे. तुमच्यातील चैतन्य ह्या सर्व गोष्टी उत्स्फूर्तपणे स्विकारते. दैवी शक्तीचे स्त्रोत तुम्ही स्वत:च आहात.

**प्रश्नकर्ता**: सर्व समज खोल वर रुजली आहे, तरी कुठेतरी शंका येते, देव कोठे आहे?

**महाराज**: मी जे काही सांगितले आहे ते नीट लक्षात घ्या. देव हे नाव त्या दैवी शक्तीला त्या चैतन्यालाच दिलेले आहे. परंतु 'देव' म्हणायला तुझी हजेरी अगोदर पाहिजे ना!

**प्रश्नकर्ता**: कधी कधी मला माझे अस्वित्व जाणवत नाही. परंतु जेंव्हा मी काम करायला जातो तेंव्हा मग पुन्हा देहबुध्दीवर येतो. मग मला अस्वस्थ वाटायला लागते. महाराज आत्मज्ञानाची बैठक पक्की होण्यासाठी दिर्घ कालावधी लागेल का?

**महाराज**: बिलकुल वेळ लगणार नाही, ज्या क्षणाला तुम्हाला अंतीम सत्य काय आहे हे कळणार, त्याच क्षणी तुमची बैठक ठाम होणार, त्यासाठी तुमचा पाया चांगला आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

**प्रश्नकर्ता**: महाराज सद्‌गुरुंचे आशीर्वाद सतत आपल्याबरोबर असतात. सिध्दरामेश्वर महाराजांच्या जयंतीदिवशी मला हे प्रकर्षाने जाणवले आणि मला कळून आले की गुरुकृपा ही केव्हांही असतेच. गुरु सतत तुमच्या बरोबरच असतात, पण ह्याची अनुभूती घ्यायला तशी दृष्टी लागते. आतापर्यंत मला बाहेर असलेल्या देवाची पूजा करायला, त्याची प्रार्थना करायला शिकवले गेले.परंतू आता माझी खात्री झाली की कोण कोणाची पूजा करणार? आता मी

पूजेच्या वेळी अतिशय भक्तीभावाने, श्रध्देने पूजा करतो बस्स ! काही मागणे नसते, कारण कोण कोणाकडे काय मागणार? त्या सर्वशक्तीमान चैतन्यशक्तीचे फक्त आभार मानतो, तिचे स्तवन करतो, पूजा करतो, मागणे काही नाही.

**महाराज**: आत्मज्ञानासाठी ध्यान, भक्ती आणि श्रध्दा यांना फार महत्त्व आहे. कारण भजन, ध्यान यांच्यात जर सातत्य असेल तर त्या चैतन्याच्या जास्तीत जास्त जवळ तुम्ही जाता, एक प्रकारची प्रसन्नता येते.

**प्रश्नकर्ता**: हो महाराज, ध्यानाच्या योगाने मी त्या अंतीम सत्याच्या जास्त जवळ येतो असे वाटते.

**महाराज**: ध्यानाने तुमच्या सर्व मायिक कल्पना निघून जातात. तुम्हांला सतत भिती कशाची असते तर मरणाची. ती भिती नाहिशी होते.

**प्रश्नकर्ता**: मी आता प्रत्येक गोष्टीकडे ती पंचभौतिक आहे, याच दृष्टीने बघतो. त्यामुळे भौतिक गोष्टींकडे मी जास्त लक्ष देत नाही. भौतिक घटनांचा काही परिणाम करुन घेत नाही.

**महाराज**: छान ! फारच छान ! कारण या सर्व गोष्टी तुमचा 'आहेपणा' अस्तित्वात येण्यापूर्वी नव्हत्या.

**प्रश्नकर्ता**: नोकरी, धंदा, कौटुंबिक नाते संबंध यांच्यामुळे थोड्याफार समस्या उद्‌भवतात. परंतु मी माझीच समजूत घालतो की हे सर्व सांभाळणे जरुरीचे आहे. कारण त्यात दुसऱ्यांचे हित आहे.

**महाराज**: संसार करा, नोकरी, धंदा सर्व सांभाळा, त्याचा तुमच्या अध्यात्माशी काही संबंध नाही. संसार म्हणजे एक स्वप्न आहे. झोपेतले स्वप्न थोड्या क्षणापुरते असते, हे एक दिर्घ स्वप्न आहे.

**प्रश्नकर्ता**: महाराज आपण जे जे काही ज्ञान मला दिलेत त्यासाठी मी आपला अत्यंत ऋणी आहे. मी ज्या आनंदाची आणि सुखाची अनुभूती घेत आहे, ती मला केवळ आणि केवळ आपल्यामुळेच मिळाली आहे.

**महाराज**: तुमचा आनंद हाच माझा आनंद आहे.

## १८. आत्यंतिक तळमळ

**प्रश्नकर्ता**: महाराज सतत विवेक करीत राहिल्याने, विवेकपूर्ण वागण्याने माझ्यात हळुहळू वैराग्य येत आहे, उदासिनता वाढत आहे. तरी आता अंतिम सत्याच्या जवळ आपण पोहोचलो आहोत हे कसं ओळखायचं?

**महाराज**: ध्यान आणि भजन यातील सातत्य, विवेकपूर्ण वागणे ह्याच्यामुळे तुमचे भौतिक जगातील गोष्टींचे आकर्षण हळुहळु कमी होते आणि तुमच्यात आलेल्या त्या जाणपणामुळे तुम्ही पुन्हा त्या मायाजाळामध्ये अडकत नाही. फक्त तुमच्यातील सतर्कता, विवेकपूर्ण उदासिनता ह्यामध्ये सातत्य पाहिजे, मनाची एकाग्रता आणि स्थिरता पाहिजे.

**प्रश्नकर्ता**: परंतु हे कळण्यासाठी काही लक्षणे आहेत का?

**महाराज**: यासाठी अध्यात्मशास्त्रानुसार सहा लक्षणे सांगितली आहेत. त्यानुसार तपासून पहायचे कि आपल्यामध्ये कोणती लक्षणे आहेत आणि कोणती नाहीत. असेल तर टीक मारायची, नाहीतर फुल्ली मारायची ! परंतु याकडे जरुरीपेक्षा जास्त लक्ष देऊ नका. थोडक्यात ती लक्षणे अशी शम- क्षमाशीलता, दम-मनावर नियंत्रण ठेवणे, तितिक्षा- जाणून घेण्याची इच्छा, उपरती- पश्चातापातून आपल्यात बदल करणे, श्रध्दा आणि भक्ती. हे मापदंड आहेत. त्यांना अनुलक्षून तुम्ही तुमची प्रगती कितपत आहे ते आजमावून पाहु शकता. परंतु सगळ्यात महत्त्वाची गोष्ट जी आहे ती म्हणजे तुमच्या अंतर्यामी जी स्वयंभू आत्मज्योत प्रज्ज्वलीत झालेली आहे तिच्याशी जास्तीत जास्त जवळीक करा. आत्यंतिक तळमळीने त्या अंतीम सत्याला मिठी मारा. स्वत:ला सर्वांगे त्या चैतन्याला सर्मपित करा. अहंभाव पूर्णत: विर्सजित करा. असे जेंव्हा घडेल तेंव्हा तो तुमच्या श्रध्देचा आणि भक्तीचा अत्युच्च क्षण असेल. तेंव्हा तुमच्या श्रध्देने आणि भक्तीने एक अत्युच्च पातळी गाठलेली असेल. आता तिथे भौतिक सुखाची अपेक्षा नसेल, देहभाव गळून गेलेला असेल. अभुतपूर्व अशी शांती आणि निर्विषय आनंद-स्वानंद ! शब्दातीत आहे सर्व. 'ते सुख काय सांगू, वाचे बोलता न ये |'

## १९. मला काहीच माहित नाही

**प्रश्नकर्ता**: या आठवड्याभरात मला माझी अध्यात्मिक समज दृढतर झाली आहे असे वाटते. माझं अस्तित्व मला जाणवत नाही असे वाटते की, मला काही अस्तित्वच नाही, मला काही माहित नाही. आणखी काही जाणण्यासाखे आहे असे वाटत नाही. अधिक काही जाणून घेण्याची आता इच्छाही नाही. एक प्रकारचा रितेपणा जाणवतो, फक्त रितेपणा आणि त्यातली सुंदरता अशी की बीजारोपण झालेले आहे आणि तो अंकुर आपसया वाढत आहे, कोणी काही न करता.

**महाराज**: सर्व काही स्वयंस्फूर्त ,आहे.

**प्रश्नकर्ता**: सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळत आहेत. महाराज आपण जे आकाशाचे उदाहरण देता त्यामुळे सगळं काही स्पष्ट झालं आहे. आकाशाला आकाश माहित नाही. स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव आकाशाला नाही. तसे आता सर्व एकजिनसी वाटत आहे. इथे 'मी' पण 'तू' पण काहीच नाही. सर्वव्यापी पोकळी आहे. आपल्या या सर्व सद्गुरुंचे खूप उपकार आहेत माझ्यावर. खूप वर्षे अभ्यासात घालवली मी आणि आता कुठे ती मुळी सापडली आणि वाढीला लागली. 'आहेपणाच्या' आधीची अनुभूती मी घेत आहे. तेंव्हाही काही नव्हते आणि आताही काही नाही. आता काही ताणतणाव नाही. प्रश्न नाहीत, असेल तर त्याचे उत्तर आतूनच मिळते. आहेपणा सुध्दा हवा असा वाटत नाही. सगळे काही आहे तसे असू दे, अगदी आहे तसे !

**महाराज**: कारण तुमच्या स्वयंस्फूर्त 'आहे'पणाला कशाची ही गरज नाही. हा 'आहे'पणा सगळ्यांच्या पलीकडे आहे.

**प्रश्नकर्ता**: हा 'आहे'पणा केव्हांही आहेच. आतापर्यंत पुस्तके वाचून अभ्यास करुन, बुध्दीच्या जोरावर खूप काही मिळवले पण आता कळले की, इथे बुध्दीचे काम नाही. ते बुध्दीच्या पलीकडे आहे. दुसरी गोष्ट आपण जे विषाचे उदाहरण दिलेत त्याची सुध्दा हे आकलन होण्यासाठी खूप मदत झाली. विष एकदा का शरिरात गेले की काय होणार हे सांगण्याची गरज नाही. त्याचं काम ते आपोआप करणार. हे उदाहरण माझ्याकरिता एवढे जबरदस्त ठरले आणि माझी खात्री झाली की ते विष जसे आपले काम करणार, रक्तात भिनले जाणार त्याप्रमाणे हे ज्ञानामृत माझ्यात आपोआप मुरत आहे. त्यामुळे आता वेगळे काही समजून घेण्याची किंवा काही ग्रहण करण्याची गरज नाही.

**महाराज**: इतका ठाम निश्चय होणे ही फार दुर्मिळ गोष्ट आहे. ज्ञान समजणे वेगळी गोष्ट आणि दृढनिश्चय होणे ही वेगळी गोष्ट आणि आता या भौतिक जगाशी काही देणे घेणे नाही असा ठाम निश्चय उस्फूर्तपणे होणे ही त्याहुनही वेगळी गोष्ट आहे. अध्यात्मज्ञान हा सुध्दा एक भ्रमच आहे परंतु अज्ञानाचा भ्रम काढण्याकरिता त्याचा उपयोग करायचा आहे. अनेक ग्रंथांच्या वाचनाने आपले भ्रमच आपण वाढवत असतो !

**प्रश्नकर्ता**: पण मला वाटतं सुरुवातीला या सगळ्यांची आवश्यकता आहे. विषयाची ओळख होण्यासाठी.

**महाराज**: केव्हांही. एक काटा काढण्यासाठी दुसऱ्या काट्याची आवश्यकता असतेच. एकदा का तुमची आत्मस्थिती निश्चयाची झाली की मग ज्ञान हा सुध्दा एक भ्रमच आहे.

**प्रश्नकर्ता**: मला वाटतं अंतर्गुरु तुमच्यातच असल्यामुळे, स्वरुपप्राप्तीसाठी ह्या बाह्य साधनांचा काहीच उपयोग नाही. सगळ्या प्रश्नांची उत्तरे अंतर्गुरु देतच असतो.

**महाराज**: बरोबर आहे, हीच ती स्वरहित 'स्व' वरची भक्ती, आत्मनिवेदन भक्ती म्हटली आहे तीला. तुमचे प्रश्न आणि त्याची उत्तरे ही आतून वाहत असतात. प्रश्न तुमच्याकडूनच येतात आणि उत्तरे तुमच्याच अंतर्गुरुकडून ! अध्यात्मामध्ये प्रश्न हे खरे प्रश्नच नसतात. अंतिम सत्य आहे ते, अंतिम सत्य ! अंतिम सत्याकडे जाणारा सुखसंवादाचा प्रवाह अंतर्मुख प्रवाह, आणि त्या प्रवाहात हळुहळू तुमचे प्रश्न तुमच्या शंका सर्वांचा लय होतो !

**प्रश्नकर्ता**: समज खोलवर गेल्यामुळे प्रश्न नाहीसे होतात. कारण उत्तरे आतूनच मिळत असतात.

**महाराज**: तुमची प्रगती बघून मला अतिशय समाधान वाटते.

**प्रश्नकर्ता**: माझ्या जाणीवेतून ह्या बाह्य जगाचा उद्भव होतो हे एकदा समजल्यावर कोणाचे गुणदोष बघण्याचा दृष्टीकोनच आता उरला नाही ! सगळ्यांमध्ये मीच आहे म्हटल्यावर कोणाला दोष द्यायचा? फक्त स्वरहित 'स्व'. या क्षणी तरी माझ्याकडे काहीच शंका नाहीत, प्रश्न नाहीत असे वाटते कदाचित नंतर येतीलही, मला माहित नाही.

**महाराज**: सर्व शंकांचे निर्मूलन होणे आवश्यक आहे. कारण अंतिम सत्य एकदा कळले की नंतर तुमचा अध्यात्माचा अभ्यास संपला.

**प्रश्नकर्ता**: तरी सुध्दा आत्मस्थिती दृढतर होण्यासाठी ध्यानाभ्यास आवश्यक आहे.

**महाराज**: कारण ध्यानामुळे तुमच्यातील त्या अदृश्य ध्यानकर्त्याचे लक्ष 'तूच ते अंतिम सत्य आहेस' ह्याच्याकडे वेधले जाते !

**प्रश्नकर्ता**: एवढी एकच गोष्ट करायची आहे, जास्तीत जास्त ध्यान करुन त्या अंतिम सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाणे. कित्येक वर्षाच्या सायासानंतर ह्या सगळ्यांची अनुभूती आली. त्यामुळे मी खुपच आनंदी आहे. अध्यात्माच्या ह्या वाटचालीत माझा अंतर्गुरु माझ्या बरोबर होता. पुष्कळ चर्चा झाल्या, पुष्कळ ग्रंथ, पुस्तके वाचली आणि शेवटी इंटरनेटद्वारे आपण भेटलात महाराज आणि माझ्या अंतर्गुरुला आपण जागृत केले.

**महाराज**: तुमचा पाया चांगला होता. त्यामुळे अध्यात्मिक बैठक पक्की झाली. आता तुम्हांला काहीही करण्याची गरज नाही. कुठे जाण्याची गरज नाही. निसर्गदत्त महाराज सांगत असत की, आता 'आहे'पणाचे चॉकलेट चघळत बसा !

**प्रश्नकर्ता**: महाराज, मला वाटते की अजून थोडी परिपक्वता आली पाहिजे, फार अल्प काळातच आपल्याशी केलेल्या चर्चेमधुन मला हवे ते, ज्याच्या शोधात मी होतो, ते मला मिळाले. जितकी जास्त चर्चा आपल्याशी होते तितका मी त्या अंतिम सत्याच्या जवळ जवळ येतो. आता कुठल्याही ग्रंथांची आवश्यकता वाटत नाही.

**महाराज**: जेंव्हा एखादया भक्ताची किंवा शिष्याची अशी निश्चित आणि स्वच्छ भूमिका तयार होते, पूर्ण खात्री होते, तेंव्हा मला स्वत:लाच अतिशय आनंद होतो. या स्थितीपर्यंत जेंव्हा तुम्ही पोहोचता तेंव्हा व्यक्तित्व लोप पावते, तुम्हांला तुमचे अस्तित्व जाणवत नाही. तिथे अस्तित्वाचा अनुभवच रहात नाही. अंतीम स्थितीमध्ये अस्तित्व पूर्णत: लोप पावते.

**प्रश्नकर्ता**: आणि ते सर्वव्यापी होते का?

**महाराज**: सर्वव्यापी होते पण तुम्हांला त्याची जाणीवही नसते.

**प्रश्नकर्ता**: खूप आभारी आहे महाराज मी आपला. माझ्यासाठी आपण खूप वेळ दिलात. आपल्याला अजून बऱ्याच लोकांशी चर्चा करायची असेल.

**महाराज**: मला त्यात आनंद आहे. असे भक्त मला आवडतात. मला कोणाकडून कशाचीही अपेक्षा नाही. तुम्हांला तुमची अनोळखी असलेली ओळख पक्की झाली की मला सर्व काही मिळाले ! त्यातच माझा आनंद आहे.

## २०. समाधानाची आगळी प्रभा

**प्रश्नकर्ता**: महाराज गेली बरीच वर्षे माझा ध्यानाभ्यास चालू आहे परंतु आपली सर्व शिकवण ऐकल्यानंतर आणि नाममंत्र मिळाल्यानंतर, माझ्यात विलक्षण बदल झाला. माझ्या आजूबाजूला आनंद भरुन राहिला आहे असे वाटते आणि मी तो भोगत आहे. सगळच आश्चर्यकारक आहे. अवर्णनीय आहे, पुष्कळ मोकळेपणा वाटतो आहे आणि त्याबरोबर आनंद आणि तोही सतत आहे. कित्येक रात्री मला झोपही लागलेली नाही. कारण त्या समाधानाच्या तृप्तीत मी पडून राहतो. अभुतपूर्व शांती आणि आनंद ह्यांचे तेज आणि हसू माझ्या चेहऱ्यावर पसरलेले असते.

**महाराज**: फारच छान ! तुमच्यातील स्वरहित 'स्व' चा हा सुगंध आहे, त्याची प्रभा आहे.

**प्रश्नकर्ता**: मला असे वाटते की एखाद्या अत्यंत पवित्र अशा गोष्टीला मला स्पर्श करता आला आहे ! अशा वेळी मन हेलावून जाते आणि डोळ्यातून अश्रु वाहू लागतात. नतमस्तक होण्याव्यतिरिक्त मी काहीच करु शकत नाही. महाराज, ह्या सगळ्या गोष्टींसाठी मी आपला खूप खूप आभारी आहे. ह्या सर्व सद्‌गुरुंची दर्शने मला वारंवार होत असतात. काल रात्री तर त्या दर्शनांबरोबर तू स्वरहित 'स्व' आहेस असा आवाज ऐकू आला आणि त्या आवाजाबरोबर सुंदर गुलाबी प्रकाश, त्या प्रकाशाने आणि संदेशाच्या त्या ध्वनीलहरीत अंतर्बाह्य सर्व व्यापून गेले होते, त्या क्षणाला मी भावुक होऊन, नतमस्तक झालो. सर्व काही एकदम स्पष्ट आणि उघड दिसत होते. त्यामुळे माझा उत्साह आणखी वाढत जाऊन अंतिम सत्याकडचा प्रवास आणखी दृढतर झाला आहे आणि हे सर्व मला शक्य होणार आहे या विषयी खात्री बळावली.

**महाराज**: हा तुमचा अंतर्गुरु, हेच ते अंतिम सत्य, फारच छान ! इतक्या लवकर एवढी प्रगती ! माझ्या सदगुरुंची निसर्गदत्त महाराजांची ही सर्व कृपा ! तुमची गाढ श्रध्दा आणि दृढ भक्ती पाहून मला खूप समाधान वाटले, आनंद झाला. अशीच प्रगती चालू ठेवा, माझ्या सद्‌गुरुंचे आशिर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहेत. ज्या क्षणी देहबुध्दीचा लय होतो, त्यावेळी दृष्टी शून्यवत होते. तिथे मग दिसणे, भासणे काहीच उरत नाही. केवळ एक प्रकारची अध्यात्मिक नशा चढलेली असते. (महाराज त्या अवस्थेतच असल्याप्रमाणे हात हवेत हलवतात) तुमचा कामधंदा सांभाळा पण त्याचबरोबर अध्यात्मज्ञानाचे हे अमृत प्राशन करा.

**प्रश्नकर्ता**: मला पूजा करण्याची मनोमन इच्छा असते, परंतु सर्वात चांगला मार्ग कोणता? पूजा ही इतकी सुंदर गोष्ट आहे की मला ती सोडावीशी वाटत नाही.

**महाराज**: तुमच्यातील अंतिम सत्याच्या, त्या स्वयंभू चैतन्याच्या सानिध्यात राहणे ही खरी पूजा. तुमच्याकडून हीच अपेक्षा असते. इथे पूजा, पूज्य आणि पूजक ही त्रिपुटी रहात नाही. पूजा करणारे तुम्हीच आहात. ज्याची पूजा

करायची तेही तुम्हीच आहात आणि पूजा ही तुम्हीच आहात ! सर्वेसर्वा तुम्हीच आहात, शिष्य तुम्हीच आहात आणि गुरुही तुम्हीच आहात, देव तुम्हीच आहात आणि भक्तही तुम्हीच आहात.

**प्रश्नकर्ता**: महाराज आपण भजन का करतो?

**महाराज**: भौतिक जगातील बाह्य गोष्टींचा, घटनांचा तुमच्यातील चैतन्याशी संपर्क येऊ नये, त्याच्या पासून ते सतर्क रहावे यासाठी भजनाची आवश्यकता आहे. त्या चैतन्याला भजनाची, भक्तीमय संगीताची आवड आहे. क्षणभर अध्यात्म बाजूला ठेवा, कोणीतरी तुम्हांला चांगलं म्हटलं, तुमची स्तुती केली की तुम्हांला आनंद होतो की नाही? तद्वत न्याये त्या चैतन्याला भजनातून आनंद मिळतो. भजनाच्या माध्यमातून जेंव्हा तुम्ही त्या चैतन्याची स्तुती करता तेंव्हा तुम्ही त्या चैतन्याला खुष करत असता. तुम्ही तुमच्या स्वरहित 'स्व' ला महत्त्व देता, बाहेरच्या देवाला नाही ! भजनात जेंव्हा तुम्ही तल्लीन होऊन त्या चैतन्याची आळवणी करता, प्रेमाने गाता तेंव्हा ते चैतन्य खुष होऊन नाचू-बोलू लागते 'नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग' तो पांडुरंग नाचत नव्हता, हा आतला पांडुरंग, ते चैतन्य नाचत होते ! भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे, 'नाहं वसामि वैकुंठे, योगिनां हृदये न च | मद् भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद !' मी वैकुंठात नाही की योग्यांच्या हृदयात नाही. माझ्या भक्तांचे प्रेमळ गायन जिथे चालते तिथे मी राहतो. त्यांच्या हृदयात राहतो, योग्यांच्या नाही ! चैतन्य हे संवेदनक्षम आहे, भक्तीपूर्वक भजनाने ते चैतन्य, तुमच्या अंतर्यामाचा देव, प्रसन्न होतो आणि तुम्ही नाचु लागता त्या नामदेवाप्रमाणे ! एक वेगळाच आनंद आणि शांती मिळते त्यातून. शिवाय बाह्य आघातांपासून, आकर्षणांपासून तुम्ही स्वत: सतर्क, सावध राहता ज्यायोगे तुम्ही त्या अंतिम सत्या पासून विचलीत होत नाही.

**प्रश्नकर्ता**: मी दिवसातून एक किंवा दोन भजने ऐकतो परंतु त्यातून सुध्दा मला आनंद मिळतो. मला वाटतं मी, माझ्यातल्या खऱ्या मी ची आठवण ठेवतो आणि एवढं जर मी केलं नाहीतर मी पुन्हा जुन्या गोष्टींकडे आकर्षित होऊ शकेन. बाह्य गोष्टींचा इतका त्रास असतो की भजनामुळे या सगळ्यांपासून दूर राहण्यास मदत होते. आपली केवळ आठवण सुध्दा महाराज, या सगळ्यांसाठी खूप मदत करते ! माझी आता खात्री झाली आहे की सर्व काही माझ्यातच आहे. परंतु त्याचा योग्य प्रकारे उपयोग करुन घेतला पाहिजे. माझा विश्वास आता दिवसेंदिवस दृढ होत चालला आहे.

**महाराज**: तुमच्या या आनंदातच माझा आनंद आहे.

**प्रश्नकर्ता**: महाराज अंतर्यामी पडद्यावर सतत आपला हसरा चेहराच दिसत असतो. सगळीकडे ते हास्य पसरलेले असते. सगळेच आश्चर्यकारक आहे. खूप आभारी आहे मी आपला महाराज. आपली मराठी भाषा शिकल्यास आणखीनच चांगले होईल असे वाटते.

**महाराज**: भाषा नंतर आली. तुम्ही भाषेच्या आधी आहात ! त्या चैतन्याच्या जास्तीत जास्त जवळ जा, खोलवर जेंव्हा जाल, तेंव्हा तिथे काहीच नसेल कारण काय, काही नाही मधुनच सगळ्यांचा उद्‌भव झाला आहे !

**प्रश्नकर्ता**: हे सर्व कसे निर्माण झाले मला काहीच आकलन होत नाही परंतु हे सर्व अद्‌भुत आहे, महान आहे.

**महाराज**: ती महानता तुमच्यातच आहे. गुरु काही करत नाही. तुमच्यातच असलेला तुमचा 'आहेपणा' तुम्हांला दाखवण्यासाठी मार्गदर्शन करतो. त्या अंतिम सत्यावर आलेली सर्व राख काढून टाकतो. मायेची पटले दूर करुन त्या सत्याकडे पहाण्याची दिव्य दृष्टी देतो. तुमच्यातील स्वयंभू चैतन्य हे अदृष्य आहे, अनामिक आहे, अनोळखी आहे आणि ह्या अनोळखी चैतन्याची ओळख गुरु करुन देतो. मायेपासून त्या अंतिम सत्याकडे नेणारा हा प्रवास संपलेला आहे. तो प्रवास नव्हताच वास्तविक. कारण इथे सुरुवातही नाही आणि शेवटही नाही. संपूर्ण ज्ञान हे एकत्वात विलीन झालेले आहे. आत्मज्ञान म्हणजे एकत्व. 'एकमेवाद्वितीयम् नास्ति.'

## २१. मनाचा लय

**प्रश्नकर्ता**: काही ज्ञानी त्यांना ज्ञान झाल्यानंतर दुसऱ्यांना ते शिकवत नाहीत किंवा त्याविषयी काही चर्चा करत नाहीत.

**महाराज**: काही लोकांना ज्ञान झालेले असते परंतु, ते अंतिम सत्य उघड करुन सांगत नाहीत, काही लोकांना ते सांगताही येत नाही. प्रत्येक ज्ञानी हा उत्तम शिक्षक असेलच असे नाही ! फारच थोडे असे आहेत की ज्यांना ज्ञान झालेले आहे आणि त्यांच्यातून ते ओघाने वाहत आहे. पुष्कळ ज्ञानी आहेत. परंतु ज्ञानी असा पाहिजे की, त्याच्यामध्ये ते ज्ञान मुरले आहे. बुध्दीचा निकष इथे उपयोगी नाही. ते ज्ञान आतून उत्स्फूर्तपणे आविष्कृत झाले पाहिजे. त्या ज्ञानावेगळी तुमची काही दुसरी ओळख उरता कामा नये. ज्ञानी जो आहे तो शब्दांपासून आणि भौतिक जगापासूनही दूर असतो. तो त्या अंतिम सत्यामध्ये पूर्णत: विरघळून गेलेला असतो, त्याच्याशी एकरुप झालेला असतो. ज्ञानी जेंव्हा बोलतो, तेंव्हा त्याची भूमिका त्या अंतीम सत्यावेगळी नसते आणि त्याच भुमिकेतून तो त्या चैतन्याची हकिकत जणू स्वत:चीच हकिकत असल्याप्रमाणे निवेदन करीत असतो. एकरुपता आल्यानंतर ते ज्ञान त्याच्या मुखावाटे उत्स्फूर्तपणे वाहते. त्यासाठी त्याला काही प्रयत्नांची गरज नाही. काही कल्पना, निष्कर्ष कशाचीही गरज नाही. केवळ ज्ञानाचा उत्स्फूर्त आविष्कार !

निसर्गदत्त महाराज एकदा म्हणाले होते की, मला कोणी काहीही प्रश्न विचारला तरी सहज उत्तर देतो. जणु काही ती सर्व माझ्या जीवनाविषयीची माहिती आहे. तुम्ही तुमच्याविषयी काहीही विचारले तर सांगू शकता. कारण तुमच्या आयुष्याविषयी तुम्हांला पूर्णत: माहिती आहे. तद्वत् न्याये ज्ञानी हा स्वरुपाशी, त्या चैतन्याशी तद्रुप तदाकार झालेला असतो. त्यामुळे ते ज्ञान त्याच्यातून उत्स्फुर्तपणे वाहते.

जणु काही ती त्याची स्वत:ची हकिकत आहे. चैतन्याने सांगितलेली, चैतन्याची हकिकत, कुठल्या ग्रंथातून किंवा पुस्तकातून सांगितलेली नाही. तो त्या अंतिम सत्यावेगळा नाही, स्वरुपाकार झालेला आहे. तुमचं नाव जेम्स आहे. जेम्स या ओळखीने तुम्ही आतापर्यंतचे आयुष्य जगलात, जेम्स कसा आहे? त्याचे आचार विचार, त्याचे अंतर्बाह्य जीवन तुम्हांला माहीत आहे. त्याचप्रमाणे हे संत महात्मे जे त्या अंतिम सत्याशी एकरुप झाले, त्यांच्या मुखातून स्वरुपज्ञान अमोघपणे वाहात असते. काही सायास करावे लागत नाहीत.

माझ्या सद्‌गुरुंच्या कृपेने त्यांच्याकडून मला थोडीफार अध्यात्मिक शक्ती जी मिळाली आहे, तिच्यायोगाने तुमच्याशी मी अध्यात्माविषयी चार गोष्टी बोलू शकतो. या देहरुपाने तुमच्याशी मी बोलत आहे असे तुम्हांला वाटते. परंतु या देहरुपी साधनातून माझा सद्‌गुरु बोलत आहे ! या शंखातून ध्वनी त्यांच्यामुळे निघत आहे ! कठीण काही नाही त्यात. तुम्ही जे काही ऐकत आहात त्यात नवीन काही नाही. ते सर्व तुमच्यात आधीच आहे. त्या महान संतांच्या ठिकाणी जे चैतन्य वावरले तेच तुमच्या आमच्यात आहे, प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. केवळ देहबुध्दी

मुळे तुम्हांला तुमच्या स्वयंभू चैतन्याचा विसर पडला, त्याच्याकडे दुर्लक्ष झाले. सगळ्या दृष्याला तुम्ही प्राधान्य दिले, त्या दृष्याच्या जाणत्याला विसरलात ! इतके दिवस तुम्ही त्या दृष्याला महत्त्व देऊन द्रष्टयाला विसरलात, आता तुम्हांला ज्ञानदृष्टी प्राप्त झाली आहे. त्यामुळे त्या पहाणाऱ्याच्या संगतीतच रहात आहात. इथे आश्रमात येण्यासाठी तुम्हांला कोणी तरी पत्ता दिला, इथे पोहोचल्यानंतर त्या पत्त्याची आता गरज नाही. तसे तुम्हांला ध्यान आणि ज्ञान यांच्या माध्यमातून त्या अंतिम सत्याकडे जाण्याचा पत्ता दिलेला आहे. सांगितलेल्या नियमांचे, सुचनांचे योग्य रितीने पालन केलेत तर नक्कीच तुम्ही तुमच्या स्वरुपाशी त्या अंतिम सत्याशी तद्रुप, तदाकार व्हाल आणि ज्यावेळी तुमची भूमिका ठाम होईल, निश्चय पक्का होईल त्यावेळी मग पत्त्याची गरज नाही, तो फेकून द्या, परंतु श्रध्दा आणि निष्ठा दृढ करा.

सुवर्णसंधी आहे ही, भाग्याने नरदेह लाभला आहे. देहाचे विसर्जन झाले की संधी गमावली जाणार. तेंव्हा वेळ वाया न दवडता ह्या संधीचा फायदा करुन घ्या. अंतिम सत्य कळले, स्वरुपाची ओळख दृढ झाली. आता तुम्ही दैनंदिन जीवनात कसे वागायला पाहिजे? त्याच्यासाठी वेगळे काही सायास करायला नको. तुमचं सर्व वागणं, बोलणं, चालणं हे सर्व सहज असेल, त्यामुळे तुमचं कौटुंबिक जीवन, बाकी रोजचा सर्व व्यवहार ह्या सर्व गोष्टी नित्याप्रमाणे चालतील, कुठेही दुर्लक्ष होणार नाही. झोपेतसुध्दा तुम्ही त्याच निश्चयाने राहणार. आपण सगळे आपल्या देहावर प्रेम करतो, त्याची काळजी घेतो. म्हणतो मी देह नाही. परंतु सुक्ष्मरित्या कुठेतरी देहबुध्दी असतेच, तिचे पूर्णत: निर्मुलन झाले पाहिजे आणि हे सर्व ध्यानामुळे शक्य होणार. अध्यात्मिक झाडणीसाठी ध्यान हेच प्रभावी साधन आहे. सुक्ष्मातले सूक्ष्म विचार, सर्व कल्पना ध्यानामुळेच निघून जाणार. काही जंतु उकळत्या पाण्याला दाद देत नाहीत. जंतुनाशकानेही मरत नाहीत, तसे काही विचार, विकार इतके प्रबळ असतात की ध्यानाशिवाय कशानेच त्यांचा बिमोड होत नाही.

त्यासाठी तुम्ही तुम्हांला दिलेला मंत्र अष्टौप्रहर जपत राहिला पाहिजे. त्यायोगे तुम्ही उत्तम अध्यात्मिक आणि प्रापंचिक जीवन जगू शकता. सुरुवातीला तुम्हांला मंत्र जपावा लागेल परंतु पुढे तुमच्याकडून आपसया त्याचा जप होत राहील. मंत्र आणि मंत्र जपणारा एकरुप होऊन जातील. वास्तविक हा अजपा-जप आहे. तुमच्या नकळत तुमच्यातील जपी तो जपतच असतो.

मंत्राच्या योगे संथपणे, शांतपणे त्या अंतिम सत्याकडे तुमची वाटचाल चालू असते, ते अंतिम सत्य तुमच्यावर हळुहळु पण शाश्वतपणे कोरले जात असते. प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी उद्देश असतो. मंत्राचा जप करण्यामागे हाच उद्देश आहे, की त्या योगे तुमची खरी ओळख झाली पाहिजे. तुम्ही ज्याच्या शोधात आहात ते सत्य तुम्हीच स्वत: आहात. सत्य काय? तर देह हे रुप तुमचे नाही, आधीही कधी देह हे तुमचे रुप नव्हते, यापुढे कधी असणार नाही. तेंव्हा सखोलपणे, शांतपणे त्याचा शोध घ्या. म्हणजे एक दिवस सहज ते सत्य तुमच्या समोर उघड होईल आणि ते ज्ञान तुमच्यातून वाहू लागेल.

## २२. तुमची कहाणी, सर्वात महान गोष्ट

**महाराज**: आता तुमची सर्व हकिकत तुमच्या समोर मांडली. तुमची कहाणी तुम्हाला ऐकवली. आतापर्यंत ऐकलेल्या कहाण्यांमधील सर्वात महान कहाणी ! त्या कहाणीचे केंद्रस्थान तुम्ही आहात. कारण सर्व काही तुमच्यातच आहे. तुमच्याशिवाय कशाला अस्तित्वच नाही. तेंव्हा शांत रहा. त्या अभुतपूर्व शांतीचा, अलौकिक स्तब्धतेचा उपभोग घ्या. 'आहे'पणाच्या आधी तुम्ही कसे होतात? तर माहित नाही, त्या स्थितीमध्ये रहा. एक लक्षात ठेवा की ज्ञान नसणे हेच खरे ज्ञान आहे ! तेंव्हा स्वरहित 'स्व' शी अखंडपणे, सर्वांगे समरस होऊन रहा आणि त्या अमृताचे सेवन करुन मस्तीत, त्या धुंदीत रहा.

**प्रश्नकर्ता**: मला असं वाटतं की भौतिकरित्या माझं आयुष्य संपलेलं आहे. आता अध्यात्मिक जिवनाची वाटचाल सुरु झालेली आहे. शुध्द चैतन्यावर आलेले सर्व पडदे दूर होऊन ते निखळ, शुध्द स्वरुप आत्मतेजाने उघड होत आहे. मनात आपल्या विषयी अपार कृतज्ञता दाटून आली आहे. आपण स्वरुपज्ञानाविषयी केवळ चर्चा केली नाहीत तर ते अंतिम सत्य माझ्यातच आहे ते दाखवून दिले.

**महाराज**: ही सर्व माझ्या सद्‌गुरुंची निसर्गदत्त महाराजांची कृपा! मी कोणीच नाही. केवळ एक हाडामासाचा पुतळा, कठपुतळी ! ते महान सुत्रधार आहेत. सद्‌गुरु तुम्हांला सांगतात, की तुम्ही ज्ञानी आहातच आणि तुमच्यात आणि माझ्यात काहीच फरक नाही, फक्त मला माहित आहे, की मी देह नाही, देहा वेगळा आहे आणि तुम्हांला फक्त तेवढेच माहित नाही. तुम्ही तुमची खरी ओळख विसरला आहात. मी तुम्हांला तुमचीच हकिकत सांगितली आणि ती श्रवणकर्त्याची हकिकत म्हणून ऐकल्यावर तुमच्यातील त्या शुध्द चैतन्याला जाग आली, आत्मजागृती झाली. त्या शुध्द चैतन्याने स्वतःचे प्रतिबिंब सद्‌गुरुमध्ये पाहिले. चैतन्याची, चैतन्याशी ओळख पटल्यावर ते आनंदाने नाचू लागले. पुनःप्रत्ययाचा आनंद ! तुमची खरी ओळख तुम्हांला करुन दिली. अंतिम सत्य तुमच्यापुढे उभे केले. आता तुमची ओळख तुम्हांला पटली आहे. तेंव्हा भक्तीमध्ये सातत्य ठेवा, अढळ श्रध्दा ठेवा, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा की भक्तिशिवाय आत्मज्ञानाला परिपूर्णता येत नाही. भक्तीला ज्ञानाची माऊली म्हटले आहे.

इथून निघताना मन, बुध्दी, अहंकार सर्व इथेच ठेवून जा ! आत्मानंदात मग्न रहा, शांत रहा, आनंदी रहा. माझ्या सद्‌गुरुंनी अध्यात्मज्ञानाचं सार त्यांच्या एका वचनात सांगितले आहे. ते सतत लक्षात ठेवा, '**तुझ्या आत्मज्ञाना वेगळा अन्य देव, ईश्वर, ब्रह्म, आत्मा, परमात्मा, गुरु कोणी नाही**.'

**जय गुरु !**

सतत तुमच्या चैतन्याच्या संपर्कात रहा.
नियमित व्यायामाने तुम्ही तुमचे शरीर
सुदृढ ठेवु शकता त्याप्रमाणे तुमच्या अध्यात्मिक
सुदृढतेसाठी नियमित ध्यान आणि भजन यांची
आवश्यकता आहे. अध्यात्मिक पथ्य सांभाळायचे.
आपल्या स्वरुपस्थितीला बाधक ठरतील
अशा गोष्टींपासुन दुर रहायचे. चैतन्य हा विचार नाही,
ते तुमच्यातील अंतिम सत्य आहे !
जितक्या सहजतेने तुम्ही "मी पुरुष किंवा स्त्री आहे"
हे स्विकारले आहे, तितक्याच ठामपणे "मी शुध्द
चैतन्य स्वरुप आहे" हे ठसले पाहिजे.

- सद्‌गुरु श्री रमाकांत महाराज